# रोमकरांस पत्र

**१**,२ **पौलाकडून** जो येशू ख्रिस्ताची सेवा करणरा प्रेषित आहे, परमेश्वराच्या सुवार्तेसाठी जो वेगळा केलेला, **ज्याची** प्रतिज्ञा
३ परमेश्वराने पवित्र शास्त्रात संदेष्टयांच्या द्वारे फार पूर्वीच केली होती. **हे** वचन परमेश्वराचे पुत्र येशू विषयी दिले
४ गेले होते. शारीरिक रूपाने येशू दाविदाच्या वंशात जन्मेले. **येशू** ख्रिस्ताच्या पुनरूत्थानाद्वारे, पराक्रमाने परमेश्वराचा
५ पुत्र होण्याची घोषणा केली गेली. **ज्यांच्या** द्वारे आम्हाला कृपा व प्रेषितपद प्राप्त झाले; यासाठी की सर्व जगामध्ये
६ येशूच्या नांवासाठी विश्वासाच्या आज्ञापालनाद्वारे शिष्य म्हणून बोलावले जावे. **तुम्ही** सुद्धा त्यांपैकीच आहात; जे
७ पवित्र होण्याकरिता बोलावले गेले आहेत. **रोम** शहरात राहणाऱ्या त्या सर्वांना ज्यांच्यावर परमेश्वर प्रेम करतात,
आणि जे पवित्र म्हणवतात; आमचे बाप परमेश्वर आणि स्वामी येशू ख्रिस्त यांच्यापासून विना अट अशी कृपा व
८ शांती असो. **सर्व** जगभर तुमच्या विश्वासाची चर्चा होत आहे, म्हणून सर्व प्रथम मी तुम्हां सर्वांसाठी येशू ख्रिस्ताद्वारे

---

१:१ ''**पौल**''- प्रेषित

''**दास**''- या ग्रीक शब्दाचा अर्थ गुलाम होऊ शकतो, जो पूर्णपणे दुसऱ्याचा असतो. याप्रकारे सर्व विश्वासू ख्रिस्ताचे दास किंवा गुलाम आहेत. येशून त्यांना पापाच्या दासत्वातून विकत घेऊन आपली संपत्ति (त्याचे लोक) बनवले आहे. (६:१६,१८,२२; मत्तय २०:२८; १करिंथ ६:१९,२०). सर्व विश्वासूंनी केल्याप्रमाणे, पौलाने ख्रिस्तासोबत हा संबंध स्वईच्छेने स्वीकारला आहे.

''**प्रेषित**''-१करिंथ १:१; गल १:१ याचा अर्थ - जो एखादया व्यक्तिद्वारे एखादे कार्य किंवा मिशन याकरिता पाठवला जातो. मत्तय १०:२ पहा.

''**वेगळा केलेला**'' -ख्रिसताच्या सुवार्तेची घोषणा करावयास समजवून दयावयास व त्याचे संरक्षण करावयास परमेश्वराने पौलाला बोलावले होते. ही सुवार्ता ''परमेश्वराची'' आहे. सत्य - परमेश्वराने याची निर्मिती केली, योजना आखून, मार्ग तयार करून त्याला पूर्ण केले आणि आता दुसऱ्यांना देऊन टाकले.

१:२ ख्रिस्ताची सुवार्ता अगदी नविन नव्हती. ती येशूच्या पूर्वीहि यहूदयांना दिलेल्या वचनात शुभसंदेशाच्या प्रतिज्ञेत, संदेश प्रकार आणि चित्र स्वरूपात दिली गेली होती. पहा लूक २४:२५,२७,४६,४७; मत्तय ५:१७; इब्री ८:५; १०:१.

१:३ ''ख्रिस्त एक व्यक्ति होते''-परंतु दोन स्वभावांचे -ईश्वरीय आणि मानवीय दाविदाचे पुत्र असूनहि परमेश्वराचे पुत्र होणे. (मत्तय १:१,३; ३:१७; इब्री २:१४,१७).

१:४ ''**पवित्रतेचा आत्मा**'' - पवित्र आत्मा आहे. (योहान १४:१६,१७,२६) पवित्रतेसाठी लेवीय २०:७; योहान १७:१७-१९ चे नोट्स पहा. ख्रिस्त परमेश्वराचे पुत्र असण्याचे शेवटचे प्रमाण होते त्यांचे पुन्हा जिवंत होणे. मोठमोठल्या गोष्टी प्रतिपादित करून ते कबरेत राहिले नाहित. त्यांनी जे काही म्हटले ते करून दाखवले. परमेश्वर पुत्राचे प्रमाण योहान ५:३१-४७ मध्ये पहा.

१:५ पौलाला ठाऊक होते की त्याचे तारण व सेवेची संधि ही दोन्ही परमेश्वराकडून प्राप्त झालेली वरदाने होती. (इफि २:३-१०; ३:७,८; १ तीमथ्य १:१३-१७; २ तीमथ्य १:९; तीताला ३:३-८). पौलाला परमेश्वराने विशेषत: परराष्ट्रीयांमध्ये कार्य करण्यास निवडले होते. तरीहि त्याने यहूदयांनाहि संदेश दिला - प्रेषित १३:४५-४७; २२:३१; २६:१७,१८; गल १:१६; २:७,८.

''**विश्वासाच्या आज्ञापालनाद्वारे**''- बायबल मध्ये विश्वास त्या सत्याकडे व सिद्धांताकडे संकेत करतो ज्याची शिकवण पौलाने व प्रेषितांनी दिली होती (पहा १ तीमथ्य ४:१; यहूदा ३) विश्वास व आज्ञापालन यांतील जवळचा संबंध वचनात अनेकदा दिसतो. पहा ६:१६-२३; ८:१४; मत्तय ७:२१-२४; प्रेषित ५:३२; २२:१०; २ थेस्स १:८; इब्री ५:९; १पेत्र १:२; ४:७; १ योहान २:४६ आणि नोट्स पहा. तारण परमेश्वराच्या कृपेने व विश्वासाने प्राप्त होते. परमेश्वराद्वारे आपल्या जीवनात असे परिवर्तन घडते की आपण ख्रिस्तासमोर गुडघे टेकतो व त्यांना स्वामी-प्रभु म्हणून स्वीकारतो. ख्रिस्तावर भरंवसा करणे व स्वत:ला त्यांच्या हाती सोपवणे या दोन्ही गोष्टी सोबतच घडतात.

१:६ ''**बोलावलेले**'' ८:२८-३० पहा. हे एखादया निमंत्रणपेक्षाहि श्रेष्ठ आहे. सर्व विश्वासू -पुत्रांसाठी पुरस्कार आहेत व ते त्यांच्यासाठीच आहेत. योहान ६:३७; १७:६; त्यांच्या विश्वास करण्यापूर्वीच त्यांना ठाऊक असते की ते कोण आहेत; याकरता की त्यांनी विश्वास करण्याद्वारे येशूला आपला स्वामी व क्षमा करणारा असे स्वीकारावे.

१:७ एक विशेष स्नेहाने परमेश्वर सर्व विश्वासूंवर प्रेम करतात. योहान १३:१; १४:२१,२३; १ योहान ३:१; यिर्म ३१:३. ''पवित्र होण्यासाठी'' याचा अर्थ पवित्रजन. ख्रिस्तात सर्व विश्वासू पवित्र आहेत. योहान १७:१७-१९ पहा बायबलच्या मते जे अधिक समर्पित किंवा यशस्वी आहेत तेच संत किंवा विशिष्ट लोक असे नाही तर, सर्व जे पवित्र आहेत त्या सर्वांचा त्यात समावेश होतो. आणि यासाठी की ते पवित्र आहेत, त्यांनी पवित्र जीवनच व्यति करावे.

''**कृपा व शांती**'' - दोन्ही ख्रिस्ताच्या संदेशातील विशेष शब्द आहेत. पवित्रता, उपयोगिता व चांगले जीवन जगण्यासाठी जे काही आवश्यक आहे ते केवळ कृपेयोग्य होऊ शकत नाही; ही अशी कृपा आहे जी कमवली जाऊ शकत नाही; आपण याच्या योग्यच नाही. येथे शांती म्हणजे मनाचा विश्राम जे केवळ येशू ख्रिस्तच देतात. (मत्तय ११:२८-३०; योहान १४:२७; १६:३३). ज्याप्रमाणे ख्रिस्ताहि ती देतात; हे केवळ यामुळे शक्य आहे की त्या दोघांचा स्वभाव एकच आहे. फिलि २:६.

१:८,९ पौल नेहमी विश्वासू लोकांसाठी परमेश्वराची उपकारस्तुति करत असे -१करिंथ १:४; फिलि १:३; कल १:३; १ थेस्स २:१३; २ तीमथ्य १:३ प्रत्येक ठिकाणी राहणाऱ्या विश्वासूकरिता तो आभारी होता. इफि १:१६; ३:१६; फिलि १:४,९; कल १:३,९; २:१; १

९ परमेश्वराचे आभार मानतो. **परमेश्वर**, ज्यांची सेवा मी आपल्या आत्म्याने त्यांच्या पुत्राच्या सुवार्तेद्वारे करतो या
१० गोष्टी विषयी परमेश्वर साक्षी आहे की मी निरंतर आपल्या प्रार्थनेत तुमचे स्मरण करतो; **अशी** विनंती करतो की
११ परमेश्वराच्या इच्छेने मला तुमच्या जवळ येण्यात यश मिळावे. **मी** असे इच्छितो की तेथे येऊन तुम्हाला काही
१२ आत्मिक वरदान दयावे यासाठी की तुम्ही आत्म्यात स्थिर व्हावे. **ते** हयासाठी की आपण आपसात विश्वासने शांती
१३ प्राप्त करावी. **माझी** इच्छा आहे की तुम्ही ह्या विषयी अजाण नसावे की तुमच्याकडे येण्याचा मी अनेकदा बेत केला
१४ पण आतापर्यंत अडथळे आले. **मी** येण्याचे कारण असे होते की ज्याप्रमाणे मला परराष्ट्रीयांत सेवेचे फळ मिळत आहे
१५ तसे तुमच्यातहि मिळावे. मी ग्रीक व अन्यभाषिय; ज्ञानी व अज्ञानी लोकांचा ऋणी आहे; **तुम्ही** जे रोम शहरात
१६ राहता, तुम्हाला देखील शुभसंदेश सांगण्यासाठी मी अगदी उत्सुक आहे. **कारण** मला ख्रिस्ताच्या सुवार्तेची लाज
वाटत नाही; यासाठी की प्रत्येक, जो तारणाकरिता विश्वास करतो, परमेश्वराचे सामर्थ्य आहे, मग ते यहूदी असोत
१७ की परराष्ट्रीय. **कारण** यात परमेश्वराचे नीतिमत्व विश्वासाने विश्वासासाठी प्रगट झाले आहे, कारण लिहिले आहे

---

थेस्स १:२; ३'१०; ५:२३; २तीमथ्य १:३ सर्व मंडळयाबद्दल त्याला कळकळ होती (२ करिंथ ११:२८,२९) प्रार्थनेचे महत्व व सामर्थ्य पौलाला माहित होते. (तुलना करा लूक १८:१; याकोब ५:१६)

**"आपल्या आत्म्याने''** योहान ४:२४ शी तुलना करा. आपले मन व शरीराशी देखील.

१:१० **"तुमच्या जवळ''** १५:२३,२४; प्रेषित १९:२१.

१:११ **"आत्मिक वरदान''** - १२:६-८; १ करिंथ १२:४-११.

१:१२ "तो एक महान प्रेषित होता पण गर्वाने फुगून त्याने ही कल्पना केली नाही की इतर विश्वासू त्याच्याहि आत्मिक उन्नतित मदत करू शकत नाहीत.

१:१३ **"फळ''** - मत्तय ९:३६-३८; योहान ४:३५-३८. दुसऱ्या ठिकाणी पौलाच्या उत्तम परिणासाठी पहा प्रेषित १३:४३; १४:२१-२३; १६:४०; १६:४,१२,३४; १८:८; १९:१७-२०; "परराष्ट्रीय'' यहूदयांना सोडून इतर लोक.

१:१४ प्रत्येक व्यक्तिप्रति तो स्वत:ला ऋणी समजत होता. दुसऱ्यांना संदेश सांगण्याच्या संबंधात तो त्यांचा कर्जदार आहे हे त्याला ठाऊक होते. पहा प्रेषित २०:२६,२७. ही जबाबदारी त्याला ख्रिस्ताने दिली होती (मत्तय १६:१६-१८; १ करिंथ ९:१६,१७) सर्व विश्वासूंना व संपूर्ण मंडळयांना हे कार्य दिले गेले आहे. मत्तय २८:१८-२०; मार्क १६:१५. "ग्रीक व अन्यभाषिय'' - ग्रीक लोक स्वत:ला व आपल्या संस्कृतीला सर्वश्रेष्ठ मानीत होते. ग्रीक भाषा न बोलणाऱ्यांना ते बारबेरियन -बर्बर म्हणत होते. म्हणून येथे अन्यभाषीय म्हणजे ते जे ग्रीक भाषा बोलत नव्हते.

१:१५ दुसऱ्यांसाठी आपली जबाबदारी गंभीरतेने घेऊन, ती पूर्ण करण्यात तो उत्साही होता. दु:ख, समस्या व मृत्युची भीति त्याला थांबवू शकली नाही. (प्रेषित २०:२४; २१:१३).

१:१६ शुभवर्तमानाची घोषणा करण्याच्या तीव्र इच्छेचे कारण येथे आपल्याला दिसते. तो या कार्याला कमी प्रतिचे किंवा व्यर्थ लेखित नव्हता. त्याला माहित होते की सुवार्ता तारणाचा असा मार्ग आहे जो त्यांचा पालट करून, क्षमा करून त्यांना स्वर्गात नेऊ शकतो. इतर दुसऱ्या पत्रांच्या तुलनेत, या पत्रात तो आम्हाला तारणचा मार्ग दाखवतो. यात पुढील गोष्टींचा समावेश होतो; नीतिमान ठरवले जाणे (३:२४), परमेश्वराशी समेट होणे (५:१), एक नविन आत्मिक जीवन प्राप्त होणे (६-८), गौरव प्राप्त करणे, (शेवटी ख्रिस्तासारखे बनवले जाणे- ८:२९,३०). वरील सर्व गोष्टींसाठी ख्रिस्ताची सुवार्ता पुरेशी आहे.(प्रेषित ४:१२). येथे देखील पौल दुसऱ्या स्थानांप्रमाणेच भर देतो (जसे अन्य प्रेषित व ख्रिस्त नेहमी करत असत), विश्वासाने तारण आहे- ३:२२,२५,२८; ४:५; ५:१; १०:९,१०; गल २:१६; इफि २:८,९; योहान १:१२; ३:१६ इ.

**"यहूदी अतो की परराष्ट्रीय''** मत्तय १०:५,६; १५:२४; लूक २४:४७; प्रेषित १:८, ३:२६;१३:४६.

१:१७ **"नीतिमत्व''** हा शब्द रोमकरांस या पत्रात ३९ दा वापरला गेला आहे. येथे पौल शिकवतो की लोक परमेश्वराच्या दृष्टिकोनातून नीतिमान कसे ठरवले जाऊ शकतात; व नंतर त्यांच्याशी कशाप्रकारे योग्य संबंध कायम करतात हे केवळ विश्वासाने होते. ३:२८; ४:३-५ इ. तारण विश्वासाद्वारे आहे, याचा अर्थ मनपरिवर्तनाची (पश्चाताप) आवश्यकता नाही असा नव्हे. ख्रिस्तावर खरा विश्वास ठेवण्याची ही एकमात्र आवश्यकता नव्हे; ख्रिस्तावरील खऱ्या विश्वासाचा हा एक भाग आहे (२:४,५; मत्तय ३:२; मार्क १:१५; लूक १३:३-५; प्रेषित १७:३०). पश्चातापाशिवाय खरा विश्वास अशक्य आहे. परमेश्वराचा चांगुलपणा मानवी मनाचा पालट व विश्वास ठेवण्यास प्रोत्याहित करतो. विश्वासाआधी पश्चाताप असतो; पण हे एकमेकांशी इतके जुळलेले आहेत की यास विश्वासाचे प्रथम पाऊल म्हणता येते. हा विश्वासाच्या आज्ञापालनाचा एक भाग आहे. (१:५). पश्चातापाशिवाय विश्वास, विश्वास म्हटला जाऊ शकतो काय?

**"प्रकट होते''** या नीतिमत्वाला, मनुष्य परमेश्वरीय ज्ञानाशिवाय जाणूचशकत नाही.

**"जसे लिहिले आहे''**-येथे पौल दाखवतो की नीतिमत्ता व विश्वासा संबंधाने त्याने दिलेले शिक्षण बायबलच्या शिकवणीनुसार आहे. तो हबक्कूक २:४ कडे इशारा करतो. नव्या करारात याचा उल्लेख-गल ३:११ व इब्री १०:३८ मध्ये तीन वेळेस आलेला आहे.

१८ की ''नीतिमान विश्वासाने जगेल'' **यासाठी** की परमेश्वराचा दंड, त्या लोकांच्या सर्व दुष्टतेवर आणि अन्यायावर
१९ प्रकट होतो जे अनीतिने सत्य दाबून ठेवतात. **परमेश्वरा विषयी** प्राप्त होणरे ज्ञान, त्यांच्यात स्पष्ट-ठळकपणे दिसून
२० येते कारण परमेश्वराने ते त्यांना दाखवले आहे. **कारण** या सृष्टिच्या निर्मितीपासून त्याचे अदृश्य गुण स्पष्टपणे
दिसतात: त्यांचे सनातन सामार्थ्य व ईश्वरीय स्वभाव प्रकृतित पाहिला जाऊ शकतो या कारणाने ते कोणताहि बहाणा
२१ (सबब) करू शकत नाही. **यासाठी** की स्वर्गिय पित्याला औळखून सुद्धा, सर्वश्रेष्ठ परमेश्वर जाणून त्यांचे गौरव केले
नाही किंवा त्यांचे आभर मानले नाहीत; या उलट त्यांनी व्यर्थ गोष्टींचा विचार केला व त्यांचे मूर्ख मन अंधकाराने
२२,२३ भरून गेले **स्वत:ला** शहाणे समजले पण मूर्ख बनलेत. **त्यांनी** सृष्टिकर्त्याच्या गौरवाची, नाशवंत मनुष्य, पक्षी,
२४ चतुष्पाद पशु व सरपटणरे प्राणी यांच्या समानतेत अदलाबदल केली. **म्हणून** परमेश्वराने त्यांच्या मनात असणऱ्या
अभिलाषांमुळे होणाऱ्या अशुद्धतेच्या स्वाधीन त्यांना केले यासाठी की आपसांत त्यांनी एकमेकांच्या शरीराचा अपमान
२५ करावा. **त्यांनी** परमेश्वराच्या सत्या ऐवजी खोटेपणा निवडला आणि निर्माणकर्त्याला जो सदैव सन्माननिय

---

१:१८ **''दंड''** येथे परमेश्वराचे आणखी एक प्रकाशन प्रकटीकरण आहे. परमेश्वराच्या क्रोधाविषयी गणना २५:३; अनु ४:२५; स्त्रोत ९०:७-११; मत्तय ३:७; योहान ३:२६ आणि इफि ५:६ पहा.

**''स्वर्गातून''** - मनुष्याने या शिकवणीचा आरंभ केलेला नव्हता. प्रेमासारखीच ही शिकवण होती (५:८). परमेश्वराला प्रेमामुळेच क्रोध येतो. त्यांचे मानववावर प्रेम आहे. वाईटामुळे लोकांचे नुकसान होते व त्यामुळे त्यंना राग येतो. परमेश्वर नीतिमत्तेवर प्रीति करतात. म्हणून नीतिमत्वाच्या विरूद्ध येणाऱ्या गोष्टींवर त्यांना क्रोध येतो.

**''दाबून ठेवतात''** - ''थांबवतात'', ''बाधक बनतात'' वाईट लोक परमेश्वराला ओळखत नसल्यामुळे असेच करतात. जेत्यांना परमेश्वर किंवा पश्चाताप याकडे घेऊन जाते अशी परमेश्वराच्या किंवा स्वत:च्या बाबतीत कोणतीहि सत्यता ते दाबून टाकतात. परमेश्वरा विषयी चुकीची धारणा ठेवून सत्य नाकारतात व ज्योतिऐवजी अंधाराची निवड करतात. हे मोठे पाप व अंधार आहे (योहान ३:१८-२१; २ थेस्स २:१०-१२ शी तुलना करा.) या वचनापासून पुढे ३:२० पर्यंत पौल एका मुख्य विषयावर भर देतो; ती म्हणजे सर्वांची पापमय अवस्था आहेत. आपल्या पापाविषयी च्या सत्याला दाबण्याचा सर्वांनी प्रयत्न केला आहे. सर्व लोकांना परमेश्वराच्या क्रोधाला सामोरे जावयाचे आहे-३:९; १९,२३; इफि २:३ शी तुलना करा.

१:१९,२० लोक केवळ अजाणपणाने वाईट कृत्ये करत नाहीत. एका अद्भुत रचनाकाराने सृष्टि निर्माण केली, ही गोष्ट प्रकट आहे. तुलना करा स्तोत्र १९:१-४; यश ४०:२१-२६; प्रेषित १४:१५-१७. परंतु लोक या सत्याकडे आपले डोळे बंद करून ठेवतात (नकार सुद्धा करतात. स्तोत्र १४:१) मुद्दाम पाप करतात म्हणून त्यांचा हा बहाणा चालणार नाही. जर परमेश्वराने ज्ञान दिले नसते, बायबल नसते, ख्रिस्ताचे आगमन झाले नसते, तरी आपल्या वाईटाविषयी त्यांना अबोध म्हटले जाऊ शकले नसते. सृष्टिद्वारे परमेश्वराचे सत्य व त्याचे सामर्थ्य स्पष्ट दिसते. लोकांनी परमेश्वराचा विचार करून त्याची उपासना करावी. (प्रेषित १७:२६,२७). परंतु त्यांची तशी इच्छा नसल्यामुळे ते तसे करित नाहीत. त्यांना आपल्या वाईट जीवनाचे आकर्षण आहे, म्हणून चांगला, उच्चे व पवित्र मार्ग दाखवणाऱ्या परमेश्वरा विषयी ते विचार करित नाहीत.

१:२१-२३ येथे पौल मानवजातिच्या इतिहासाविषयी व मूर्तिपुजेच्या प्रारंभविषयी सांगतो, प्रारंभी लोक जगाच्या एका सत्य परमेश्वराला ओळखत होते; पण या मोठया आशीर्वादा संबंधी ते आभारी नव्हते. (वचन २८). परमेश्वराचा आदर व सन्मान हा त्यांच्या जीवनाचा हेतू होता पण त्यांनी तो पूर्ण केला नाही. (यश ४३:७; १करिंथ १०:३१; प्रकटी ४:११). आभार प्रदर्शनासाठी पहा लेवीय ७:१२,१३; स्तोत्र ७:१७; ५०:१४,१५; ५६:१२; १ थेस्स ५:१८ इ.

परमेश्वराच्या ज्ञानासंबंधी आभारी होण्याऐवजी त्यांनी कल्पना करून नविन मते आणि धर्म बनवायला सुरूवात केली. या सर्व गोष्टी मुळे त्यांचे मन अंधार (इफि ४:१८), गर्व व मूर्तिपुजेने भरून गेले. वचन २३ आणि २५ दाखवतात की मुर्तिपूजा काय आहे. निर्गम २०:४-६; स्त्रोत: २-८. यशा ४०:१८-२६; ४४:१२-२० परमेश्वराचे राष्ट्र जे सर्वात महान राष्ट्र होते. इस्त्राएलाजवळ परमेश्वराचे स्पष्ट ज्ञान होते. इस्राएल देखील इतर देशांप्रमाणेच दोषी होते - पहा यिर्म २:११,१२.

१:२२ परमेश्वराच्या दृष्टित मनुष्याचे ज्ञान रिकामे व व्यर्थ आहे. पहा १ करिंथ १:१८-२५; २:७,८. मुक्ति देणाऱ्या ज्ञानमार्गाविषयी लोक बोलतात, सृष्टिकर्त्याच्या दृष्टिने ते ज्ञान मूखपर्णा होय.

१:२३ यिर्म २:११-१३; होशेय ४:७,८ शी तुलना करा.

१:२४ वचन २६,२८ परमेश्वराजवळ पापदंड देण्याची एक पद्धत होती; ती म्हणजे त्यांचा त्याग करणे, त्या न्यायाकरिता जो पापामुळे त्यांच्यावर येणार. मुद्दाम जे लोक पाप करतात, त्यात त्यांना सोडून देऊन त्यांचा त्याग करणे हा सर्वांत मोठा आणि योग्यदंड आहे. तुलना करा. अनु ३२:१९-२२; शास्ते २:१०-१५.

१:२५ पापांत राहण्याच्या विरोधात, सत्य परमेश्वराचे ज्ञान त्यांच्या करिता एक अडथळा बनु शकले असते; म्हणून त्यांनी त्यास नकार दिला आणि खोटे विचार व चुकीचे शिक्षण याला आपल्या मार्गदर्शनाकरिता वापरले. रचनाकार व सृष्टि समानच आहेत हा विचार सर्वांत वाईट होता; आणि असे देखील की मानवाने बनवलेल्या मुर्तिसारखेच आहेत. सूर्य, चंद्र, तारे, पशु किंवा देवी-देवांच्या मुर्तिची उपासना, ईश्वराची उपासना आहे. हे संपूर्ण खोटे आहे. सत्य परमेश्वर अशी उपासना कधीच स्वीकार करत नाही. निर्ग. २०:३-६; १ राजे १८:२१; २ राजे १७:१४-१८; स्तोत्र ७८:५६-५९; नीति १:२९-३१; यिर्म २:११-१३; मत्तय ४:१०; प्रकटी ९:२०-२१; २१:८.

२६ आहे त्यांच्या ऐवजी सृष्टिची भक्ति केली. **यासाठी** परमेश्वराने त्यांना लज्जास्पद इच्छांच्या स्वाधीन केले; कारण
२७ स्त्रियांनी पुरुषांशी शारीरिक संबंध सोडून स्त्रियांशी विपरीत आचरण केले. **याचप्रकारे** पुरूशांनी स्त्रियांसोबत
नैसर्गिक उपभोग सोडून पुरुषांशी लाजिरवाण्या कर्मांची कामना केली. पुरुषांनी पुरुषांसोबत अनुचित व्यवहार
२८ केलेत आणि योग्य दंड भोगले जे त्यांना मिळणे आवश्यक होते. **कारण** जेव्हा त्यांनी आपल्या जीवनात
रचनाकाराला स्थान दिले नाही, तेव्हा परमेश्वराने देखील, त्यांना अनुचित कामे कारण्यास त्यांच्या विपरीत
२९ मनाच्या स्वाधीन केले. **ते** सर्व प्रकारच्या दुष्टतेने, लोभाने आणि हेव्याने भरून गेले; तसेच
३० कपट, हत्या, भांडणे, धोके आणि शत्रुत्वाने देखील भरून गेले. **ते** निंदक, चहाडी करणारे, परमेश्वराचा तिटकारा
३१ करणारे, गर्विष्ठ, बढाईखोर, कुकर्म करणारे आणि मातापित्याची आज्ञा न पाळणारे झालेत. **निर्बुद्धी,** वचन भंग
३२ करणारे, स्वाभाविक प्रेमहिन,आणि निर्दयी झालेत. **अशा** रीतिने वागणे म्हणजे मृत्युदंड प्राप्त करणे, आणि परमेश्वर
**२** न्यायी आहे हे ठाऊक असूनहि, ते स्वत: त्याच गोष्टी करतात आणि तसे करणाऱ्यांशी प्रसन्न होतात. **म्हणून** अहो
लोकांनो, तुम्ही जे दुसऱ्यांची टीका-टिप्पणी करता, तुम्हाला कोणतीच सबब (बाहाणा) नाही; कारण ज्या मुद्दयांवर
२ तुम्ही लोकांची निंदा करता, स्वत: तिच कामें करता. **आम्हाला** ठाऊक आहे की जे लोक असे करतात, त्यांच्या
३ विरोधात स्वर्गिय पित्याच न्यायदंड सत्यानुसार आहे. **तुम्ही** त्या सर्वांना अशा गोष्टी करण्याबाबत दोषी ठरवता; व
स्वत: तिच कामें करता, तर तुम्ही परमेश्वराच्या न्याय/दंडापासून सुटाल काय? तुम्ही त्यांच्या चांगुलपणाच्या धनाला,
सहनशिलतेला आणि संयमाला व्यर्थ समझता व हे जाणत नाही की देवबापाचा चांगुलपणा तुम्हाला मन:परिवर्तन

---

१:२६,२७ समलिंगी संबंधाला परमेश्वर आपल्या वचनात वाईट कृत्य ठरवतात. पहा उत्पत्ति १९:४,५; लेवीय १८:२२२; २०:१३; १करिंथ ६:९;१ तीमथ्य १:१० यहूदा ७. हा मनुष्याच्या शरीराचा किंवा वाईट स्वभावाचा परिणाम आहे ज्यापासून लोकांना मुक्ति मिळावयास हवी. (या पत्राच्या ६ व ८ वया अध्यायाचे अध्ययन करा) पौल म्हणतो की मनुष्याला त्याच्या अभिलाषेवर सोडून देण्याच्या रूपात, जो दंड होता, त्या कारणाने असे झाले. पुरूषांचे पुरूषांशी व स्त्रियांचे स्त्रियांशी यौन संबंध ठेवण्याची इच्छा घाणेरडी व अस्वाभाविक आहे. सध्या लोक या प्रकाराला जगण्याची नविन पद्धत मानीत आहेत. बायबलच्या मते ही दुष्टता आहे, यामुळे दंड येतो (प्रकटी २१:८) जर दोषी आपली वाईट कृत्ये मान्य करतो, पूर्ण हृदयाने जुणे जीवन त्यागतो व विश्वास करतो, तेव्हा परमेश्वर त्याच्या वर प्रेम व दया करून त्याचा स्वीकार करतात, असेच ते प्रत्येका सोबत करतात.

१:२८ या भयानक व शब्दांकडे लक्ष दया सृष्टिकर्त्याचे ज्ञान हे मानवाला दिलेले मोठे धन होय. जगाच्या तुलनेत हे विशाल व विपुल आहे. (स्तोत्र १९:१०; ११९:७२; नीति २:१-५; यिर्म ९:२३; २४) शी तुलना करा. मानवजातिने या धनाची किंमत जाणली नाही. देवबापाने त्यांना घृणित, दुष्ट गोष्टींच्या स्वाधीन होऊ दिले; ज्यांस त्यांनी निवडले व ज्यांवर त्यांनी प्रेम केले.

१:२९-३२ पौल मनुष्य जातिच्या वर्तमान अवस्थेचे वर्णन करतो. ही वाढवून किंवा फुगवून सांगितलेली गोष्ट नाही. प्रत्येक पापाचे बी आमच्यात आहे, तरीहि प्रत्येक व्यक्ति या सूचित दिल्या गेलेल्या पापांचा अपराधी नाही. या शब्दानुसारच लोकांचे जीवन आहे. पहा ३:९-१९; उत्पत्ति ८:२१; स्तोत्र ५१:५; यिर्म १७:९; मत्तय ७:११; १५:१९,२०; इफि २:१-३; ४:१७-१९.

१:३० **"स्वर्गिय बापाचा तिटकारा"** (द्वेष) करणारे - ही खरी गोष्ट आहे. पहा ८:७; योहान ७:७; १५:१८-२४.

१:३२ लोकांच्या दुष्टतेचे हे सर्वात मोठे प्रमाण होय. त्यांना चांगले वाईट याचे ज्ञान आहे आणि माहित आहे की पापाचा उचित दंड मृत्यु आहे. (५:१२; उत्पत्ति २:१७; निर्ग २१:३६; इब्री २:१५) तरी देखील ते पापापासून वाचू शकत नाही. स्वत:च्या दुष्टतेत कायम राहून त्यांनी दुसऱ्यांच्या दुष्टतेतहि आनंद घेतला. जे असे करतात, त्यांच्यापेक्षा स्वभावाने आम्ही चांगले आहोत काय ? नाही. पहा ३:९; इफि २:३. सुवार्ता अशा लोकांसाठी काही करू शकते काय ? होय. अद्‌भुत गोष्टी. पहा वचन १६.

२:१ दुसऱ्यांचे मूल्यमापन करण्याचा अर्थ म्हणजे त्यांना खरे खोटयाचे ज्ञान आहे, असे कोण करित नाही? परंतु जर दुसऱ्यात काही वाईट आहे तर आपल्यातंहि ते आहेच. दुसऱ्यावर दोष लावण्यापेक्षा आपण स्वत:वर सुद्धा दोष लावतो.

२:२ येथून १६ वचनापर्यंत पौल परमेश्वराच्या शिक्षेचे/दंडाचे सात सिद्धांत दाखवतो-
हे वास्तविक स्थितिवर अवलंबून आहे; लोक काय विचार करतात यावर नव्हे (वचन २)
हा योग्य न्याय असेल -पूर्णतया प्रामाणिक न्याय (वचन:५) हा या आधारे होईल की लोकांनी काय केले आहे. (वचन ६) हा न्याय नि:पक्षपाती पणे होईल - मग कोणी यहूदी असो किंवा परराष्ट्रीय काळा किंवा गोरा, श्रीमंत किंवा गरीब (वचन ११) पौलाने दिलेल्या वचनानुसार होईल (वचन १६) मनुष्याच्या गुप्त पापांचा देखील न्याय होईल. (वचन १६)

२:३ दुसऱ्यांची मोजमाप करणारे असा विचार करू शकतात की ज्यांच्यात चुका/उणीवा सापडतात त्यांपेक्षा ते चांगले आहेत, ते दुसऱ्यांना पारखू शकतात, हा विचार खोटा व धोक्याचा आहे, जगाच्या न्यायाधिशा समोर सर्व लोकांना उभे राहावयाचे आहे -प्रेषित १७:३१; २ करिंथ ५:१०; प्रकटी २०:११,१२.

२:४ निर्माणकर्त्याच्या कृपेप्रति लोक इतके कठोर का होतात ? आज्ञाभंग व पापात कायम राहण्यात, त्यांची सुवार्ता व पुत्राकडे दुर्लक्ष करण्यात ते पुढे का असतात. मत्तय २२:१-६; लूक १४:१६-२४; इब्री २:३ शी तुलना करा. परमेश्वराच्या दयेचा उद्देश्य पहा. निर्ग ३४:६,७; यात परमेश्वराचे चरित्र यावरील नोट्स पहा.

५ शिकवतो. **परंतु** आपल्या हटवादीपणाने व कठोरपणाच्या आत्म्यामुळे तुम्ही परमेश्वराचा क्रोध त्याच्या ओतण्याच्या
६ व खरा न्याय प्रकट होण्याच्या दिवसासाठी दंड साठवून ठेवत आहात. **परमेश्वर** बाप प्रत्येक व्यक्तिला त्याच्या
७ कर्मानुसार फळ देतील. **जे** लोक धीराने चांगली कामे करीत गौरव महिमा व अमरत्व मिळवण्याची कामना करतात,
८ त्यांना प्रभु परमेश्वर सार्वकालिक जीवन देतील. **जे** लोक स्वार्थ -शोधक आहेत खऱ्याचा स्वीकार करत नाहीत,
९ परंतु अनीतिमत्वाप्रति समर्पित आहेत, परमेश्वराचा कोप व दंड प्राप्त करतील. **प्रत्येकजण** जो दुष्टतेची कामे करतो
१० त्यांच्यावर क्लेश व दु:ख ओढवतील; प्रथम यहूदी व्यक्तिवर व नंतर परराष्ट्रीयांवर; **परंतु** प्रशंसा, आदर व शांती
११,१२ त्या प्रत्येक व्यक्तिसाठी आहे; प्रथम यहूदी आणि मग परराष्ट्रीय. **कारण** परमेश्वर कोणाचाहि पक्ष घेत नाही. **ते**
सर्व ज्यांनी नियमशास्त्राला समजण्याची संधि गमावली, त्यांचा न्यायनियमशास्त्राव्यतिरिक्त होईल; परंतु ज्यांनी
१३ नियमशास्त्र असूनहि पाप केले, त्यांचा न्याय नियमशास्त्रानुसार होईल, **यासाठी** की नियमशास्त्र ऐकणारे देवाच्या
दृष्टिने निर्दोष समजले जाणार नाही; परंतु ते जे नियमशास्त्रानुसार जीवन जगतात तेच निर्दोष ठरविण्यात येतील.
१४ **कारण** जेव्हा परराष्ट्रीय ज्यांच्या जवळ नियमशास्त्र नाहीं परंतु स्वभावानुसारच ते नियमशास्त्रानुसारआचरण
१५ करतात, ते आपल्या मनातच नियमशास्त्राचे नाही तरीहि. **नियम शास्त्राच्या** ज्या गोष्टी ते आपल्यात हृदयात
दाखवतात आणि त्यांच्या विवेक ज्या गोष्टींची साख देतो व कधी-कधी त्यांचे विचार दोष लावणारे किंवा निर्दोष
१६ ठरवणारे असतात; **हे** सर्व त्या दिवशी होईल ज्यादिवशी परमेश्वर माझ्या सुवार्तेप्रमाणे येशू ख्रिस्ताच्या द्वारे लोकांच्या
१७ गुप्त गोष्टींचा न्याय करतील. **तुम्ही** जर स्वत:ला यहूदी म्हणवता व नियमशास्त्रावर भरंवसा ठेवता तसेच

---

**"मनपरिवर्तन/पालट"** मत्तय ३:२८; लूक १३:१-५.

२:५ **"क्रोध"**-१:१८ सुवार्तेस नकार देणारे काय करतात हे पहा. प्रत्येक वाईट कामासाठी जे ते करतात; परमेश्वराच्या क्रोधाला स्वत:च्या विरोधात ओढवून घेतात. देवबापाच्या ठरविलेल्या दिवशी तो क्रोध त्यांच्यावर ओढवला जाईल.

२:६ स्तोत्र ६२:१२; नीति २४:१२; गल ६:७,८; प्रकटी २२:१२.

२:७ कार्यावर आधारित तारण, याबाबत पौल शिकवित नाही. तो केव्हाहि असे करित नाही. पहा ३:२८; ४:५; २:१६; इफि २:८,९; तीतला ३:५ याठिकाणी तो परमेश्वराच्या न्यायाचा सिद्धांत मांडत आहे, तारणाचा मार्ग नव्हे. लोकांनी काय केले व काय केले नाही याच्या आधारे परमेश्वर बाप न्याय करतील. मत्तय २५:३१-४६ (वचन ३५,३६ चे नोट्स). ज्या लोकांना देवबाप कृपेने वाचवतात त्यांना ते आपल्या सामर्थ्याने बदलतात. ते लोक निर्माणकर्त्यांची नवीसृष्टि, स्वर्गिय बापाचे पुत्र-कन्या बनतात (२करिंा ५:१७; योहान ३:३-८). कारण असे आहे की ते सत्कर्मे करतात व स्वर्गिय पित्याकडून मिळणारी महिमा, आदर यांची त्यांना आवड असते.

परमेश्वर अशा लोकांना आपला व सार्वकालिक जीवनाचा पूर्ण भंरवसा ठेवल्याने सुरू झाले होते. (योहान ३:३६; ५:२४). परमेश्वरावरील प्रेमावर व चांगल्या कामावर अवलंबून नव्हते. हा परमेश्वराने त्यांच्यात केलेल्या कार्याचा परिणाम होता. ख्रिस्तावर विश्वास आहे असे म्हणून या वचनात लिहिल्याप्रमाणे जे करत नाहीत ते स्वत:ला फसवतात; त्यांनी तारणाचा अनुभव घेतलेला नाही. मत्तय ५:१; ७:२४-२७; याकोब २:१४-१९,२६ पहा.

२:८ **"स्वर्गशोधक"**-फक्त दोन प्रकारचे लोक असतात. एक ते जे सत्याचा अवलंब करतात आणि केवळ सत्य स्वर्गिय बापाचा स्वीकार करतात. (६:३३). दुसरे ते. जे सत्याला नाकारतात. आणि स्वार्थी आहेत-कुटूंब, नांव,धन, अधिकार इत्यादिंची त्यांना आवड असते. दुसऱ्या प्रकारचे लोकस्वर्गिय पित्याच्या क्रोधाचा सामना करतील. वचन १८. योहान ३:३६; इफि ५:६; २ थेस्स १:५-१०.

२:९-१० ही गोष्ट प्रथम यहूदयांसाठी सत्य आहे, कारण त्यांना सर्वात आधी ही सुवार्ता दिली गेली होती १:१६.

२:११ परमेश्वर एखादया व्यक्तिला यासाठी सोडून देणार नाही जो म्हणतो की मी यहूदी किंवा ख्रिस्ती आहे व स्वत:ला परमेश्वराचा समजतो. असा व्यक्ति अधिक जास्त सत्य जाणू शकतो. म्हणून जर तो आज्ञा मानत नसेल तर जास्त शिक्षेस पात्र राहील.

२:१२ **"नियमशास्त्र"** ते वचन आहे जे मोशेद्वारे परमेश्वराने दिले होते निर्गम २० पहा. जर त्या पुस्तकात परमेश्वराचे ज्ञान नव्हते तर मग त्यांना दंड का मिळेल; यासाठी की ते असे पापी होते ज्यांनी प्रकृतित/निसर्गात परमेश्वराचे ज्ञान पाहिले परंतु त्यास नकार दिला. १:१८-२०,२८.

२:१३ स्वर्गिय पित्याचे वचन ऐकणे पुरेसे नव्हते. कर्मानुसार नीतिमान ठरवले जाण्याकरिता त्यांनी तसे जगायचे होते. येशूस वगळता कोणीहि असे करण्यास समर्थ नव्हते-३:९,१९,२३; याकोब २:१०; निर्ग १९:२१-२५.

२:१४-१५ ज्यांनी मोशेचे वचनऐकले नव्हते ते देखील उचित व अनुचित असा भेद करू शकत होते. ही अशी गोष्ट आहे जी परमेश्वरांनी प्रत्येकात ठेवली आहे. विवेक प्रेषित २३:१ वरील टीप पहा.

२:१६ प्रेषित १७:३१.

२:१७ नीतिमान व स्वधर्मी यहूदी अशा लोकांचे नमुने होते जे दुसऱ्यांचे मूल्यमापन करतात-वचन १ लूक १८:९-१२. त्यांचा विचार होता की मोशे द्वारे दिल्या गेलेल्या निर्देश नियमांचे पालन केल्याने पापक्षमा प्राप्त होते. (योहान ५:३९,४५) आम्ही परमेश्वराचे आहोत, या विचाराने ते गर्विष्ठ झाले होते. योहान ८:४१.

१८ निर्माणकर्त्याविषयी असललेल्या संबंधाचा अभिमान बाळगता. **आणि** जर तुम्हांला त्यांची इच्छा कळते आणि
१९ नियमशास्त्राचे शिक्षण मिळाल्यामुळे तुम्ही उत्तम गोष्टींना योग्य ठरवता; **जर** तुम्हाला असा भरंवसा आहे की तुम्ही
२० आंधळयांना वाट दाखवणारे; आणि जे अंधारात आहेत त्यांच्या साठी प्रकाश आहात; **जर** तुम्ही मूर्खांना शिकवणारे,
लहान मुलांना शिकवणारे आहात, यामुळे की तुमच्या जवळ नियमशास्त्राचे ज्ञान व सत्याचे आवश्यक तत्व आहेत;
२१,२२ **म्हणून** जे तुम्ही दुसऱ्यांना शिकवता, ते तुम्ही स्वत:लाच शिकवित नाही काय? **तुम्ही** शिकवता की व्यभिचार करू
२३ नका, पण स्वत: तसे करता? तुम्ही जे मुर्त्यांचा तिटकारा करता, ते तुम्ही स्वत: मंदिर लुटत नाही काय? **तुम्ही**
तर नियमशास्त्राचा अभिमान करता, परंतु नियमशास्त्राचे पालन न केल्याने यहोवा परमेश्वराचा अपमान करत
२४,२५ नाही काय? **जसे** की लिहिले आहे. "तुमच्यामुळे परराष्ट्रीयांमध्ये परमेश्वराच्या नावाची निंदा होत आहे. **जर** तुम्ही
नियमशास्त्राचे पालन करता तर सुंतेचा काही लाभ आहे; पण जर तुम्ही नियम शास्त्राचे उल्लघंन करणारे
२६ आहात तर सुंता झालेली असूनहि सुंता न झालेल्याप्रमाणे आहात. **म्हणून** जर एखादा सुंता न झालेला,
२७ नियमशास्त्राचे नियम मानतो तर, तो सुंता झालेली नसतांना देखील सुंता झालेला गणला जाणार नाही काय ? **जर**
२८ एखादया व्यक्तिची शारीरिक सुंता झालेली आहे आणि **तो** नियमशास्त्रानुसार जीवन जगतो; तर तुम्हीच सांगा, तुम्ही
शास्त्रलेख प्राप्त करूनहि आणि सुंता करूनहि, जर नियम शास्त्राचे पालन करित नाही तर तो तुम्हाला आरोपी
ठरवणार नाही काय? तो व्यक्ति यहूदी नव्हे जो यहूदी आई-वडिलांद्वारे जन्माला आहे आणि ती सुंता जी केवळ
२९ दाखवण्यासाठी असते त्याला काही अर्थ नाही. **जो** आंतरिक रीतिने यहूदी आहे, तोच खरा यहूदी आणि मनाची सुंता
तीच आहे जी परमेश्वराच्या आत्म्यापासून आहे, लेखी नियम पालना द्वारे नव्हे; अशा व्यक्तिची प्रशंसा लोकांतर्फे
**३**,२ नाही परंतु परमेश्वराकडून होते. **एक** यहूदी असण्यात काय लाभ? किंवा सुंता केल्याचा काय फायदा? **पुष्कळ** फायदे
३ आहेत कारण परमेश्वराचे वचन त्यांना सोपून दिले होते. **जर** काही लोकांनी विश्वास केला नाही तर काय झाले?
४ त्यांचा अविश्वास स्वर्गिय बापाच्या विश्वासपात्रतेला प्रभावहिन करू शकतो काय ? **अजीबात** नाही. परमेश्वर सत्य
आणि प्रत्यके मनुष्य खोटा ठरो. जसे लिहिलेले आहे की " तुम्ही आपल्या वचनात नीतिमान ठरावे आणि तुमच्या
५ न्याय होत असतांना तुम्हास जय मिळो.'' **जर** आमची अनीति परमेश्वराचे नीतिमत्व दाखवते तर आम्ही काय

---

२:१८-२३ त्यांच्याजवळ मोशेचे वचन असल्यामुळे त्यांचा विचार होता की ते दुसऱ्यांना शिकवू शकत होते. जे काही ते शिकवायचे त्याचे पालन मात्र ते स्वत: करित नव्हते. आजच्या अनेक ख्रिस्ती लोकांबद्दल सुद्धा असे म्हटले जाऊ शकते की जे ते दुसऱ्यांना शिकवताात त्याचे आचरण स्वत: करत नाहीत. मोशेच्या पुस्तकानुसार असे न करणे म्हणजे परमेश्वराचा अपमान होता. स्तोत्र ५१:४ शी तुलना करा.

२:२४ जुणा करार जो यहूदयांचा अयशस्वीपणा दाखवतो त्याकडे पौल इशारा करतो, आणि आपल्या अपराधाची पुष्टी करून यहूदयांचा पराभव दाखवतो -यशा ५२:५; यहे ३६:२२. स्वर्गिय पित्याचे लोक असण्याचे ठामपणे सांगून व वाईट जीवन जगून त्यांचा अनादर करयापेक्षा तसे न म्हटलेले बरे.

२:२५-२९ सुंता यहूदी लोकांसोबत संबंध व कराराचे चिन्ह होते. उत्पत्ति १७:९-१४ चे नोट्स पहा. पुष्कळसे यहूदी अशा विचारांचे होते की या शारीरिक चिन्हामुळे ते परमेश्वराचे लोक आहेत; मग नियम पालन केले नाही तरी चालेल. पौल म्हणतो की यहूदी धार्मिक-नैतिक नियमांचे पालन व मनुष्याची आंतरिक अवस्था, शरीराच्या कोणत्याहि चिन्हापेक्षा अधिक महत्वपूर्ण आहे. मत्तय ३:९; २३:२५-२८ सुंतेविषयी पौलाचे शब्द बाप्तिस्मा किंवा अशी एखादी विधि जी दुसऱ्यांवर केली जाते, समान रूपाने लागू केली जाऊ शकते. एखादा व्यक्ति अंत:करणातून खरा विश्वासू असतो, आंतरिक कार्य बाप्तिस्मया द्वारे दिसते. मत्तय १६:१६; प्रेषित २:३८ या परिवर्तनाशिवाय याचे काहीच मोल नाही. जे आंतरिक दृष्टिने परमेश्वराचे लोक आहेत ते परमेश्वराकडूनच शाबासकीची अपेक्षा करतात, मनुष्यापासून नव्हेच. योहान ५:४४;१२:४३ शी तुलना करा.

३:१ पौलाने सांगितले होते की यहूदी दुसऱ्यांपेक्षा चांगले/उत्तम नाहीत. त्याला पापक्षमा, धर्म किंवा धार्मिक क्रियांद्वारे प्राप्त होत नाही. परराष्ट्रीयांना ज्याप्रमाणे दोषी ठरवले जाते तसेच यहूदयांना सुद्धा तो अपराधी ठरवतो. म्हणून प्रश्न हा आहे की यहूदयांना इतर लोकांपेक्षा वेगळे करण्याचा काय अर्थ? त्यांना नियम, रीति, विधि इत्यादी देण्याचा अर्थ काय?

३:२ ९:४,५ देखील पहा. त्या दिवसात इतर दुसऱ्या लोकांच्या तुलनेत यहूदी लोकांना परमेश्वराचे वचन ऐकणे, विश्वास करणे व सत्य स्वर्गिय बापाची सेवा करण्याची संधि अधिक उपलब्ध होती. यहूदी होण्याचा हा सर्वात मोठा फायदा होता.

३:३ यहूदयांनी आज्ञाभंग करणे, अविश्वासू राहणे, व संधिचा फायदा न घेणे यात परमेश्वराचा काय दोष होता? परमेश्वर विश्वासूच राहिलेत. (२ तीमथ्य २:१३). इस्त्राएल राष्ट्रासाठी ज्या प्रतिज्ञा आहेत. त्यांना परमेश्वर पूर्ण करतील (वचन११)

३:४ स्तोत्र ५१:४.

३:५-७ त्यांतील काही लोकांनी असे म्हणण्याचे धाडस केले की त्यांच्या अविश्वासूपणामुळे दुष्ट मार्गामुळे, परमेश्वराची नीतिमत्ता व विश्वासूपणा जास्त महिमामय रीतिने प्रकट झाला; म्हणून जणू काही त्यांनी परमेश्वरावर उपकार केले या साठी परमेश्वरांने त्यांना अजिबात दोषी ठरवू नये.

६ म्हणावे ? मनुष्यावर दंड आणल्यामुळे परमेश्वर अन्यायी आहेत. ? (मी मानवी व्यवहाराप्रमाणे बोलत आहे) **मुळीच**
७ नाही, कारण असे झाले तर परमेश्वर लोकांचा न्याय कसा करतील? **म्हणून** जर माझ्या खोटया बोलण्याद्वारे
८ परमेश्वराचे सत्य त्यांचा मान वाढवत असेल तर मी परमेश्वराच्या दृष्टित दोषी का ठरावे ? **या** ऐवजी आपण असे
का म्हणू नये (ज्याप्रमाणे आमच्यावर आरोप लावला जातो की आम्ही असे मानतो)"आपण वाईट करावे ज्यामुळे
९ बरे उत्पन्न व्हावे''? त्यांना अपराधी ठरवणे अगदी उचित आहे. **तर** मग काय करावे ? आम्ही त्यांच्या पेक्षा श्रेष्ठ
आहोत काय? नाही कधीच नाही; यासाठी की आम्ही आधीच हा दोष लावला आहे की दोन्ही, यहूदी व परराष्ट्रीय
१०,११ परमेश्वराच्या दृष्टित अपराधी आहेत. **असे** लिहिलेले आहे की "कोणीहि नीतिमान नाही एक देखील नाही, **कुणीहि**
१२ समंजस नाही किंवा परमेश्वराचा भुकेला नाही.'' **ते** सर्व बहकले आहेत निरूपयोगी झाले आहेत. एकहि कोमलता
१३ दाखवित नाही,एक देखील नाही. "**त्यांचा** घसा उघडया कबरेसारखा आहे. ते आपल्या जीभेने खोटे बोलतात, त्यांच्या
१४,१५ ओठांच्या खाली सापाचे विष आहे, **त्यांचे** तोंड शापाने व कडूपणाने भरलेले आहे. **त्यांचे** पाय रक्तपात करण्यास
१६,१७,१८ उताविळ झाले आहेत. **त्यांच्या** मार्गात विध्वंस व विपत्ति आहे. **ते** शांतीचा मार्ग जाणत नाहीत. **त्यांच्या** डोळयात
१९ स्वर्गिय पित्याचे भय नाही.**आता** आम्हाला ठाऊक आहे की नियमशास्त्र जे काही सांगते ते त्यांनाच सांगते जे त्यांच्या
२० आधीन आहेत; यासाठी की प्रत्येक तोंड बंद वहावे व सर्व जग परमेश्वरासमोर शिक्षेस पात्र ठरावे. **म्हणून**
नियमशास्त्राच्या पालनाने कोणीहि स्वर्गिय बापाच्या दृष्टित निर्दोषी ठरवला जाणार नाही कारण नियमशास्त्राद्वारे

---

३:८ वर लिहिलेल्य गोष्टी पौलाच्य शिकवणुकीचा एक भाग आहे अशी निंदा काही लोकांनी केली. असे बोलून ते आपल्या दोषी विवेकास दाबून पौलाने सांगितलेल्या शिकवणुकीपासून स्वत:ला वाचवण्याचा प्रयत्न करतात. पौल म्हणतो की अशा लोकांना नरक पाठवून परमेश्वर अगदी योग्य कार्य करतात.

३:९ पौलाचा अर्थ असा आहे; यहूदी ज्यांना परमेश्वराचे नियम व विधिंची संधि होती तरी ते परराष्ट्रीयापेक्षा चांगले नव्हते ? ख्रिस्ती लोक हाच प्रश्न विचारू शकतात की दुसऱ्या धर्मपेक्षा ते चांगले आहेत? उत्तर आहे-नाही. सर्व दोषी आहेत मग ते यहूदी असोत की परराष्ट्रीय, कोणताहि धर्म, राष्ट्र किंवा जात असो. श्रीमंत, निर्धन शिक्षित, अशिक्षित, मूर्ख, बुद्धिमान, जे नाहीत -ते सर्व अनीतिमान आहेत. काही लोक स्वत:ला दुसऱ्यांपेक्षा चांगले समजतात.(पहा यश ६५:५; लूक १८:९) ते पौलाच्या प्रश्नाचे होकारार्थी उत्तर देतील. त्यांची आवश्यकता आणि ते काय आहेत, या संबंधी त्यांनी परमेश्वरापासून काहीच प्राप्त केले नाही.

३:१०-१८ पौल म्हणतो की त्याचे शिक्षण बायबलच्या प्रथम मार्गाच्या अनुरूप आहे. पहा की तो याचा आरंभ कसा करतो-"लिहिले आहे की आपण देखील याच प्रकारे विचार करावा की परमेश्वर बायबल मध्ये काय म्हणतात ४:३.

३:११-१२ स्तोत्र १४:१-३; १-३ उपदेशक ७:२०.

३:१३ स्तोत्र ५:९; १४०:३.

३:१४ स्तोत्र १०:७.

३:१५-१७ यश ५९:७,८.

३:१८ स्तोत्र ३६:१ **"स्वर्गिय पित्याचे भय''** उत्पत्ति २०:११; ईयोब २८:२८; स्तोत्र ३४:११-१४; ८६:११; १११:१०; नीति १:७; १पेत्र१:१७; २:१७; प्रगटी १५:४; १९:५. इतर वाईट व्यवहारांचे हेच मुख्य कारण आहे. परमेश्वराच्या भया व्यतिरिक्त मनुष्य वाईटापासून दूर जाऊ शकत नाही. पौलाचे म्हणणे असे नव्हते की वर दिलेल्या प्रत्येक पापापैकी प्रत्येक व्यक्ति प्रत्येक पाप करतो. त्याचा अर्थ येथे मानव जातिशी आहे, प्रत्येक व्यक्तिजवळ पापी स्वभाव आहे आणि नीतिमत्ता नाही.

३:१९ **"नियमशास्त्र''** -याचा अर्थ बायबलचा प्रथम भाग जो सिनाय पर्वतावर परमेश्वराने मोशेला दिला होता. यहूदी लोक मानित आसत. पौलाचे लक्ष्य १:१८ मध्ये दिसते. त्याने ही गोष्ट पुढे ठेवले होती की प्रत्येक व्यक्ति परमेश्वरापुढे अपराधी आहे. त्याला ख्रिस्ताच्या सुवार्तेची गरज आहे. सृष्टि (१:१८-२०), मनुष्याची इतिहास (१:२१-२८), मानवाची वर्तमान अवस्था (१:२९-३२), विवेक (२:१५) आणि प्रथम भागात प्रकट केलेले सत्य (३:१०-१८) या गोष्टींची घोषणा करतात की या पृथ्वीवर सर्व अनीतिमान आहेत. सर्व दोषी आहेत. ते आपल्या अपराधांप्रति जबाबदार आहेत. ते स्वर्गाच्या स्वामीद्वारे दंडप्राप्तीच्या योग्य आहे. परमेश्वरासमोर कोणीहि सबब देऊ नये, किंवा स्वत:ला दुसऱ्यांपेक्षा चांगले समजू नये.

आपले तोंड बंद करून काहीहि न लपवता जे आपली दशा मान्य करतात, ते आशीर्वादित लोक आहेत -असे लोक तारणाजवळ असतात. अशा लोकांसाठी स्वर्गिय बापाकडे काही चांगल्या गोष्टी आहेत. या सत्याबद्दल लूक १८:९-१४ यांत एक छोटी टीप आहे. जे लोक स्वत:ला दुसऱ्यांपेक्षा उत्तम समजतात, ते परमेश्वराच्या दृष्टित काय आहेत हे कळले. आपली स्थिती योग्य प्रकारे समजणारे लोक तारणाच्या अद्भुत सत्याला नीत समजतात.

३:२० देवबापाने इस्त्राएलाला मोशेच्या विधि - आज्ञांच्या माध्यमाने जे काही दिले तेच 'नियम' आहेत. या गोष्टींचे पालन धोक्याचे नाही पण याद्वारे तारणप्राप्ती होऊ शकत नाही. दुष्ट स्वभावामुळे पवित्र सिद्धांतांचे पालन अशक्य आहे. एका नियमाला तोडणे म्हणजे सर्व नियमांना तोडणे (याकोब २:१०).

२१ बऱ्यावाईटाची जाणीव होते **परंतु** आता स्वर्गिय पित्याचे नीतिमत्व ज्याची साक्ष मोशे आणि संदेष्टयांची पुस्तके देतात
२२ ती नियमशास्त्राव्यतिरिक्त प्रकट झाली आहेत.**स्वर्गिय** पित्याचे नीतिमत्व येशू ख्रिस्तावर विश्वास ठेवल्याने सर्व
२३ विश्वासूंसाठी आहे, मग ते कोणीहि असोत.**सर्वांच्या** जीवनात कमरतता राहीली आहे व स्वर्गिय बापासमोर सर्वजण
२४,२५ खोटे ठरले आहेत. **परंतु** येशू ख्रिस्ताच्या कृपेने ते विनामूल्य निर्दोष ठरविले गेले आहेत; **ज्या** दयेच्या स्थानी
२६ विश्वासाने आम्ही पोंचता तेथे त्यांच्या मृत्यु समयी परमेश्वराने त्यांना (येशू) पुढे ठेवले. **यासाठी** की त्यांचे
नीतिमत्व व्यक्त व्हावे आणि त्यंनी (परमेश्वर) येशूवर विश्वास ठेवणाऱ्यांना नीतिमान ठरवावे व स्वत: देखील
२७ नीतिमान असावे. **मग** गर्व कोठे राहिलां ? याला तर जागाच नाही आणि जर आहे तर कोणत्या सिद्धांताने ? नाही

---

**''निर्दोष ठरवले''** याचा अर्थ अबोध किंवा नीतिमान ठरवले जाणे. या पत्राचे हे मुख्य शिक्षण आहे. हाच मुद्दा शुभवर्तमानाचे केंद्र आहे. पुढील वचनात पौल या वचनांचा अर्थ सांगतो.

३:२१-२६ **''परंतु''** (वचन २१) इफि २:४; तीतला ३:४ शी तुलना करा. हा शब्द, एक संपूर्ण बदल दर्शवितो. सर्व लोकांचे पाप व अपयश दाखवल्यानंतर पौल दंडापासून सुटण्याचा मार्ग दाखवतो. याठिकाणी नीतिमत्वाचा अर्थ ते सर्व जे नीतिमान देवबापासामोर उभे राहण्यास आवश्यक आहे ते हे असे नीतिमत्व आहे जे स्वाभाविकपणे कोणत्याहि व्यक्तिकडे नसते (वचन २३). ते देवबापापासून प्राप्त होते. (वचन २१) म्हणून यात अपूर्णता किंवा खोटेपण नाही. याचा संबंध नियमांशी नाही (वचन २१) -स्वर्गिय पित्याच्या आज्ञा पालनाद्वारे हे प्राप्त होत नाही. पुष्कळ लोक या प्रकारे प्राप्त करू पाहतात (१०:१-५ पहा). हे कठीणच नव्हे तर अशक्य होय. या विषयी संदेष्टयांच्या व मोशेच्या पुस्तकात लिहिलेले आहे. (वचन २१) - ही काही नविन विचित्र गोष्ट नाही. (उत्पत्ति १५:६; हबक्कूक २:४). नालायक दुष्टांसाठी निर्माणकर्त्याच्या कृपेचे हे बक्षिस आहे; जो कोणी याचा स्वीकार करतो याला परमेश्वर विनामूल्य देतात (वचन २२) याला विश्वास ही प्राप्त केले जाते.(२५; १:१६,१७). म्हणून याच्या प्राप्तीसाठी आपल्या कर्मांवर भरंवसा ठेवण्याऐवजी येशूवर विश्वास ठेवा. खरे पाहिले तर हे नीतिमत्व येशू ख्रिस्तच आहेत. ज्यांच्या ठायी पूर्ण नीतिमत्व वास करते. या नीतिमत्वाची तुलना एका स्वच्छ वस्त्राशी केली आहे. पहा (यशा ६१:१०; जखऱ्या ३:३-५; मत्तय २२:११,२२). यशा ६४:६ दाखवते की आपल्यायाल याची किती गरज आहे. जेव्हा आपण ख्रिस्तावर भरंवसा ठेवतो, तेव्हा परमेश्वर आपल्यावर ख्रिस्ताच्या निष्कलंक नीतिमत्तेचे पांघरूण घालतात.

लोकांचे नीतिमत्व येशूच्या मृत्युवर आधारित आहे. (वचन २४,२५). जो पर्यंत लोकांचे अधर्म हटवले जाणार नाहीत तो पर्यंत न्यायाची परमेश्वर त्यांना नीतिमान ठरवू शकत नाहीत. परमेश्वराचे नियम आपल्याला दोषी ठरवतात व शिक्षेस पात्र सुद्धा. परमेश्वर आपल्या नियमांच्या विपरीत जाऊ शकत नाहीत. आपण शिक्षेपासून कसे वाचू शकतो? ते आपल्या कसे क्षमा करू शकत नाहीत. आपण शिक्षेपासून कसे वाचू शकतो? ते आपल्याला कसे क्षमा करू शकतील ? आपल्याला नीतिमान कसे समजतील? असे शक्य आहे कारण येशूने आमचे स्थान घेतले आहे. आमची शिक्षा स्वत:वर घेतली आहे. संपूर्ण जगासाठी ते बलिदान ठरले आहेत. वचन २५; योहान १:२९; मत्तय २६:२७,२८; १ योहान २:२; यश ५३:५,६,१०). ज्यांनी त्यांच्यावर भरंवसा ठेवला, त्यांचे अपराध दूर करण्याद्वारे ख्रिस्ताने परमेश्वराचा क्रोध दूर केला. (वचन २५). आपल्याला स्वर्गात जाण्यासाठी आनंद-शांतीने स्वर्गिय बापासोबत सदैव राहण्यासाठी, विश्वासाद्वारे ख्रिस्ताचे नीतिमत्व मिळाले आहे.

३:२३ यासाठी की सर्वांना याची गरज आहे, परमेश्वराने अद्भुत व महाग कार्य केले आहे. काही लोक दुसऱ्या लोकांच्या तुलनेत अधिक दुष्ट असू शकतील पण सर्वच पापी आहेत व परमेश्वराच्य दृष्टित कमी आहेत. म्हणून सृष्टिकर्ता म्हणतात, ''काही भिन्नता नाही'' (वचन ९:२२). एक व्यक्ति खड्डयात असू शकतो व दुसरा पर्वताच्या शिखरावर परंतु दोघेहि वर जाऊन ताऱ्यांना स्पर्श करू शकत नाहीत.

३:२४ **''निर्दोष ठरवले गेले''** - याचा अर्थ जितक्यांनी अपराध केला त्यांचे ''निर्दोष ठरवले जाणे'' आहे. याचा अर्थ असा नव्हे की जितक्यांनी पाप केले ते सर्व नीतिमान ठरवले जातील.

**''सोडवले जाणे''** - मत्तय २०:२८; इफि १:७; १पेत्र १:१८,१९; स्तोत्र ७८:३५ इ.

३:२५-२६ बायबल आणि रोमकरास पत्रात, काही मुख्य वचने आहेत. येशूचे पृथ्वीवर पापांसाठी बलिदान होण्यापूर्वी, परमेश्वराने त्यांना क्षमा केले, त्या सर्वांना क्षमा केले ज्यांनी आपले मन बदलून येशूवर विश्वासकेला. परमेश्वराने त्यांना नरकदंड दिला नाही, कारण जगाच्या स्वामींना कल्पना होती की ते ख्रिस्ताद्वारे काय करतील. परंतु त्यावेळी असे वाटले नाही की जगाचे नीतिमान न्यायाधीश शिक्षेऐवजी लोकांना क्षमा देऊन न्याय करतील. जरी नियमांनी त्यांना दोषी ठरवले तरी देवबापाने त्यांना वाचवले, पापांसाठी बलिदान होण्याकरिता त्यांनी आपल्या पुत्राला पाठवून स्वत:चे न्यायीपण सिद्ध केले. काय शिक्षा मिळणाऱ्यांच्या जागी येशूचे बलिदान होणे देवपित्याचे न्यायी होणे, दर्शविते? होय, कारण ख्रिस्त परमेश्वर आहेत (१:४; ९:५; योहान १:१,१४; फिली २:६) ते स्वत: दुसऱ्यांसाठी मेले (योहान १०:१७,१८). देवपित्याने ख्रिस्तात होऊन पापांचे दु:ख सोसले. इब्री १०:४ चे नोट्स पहा. ''प्रायश्चित'' - (वचन २५) येथे त्या बलिदानाकडे संकेत केला आहे जे पाप दूर करून देव बापाचा क्रोध देखील दूर करतो. पापामुळे परमेश्वर क्रोधित होतात (१:१८). ख्रिस्ताच्या बलिदानामुळे जेव्हा पाप दूर केले जाते तेव्हा परमेश्वराचा क्रोध शांत होऊन दूसरीकडे वळतो. प्रत्येक अपराधी जो विश्वासाने त्यांच्याकडे फिरतो त्या प्रत्येकास ते भेदभाव नकता क्षमा करतात.

३:२७ इफि २:८-१० जर मनुष्य आपल्या कर्मांनी तारण प्राप्त करू शकला असता तर स्वर्ग मोठमोठाल्या फुशारक्या मारणाऱ्या गर्विष्ठांनी भरून गेले असते. तुलना करा २:१७; लूक १८:११,१२.

२८ कर्मांच्या सिद्धांताने नव्हे तर विश्वासांच्या सिद्धांताने, **यावरून** काय संदेश मिळतो की नियमशास्त्राच्या कर्मांवाचून
२९ विश्वासाने एक व्यक्ति निर्दोष घोषित केला जातो. **तो** केवळ यहूदयांचा परमेश्वर आहे काय? तो परराष्ट्रीयांचा
३० नव्हे काय? होय, यहूदयांचाहि आणि परराष्ट्रीयांचा देखील. **म्हणून** जेव्हा सुंता न झालेला व सुंता झालेले अशांना
३१ एकच देवबाप विश्वासाद्वारे नीतिमान ठरवतात तेव्हा विश्वासाने नियम शास्त्रास आपण निरर्थक ठरवावे का ? **तर** मग
आपण नियमशास्त्राचा शेवट करून टाकायचा का? कधीच नाही? या विपरीत आम्ही नियमशास्त्राला त्याचा उचित
४ आदर सन्मान देतो. **आता** आम्ही काय म्हणावे, दैहिक रीतिने अब्राहम जो आपल्या पूर्वज आहे विश्वासाने मुक्तिच्या
२ प्रश्नावर कोणता अनुभव ठेवत होता? **जर** अब्राहाम कर्मांनी नीतिमान ठरला असलां तर त्याने अभिमान करण्याचे
३ कारण आहे, परंतु स्वर्गिय पित्यासमोर नव्हे. **याविषयी** बायबल मध्ये काय लिहिले आहे? अब्राहामाने विश्वास ठेवला
४ आणि त्याच्या विश्वांसामुळे तो नीतिमान गणला गेला. **जो** मेहनत करतो त्याची मजुरी मेहरबानी नव्हे पण तो
५ त्याचा हक्क होतो. **परंतु** जो मेहनत करत नाही; पण परमेश्वर जे दुष्टांना नीतिमान ठरवतात, त्यांवर विश्वास
६ ठेवतो, तो विश्वास त्या व्यक्तिसाठी नीतिमत्व गणला जातो. **जसा** राजा दाविदहि अशा व्यक्तिस आशीर्वादित
७ म्हणजो,ज्याला कर्मानुसार नव्हे तर विश्वासाच्या आधारे निर्दोष ठरविले जाते.**आशीर्वादित** तो व्यक्ति होय, ज्याचे
८ अपराध क्षमा केले गेले आणि ज्याच्या दुष्टते वर पांघरूण घातले गेले आहे. **अशीर्वादित** तो व्यक्ति, ज्याच्या विरूद्ध

---

३:२८ १:१६,१७; ५:१; १०:१०; गल २:१६; ३:२४; ५:४.

३:२९,३० एकच सत्य परमेश्वर आहे म्हणून यहूदयांनी असा विचार करू नये की त्यांचे व परराष्ट्रीयांच्या तारणाचे मार्ग-पद्धत वेगवेगळी आहे. विश्वासांच्या माध्यमाने येशू ख्रिस्ताद्वारेच तारण शक्य आहे.

३:३१ मत्तय ५:१७,१८ शी तुलना करा. धार्मिक नियमांद्वारे तारण नाही, असे म्हणून आपण त्या नियमांना फेकून देत नाही. परंतु त्या नियमांना योग्य स्थान देतो. त्यांच्याद्वारे पाप प्रकट होते व ती चुकीची ठरवली जातात.

४:१ **"आम्ही"**- ज्याप्रमाणे सर्व यहूदी म्हणायचे की अब्राहामाच्या वंशातून येणारा प्रत्येक व्यक्ति जन्मत: यहूदी होता (उत्पत्ति अध्याय १२ ते २५) या विषयी यहूदी फार अभिमान करित होते. त्यातील बहुतांशी लोक या विचाराचे होते की दैहिक दुष्टया अब्राहामाच्या वंशाचे असल्यामुळे ते परमेश्वराची संपत्ति होते. (मत्तय ३:९; योहान ८:३३,३९) पुष्कळसे लोक असा विचार करत होत की मोशेच्या पुस्तकातील आज्ञा व रीति-विधि यांवर त्यांची पाप-क्षमा अवलंबून होती. म्हणून त्यांनी पौलाचा विरोध केला. (प्रेषित ९:२३; १३:४५; १४:५,१९; ५१:१; १७:५; २१:११; २करिंथ ११:२४; १ थेस्स २:१४-१६). येथे पौल अब्राहामाचा विषय का आणतो? या विषयी बायबल जे कांही सांगते ते त्याच्या विश्वासामुळेच नीतिमान ठरविल्या जाण्याविषयी आहे.

४:२ ३:२७ पहा.

४:३ उत्पत्ति १५:६ आणि नोट्स देखील. या वचनाद्वारे तो स्पष्ट करतो की जेव्हा आपण सत्याची आवड धरतो, तेव्हा बायबलच्या आधारे विशेष प्रश्न काय आहे?

४:४ जर मनुष्याच्या धार्मिक कार्यांमुळे परमेश्वर मनुष्याला वाचवितो तर ते लोक आपल्या तारण वर अधिक गर्व करू शकले असते.

४:५ **"मेहनत/परिश्रम करत नाही"**- याचा अर्थ - तारण कमविले जात नाही परंतु देवबापाच्या द्वारे मिळणारे तारण व नीतिमत्व बक्षिसाच्या स्वरूपात विश्वासाने आपलेसे करणे होय. (३:२१-२८; ६:२३;११:६). ही मानवी विचारांच्या विरूद्ध घडणारी स्वाभाविकता होय. लोक असे मानतात की त्यांना त्यांच्या कर्मांपासून मुक्ति/तारण प्राप्त होऊ शकते. स्वर्गिय पिता या गोष्टीविषयी सहमत नाहीत. देवपिता कोणाला निर्दोष ठरवतात ते पाहू या.

**"दुष्ट"** - परमेश्वराच्या दृष्टित सर्वंच दुष्ट आहेत. (३:९-१९; मत्तय ७:११). परंतु पालट झाल्यावर ज्याला परमेश्वर निर्दोष ठरवितील असा वाईट कोणताहि व्यक्ति नसतो. पौलाविषयी विचार करा (प्रेषित ८:३;९:१-५).क्रूसावरील चोरा विषयी पहा (लूक २३:३९-४३). यशा ५५:७ व १ करिंथ ६:९-११ देखील पहा.

४:६-८ अब्राहामाबद्दल जे काही म्हटले गेले होते, त्यांशी इस्त्राएलाचा सर्वश्रेष्ठ राजा दाविद सहमत होता. स्तोत्र ३२:१,२. दयाळु स्वभावामुळे स्वर्गिय पिता सर्वांना क्षमा करतात. लोकांची लायकी त्यांना तारणाचे वरदान देत नाही. स्तोत्र ८६:५; मीका ७:१८,१९; मत्तय ९:५-७; १२:३१; प्रेषित १३:३८; इफि १:७). नीतिमान ठरविले जाने याचा अर्थ येथे हाच. आहे की परमेश्वर त्यांच्या विरूद्ध त्यांची पापें मोजणार नाहीत (८:३३,३४). हे यासाठी की, येशूच्या वधस्तंभावरील बलिदानाने त्यांचे भविष्यातील पाप सुद्धा दूर केले गेले. देवबाप व लोक आता सदा एक झाले. आहेत त्यांना म्ण्हणून देवपिता व लोक यांचे नीतिमत्व ही एकरूप झाले आहे. येशूच्या नीतिमत्वावर कोणताच डाग व ठिपका नव्हता; तो असूच शकत नाही. त्यांच्या (लोकांच्या) नीतिमत्वाकडे कोणीहि बोट दाखवू शकत नाही. जो पर्यंत प्रधान (इफि १:२२,२३) नीतिमान आहे तोपर्यंत खऱ्या विश्वासूपासून तयार झालेला देह देखील नीतिमान राहील.

**"आरोप होऊ नये"** -ग्रीक शब्द 'नये' म्हणजे केव्हाहि नाही असा सुद्धा होऊ शकतो. निर्माण कर्त्याच्या दृष्टित विश्वासूचे एक अद्भुत स्थान आहे. त्यांच्यासाठी अनंत विनाश किंवा नरकाचा प्रश्नच उठत नाही; पण ते चुकल्यावर परमेश्वर त्यांना अनुशासित करतील हे देखील तितकेच खरे आहे. (इब्री १२:५-११) पण समजा, परमेश्वराने त्यांच्या पापांकडे दुर्लक्ष केले तर, त्यांना वाईट जीवन जगण्याचे प्रोत्साहन मिळेल काय?उलट, स्वर्गिय पित्यावर प्रेम करून, त्यांच्यासाठी जिवंत राहण्याकरिता विश्वासूंना साहस मिळेल. अध्याय ६ मध्ये पौल या विषयाला धरून विश्वासू लोकांवर होणाऱ्या देयेचे परिणाम दाखवतो.

९ कोणताहि आरोप नाही. **मग** केवळ सुंता झालेलेच आशीर्वाद प्राप्त करतात, किंवा सुंता न झालेले देखील ? कारण
१० आम्ही म्हणतो की, अब्राहम विश्वासामुळें निर्दोष ठरविला गेला. **अब्राहम** केव्हा निर्दोष गणला गेला, सुंता होण्यापूर्वी
११ किंवा सुंता झाल्यानंतर? सुंता झाल्यानंतर नव्हे तर त्यापूर्वी. **जेव्हा** तो सुंता न झालेला होता तेवहा त्याला सुंतेची
खूण मिळाली, जी विश्वासाद्वारे निर्दोषतेचा शिक्का होती. हे यासाठी झाले की त्या लोकांना नीतिमत्व (निर्दोष
ठरवले जाणे) प्राप्त व्हावे. यासोबतच जे विश्वासाद्वारे सुतारहित दशेत विश्वासू आहेत त्या सर्वांचा अब्राहमाने बाप
१२ व्हावे; यासाठी की ते सुद्धा नीतिमान (निर्दोष) ठरविले जावेत. **अब्राहम** सुंता झालेल्यांचाचा बाप नव्हे तर त्यांचा
१३ देखील आहे जे अब्राहामाच्या पदचिन्हावर जगतात. ज्याच्या जवळ सुंता नसलेल्या स्थितितहि विश्वास होता.**अब्राहम**
१४ किंवा त्याच्या संततीला वारीस होण्याची प्रतिज्ञा नियमशास्त्राद्वारे नव्हती पण केवळ नीतिमत्वाद्वारे. **यासाठी** की जर
१५ लोक नियमशास्त्राद्वारे वारीस होतात तर मग तो विश्वास व्यर्थ ठरला आणि प्रतिज्ञा देखील निरर्थक झाली; **कारण**
नियमशास्त्राचे पालन न केल्याने क्रोध निर्माण होतो, परंतु जेथे नियमशास्त्रच नाही तेथे त्याच्या उल्लंघनाचा
१६ प्रश्नच उठत नाही **म्हणूनच** प्रतिज्ञा विश्वासाचा परिणामहि आहे व त्यावर अवलंबूनहि आहे, यासाठी की
अब्राहामाच्या वंशासाठी प्रतिज्ञा निश्चित रूपाने कार्यरत व्हावी, केवळ त्यांच्या साठीच नव्हे जे नियमशास्त्राचे पालन
करतात, पण त्यांच्यासाठी सुद्धा जे अब्राहामासारखा विश्वास ठेवतात जे विश्वासू आहेत त्या सर्वांचा पिता अब्राहाम
१७ आहे. (**जसे** लिहिले आहे की ''मी तुला पुष्कळ राष्ट्रांचा बाप केले आहे'') ज्यांवर (परमेश्वर) त्याने (अब्राहाम)
विश्वास ठेवला, त्यांच्या (परमेश्वर) उपस्थितित अब्राहाम आपला बाप आहे. असे परमेश्वर जे मेलेल्यांना जिवंत
करतात व ज्या गोष्टी अस्तित्वात नाहीत त्यांना असल्यासारखी या प्रमाणे आज्ञा करतात, जणू त्या वास्तविक रूपात

---

४:९ **''सुंता झालेले''** - हा यहूदी किंवा अब्राहमाच्या वंशाकडे संकेत आहे.
**''सुंता न झालेले''** - परराष्ट्रीय.

४:१०-१२ येथे यहूदी लोकांच्या गर्वावर चांगला प्रहार केला आहे. सुंता होण्यापूर्वीच अब्राहामाला नीतिमान ठरवण्यात आले म्हणजेच जेव्हा परराष्ट्रीय होता. अब्राहामाने १५ व्या अध्यायात परमेश्वराने त्याला नीतिमान ठरवले. सुंता केली याचा अर्थ नीतिमान ठरविला गेल्यानंतरचा काळ होता. यासर्व गोष्टीद्वारे परमेश्वर दर्शवितात की सुंतेच्या विधिचे अब्राहामाच्या तारणाशी काहीच देणे घेणे नाही केवळ विश्वासामुळे अब्राहाम नीमिमान ठरवला गेला. जे सर्व, मग यहूदी असोत की परराष्ट्रीय अब्राहामासारखे करतात, ते त्याच्याप्रमाणेच नीतिमान ठरविले जातात. जे लोक परमेश्वरावर भरंवसा ठेवतात, त्या सर्वांचे ते बाप आहेत. परमेश्वराने प्रकट केले की कशा प्रकारे लोक नीतिमत्व प्राप्त करू शकतात अब्राहामाची सुंता, त्याचे चिन्ह व एक शिक्का होती. आज हिच गोष्ट बापतिस्म्यासाठी सुद्धा म्हटली जाऊ शकते. हे केवळ चिन्ह आहे. परंतु ज्यांच्याजवळ परमेश्वराद्वारे विश्वासाने मिळणारे नीतिमत्व नाही, त्यांच्यासाठी एक व्यर्थ गोष्ट ठरते.

४:१३-१५ पौलपुढे दर्शवितो की नियमाव्यतिरिक्त देवबापाने अब्राहामाला नीतिमान ठरविले. यहूदयांची शिकवण नियमांचे पालन केल्याने तारण मिळेल अशी होती. अब्राहामाला नीतिमान ठरविल्यानंतर शेकडो वर्षानंतर नियम दिले गेले. गल ३:१६-१८.

४:१३ परमेश्वराने कनान भूमिविषयी प्रतिज्ञाकेली होती (उत्पत्ति १५:७,१८); केवळ यामुळे की अब्राहामाने देवपित्यावर विश्वास ठेवला होता; नियमाशास्त्राच्या फार पूर्वी परमेश्वराने ही प्रतिज्ञा अब्राहामाशी केली होती. त्यांनी असेही सांगितले होते की त्याच्याद्वारे संपूर्ण जग आशीर्वादित होईल. उत्पत्ति १२:१-३. हा आशीर्वाद, ख्रिस्त जो अब्राहामाचा वंशज याद्वारे येणार होता. (स्तोत्र २; ७२:५-११; मत्तय १:१ पहा) ख्रिस्त व त्या सोबत सर्व विशवासू या जगाचे उत्तराधिकारी (वारीस) आहेत ८:१७; इब्री १:२.

४:१४ जर लोक नियमांच्या पालनाने वाटीस बनू शकत होते तर परमेश्वराच्याप्रतिज्ञावर भरंवसा व प्रतिज्ञा व्यर्थ ठरल्या असत्या म्हणून कर्माच्या आधारे मुक्ति व्यर्थ गोष्ट आहे.

४:१५ जे लोक परमेश्वराच्या नियमांच्या आधारे नीतिमान होऊ इच्छितात, ते स्वत:वर आणखी जास्त क्रोध ओढवतात. नियमानुसार वागणूक सोडून ते नियम भंग करतात; त्यामुळे ते अधिक दोषी ठरतात. तुलना करा (५:२०; ७:७-११; गल ३:१०) तारणप्राप्ती साठी जर मोशेच्या नियमाचे पालन आवश्यक असते तर कोणीहि वाचू शकले नसते. यहूदी त्यानुसार करू शकले नाहीत व परराष्ट्रीयांजवळ ते नव्हतेच.

४:१६ यासाठी की तारणची प्रतिज्ञा (आणि जे वारीस म्हणून प्राप्त होते) आणि परमेश्वराच्या नियमांचे पालन या दोहोत कोणताच संबंध नाही फक्त विश्वासच पुरेसा आहे; म्हणून तारण यहूदी किंवा परराष्ट्रीय या सर्वांसाठीच आहे. तारणसाठी विश्वासच आधार आहे व तो देवपित्याचे एका उपहाराच्या स्वरूपात दिला आहे, कर्माच्या आधारे नव्हे.

४:१७ उत्पत्ति १७:५ प्रत्येक विश्वासूसाठी अब्राहाम जणू एकबापच आहे. (वचन ११) या वचनाच्या अंतिम भागात पौल अब्राहामाच्या विश्वासाची प्रकृति दाखवतो. त्याचा विश्वास अखिल जगाच्या सर्वसामर्थी, सर्वज्ञानी निर्माणकर्त्यावर होता. एक असे परमेश्वर जे काहीहि करण्यापूर्वीच क्रियेविषयी सांगू शकतात.
**''मेलेल्यांना जिवंत करतात''** - इब्री ११:१९,३५.

१८ आहेतच. **आशा** नसतानाहि अब्राहामाने भरंवसा केला की जे काही त्याला म्हटले गेले होते, ''की तुझी संतति अशी
१९ होवो'' किंवा तुझी संतति ताऱ्यांसारखी असंख्य होवो'' त्यानुसारच त्याने पुष्कळ राष्ट्रांचा बाप व्हावे, **अब्राहाम**
विश्वासात डळमळला नव्हता. शंभर वर्षांचा असतांना देखील त्याने स्वत:च्या देहाला किंवा सारा हिच्या गर्भाशलयाला
२० मृत समजले नाही. **शंकेमुळे** तो स्वर्गिय बापाच्या प्रतिज्ञोविषयी डळमळला नाही, परंतु परमेश्वराचे गौरव करत
२१ आपल्या विश्वासात सबळ राहिला आणि परमेश्वराची प्रशंसा केली. **तो** पूर्णपणे निश्चिंत होता की जी प्रतिज्ञा त्याला
२२,२३ दिली गेली आहे, ती पूर्ण करण्यात देवबाप सामर्थी आहेत. **म्हणूनच** त्याचा हा भरंवसा नीतिमत्व गणला गेला. **हे**
२४ केवळ अब्राहामासाठीच लिहिले गेले नाही. परंतु आमच्या यासाठी सुद्धा लिहिले गेले होत; **जर** आपण त्या
२५ परमेश्वरावर विश्वास करतो ज्यांनी येशू ख्रिस्ताला मृतकांतून जिवंत केले होते. **आपल्या** अपराधांमुळे येशूला मृत्युस
**५** सामोरे जावे लागेल आणि आम्हाला नीतिमान(निर्दोष) ठरवण्यासाठी त्यांना मेलेल्यांतून उठविले गेले. **म्हणून** जेव्हा
आपण विश्वासाने नीतिमान ठरविलेले आहोत; प्रभु येशू ख्रिस्ताद्वारे स्वर्गिय बापाबरोबर आमचे खरे नाते आहे.
२ **येशू द्वारे** विश्वास केल्यानेच आपण त्या विना-अट-कृपे पर्यंत पोचतो, ज्यात आजपर्यंत आम्ही स्थिर आहोत, आणि
३ स्वर्गिय पित्याच्या गौरवाच्या आशेत आनंदित आहोत. **इतकेच** नव्हे तर आम्ही आपल्या छळात देखील प्रसन्न
४ असतो, हे जाणून की संकटाने धीर निर्माण होतो. **या** धीराने सहनशील चरित्र बनते आणि ग्रहणयोग्य चरित्रापासून

---

४:१८-२१ अब्राहामाचा विश्वास कोणत्या प्रकारचा होता? मानवीय दृष्टिने अशक्य असतांनाहि त्याने देवबापावर त्यावेळी विश्वास ठेवला. (वचन १८; उत्पत्ति १५:४,५) (वचन १९). ज्यावेळी परमेश्वराने पुत्राची प्रतिज्ञा केली होती त्यावेळी अब्राहाम जवळपास १०० वर्षांचा व सारा ९० वर्षांची होती. उत्पत्ति १७:१,१५,१६. स्वत:च्या योग्यतेवर नव्हे तर त्याने देवबापाच्या क्षमतेवर विश्वास ठेवला या खातरीने की परमेश्वर समर्थ आहेत व ते पूर्ण करतीलच. स्वर्गिय पित्याने चिन्ह किंवा खूण दिलेली नव्हती, केवळ प्रतिज्ञा केली होती. अब्राहामाने भरंवसा केला (वचन २०,२१) यासाठी की ते सत्य -परमेश्वर आहेत. खऱ्या विश्वासूचा विश्वास अब्राहामा सारखाच असतो.

४:२२ वचन ३

४:२३,२४ पापक्षमेकरिता व जगाचे उत्तराधिकारी बनण्यासाठी (वचन १३) आपला विश्वास अब्राहामाच्या विश्वासा प्रमाणे असावा. लोक परमेश्वर किंवा अन्य ईश्वरावर भरंवसा ठेवतात त्याचप्रमाणे ज्या देवबापाने येशूस मेलेल्यातून उठविले त्या परमेश्वरावर आपण भरंवसा करावा. (वचन २४;१०:९) कारण तेच एकमात्र परमेश्वर आहेत. केवळ विश्वासाद्वारेच असे असले तरी ते पुरेसे नाही, व याने काम चालणार नाही. (याकोब २:१९ पहा) आपण त्यांच्या प्रतिज्ञेवर सुद्धा विश्वास ठेवावा (इब्री ११:६). काही प्रतिज्ञा ज्यापुत्राद्वारे दिल्या गेल्यात: (योहान ३:१६; ४:१४; ५:२४; ६:३७; ७:३८; ११:२५,२६; प्रकटी ३:२०; मत्तय ११:२८ पहा.) जेव्हा आपण विश्वास करतो तेव्हाच नीतिमान ठरविले जातो; अगदी अब्राहामा प्रमाणेच.

४:२५ विश्वासूंच्या तारणाचा आधार म्हणजे ख्रिस्ताचे मरण व त्यातून त्यांचे जिवंत होणे. (१करिंथ १५:१-४). पापांच्या नालायकीमुळे जे मरण लोकांना भोगावयाचे होते ते येशूने सहन केले. येशूचे जिवंत होणे या गोष्टीची पुष्टी करतात, की ख्रिस्ताचे बलिदान पित्यास ग्रहणयोग्य असे होते; आमचे पाप पुसले गेले, संपले. ही लक्ष देण्यासारखी बाब आहे की आपला संबंध परमेश्वरास ग्रहणयोग्य असा केला गेला आहे. नीतिमान ठरवून आपण पापांपासून मुक्त केलो गेलो आहोत; केवळ यासाठी की ख्रिस्त मरणातून उठले आहेत. स्वर्गिय पित्यासमोर येशूच आपले नीतिमत्व ठरले. १ करिंथ १:३०-३१.

५:१-२१ पौल दर्शवितो की सर्वच दुष्ट आहेत आणि येशूवर विश्वास करणे हाच तारणचा मार्ग आहे. हा अध्याय त्या लोकांसाठी आहे ज्यांना देवबापाने नीतिमान ठरविले आहे. ''विश्वासूसाठी तारण'' हा त्याचा विषय आहे. ज्या सर्वांनी एक नव्या क्षेत्रात प्रवेश केला आहे. त्या सर्वांविषयी पौल भिन्न गोष्टी सांगतो: परमेश्वराबरोबर त्यांची मैत्री झाली आहे (वचन १). परमेश्वराच्या उपस्थितित त्यांना निरंतर प्रवेश प्राप्त होतो (वचन २). त्यांच्या जवळ आशा आहे (वचन २). त्यांच्यात दु:खात प्रसन्न राहण्याची योग्यता आहे. (वचन २). त्यांना माहित आहे की संकटामुळे आशा वाढते (वचन ४). त्यांच्याजवळ पवित्रआत्म्याचे दान आहे (वचन ५). त्यांच्याजवळ संपूर्ण सुरक्षा आहे (वचन ९,१०). त्यांच्याजवळ परमेश्वरा प्रित्यर्थ आनंद आहे. (वचन ११) देवबापाशी नविन संबंध जुळल्यामुळे त्यांच्या जवळ सार्वकालिक जीवन आहे. (वचन १२-२१); कारण अजिंक्य क्षेत्रात त्यांनी प्रवेश केला आहे.

५:१ जगाचे स्वामी विश्वासूंना नीतिमान ठरवितात; म्हणून परमेश्वराशी त्यांची मैत्री आहे. कल १:२०; इफि २:१४-१७; २ करिंथ ५:१८-२१; यश ३२:१७; ५३:५. येथे मैत्री दर्शविते की येशूचे विश्वासू व परमेश्वर यात मैत्रि-संगति आहे.

५:२ **''पोचतो''** -कोणत्याहि समयी विश्वासू परमेश्वराच्या उपस्थितित येऊ शकतात. (इफि २:१८; ३:१२; इब्री१०:१९-२२). येशू ख्रिस्ताद्वारे आपण बापाच्या उपस्थितित पोचतो.(१तीमथ्य २:४; योहान १४:६,१३,१४).

**''कृपा''** यासाठी की विश्वासाद्वारे विश्वासू नीतिमान ठरवले जातात; म्हणून परमेश्वरासोबत ते सदैव राहतील या गोष्टीने ते आनंदित होऊ शकतात (योहान १७:२४; १ थेस्स २:१२; प्रकटी २१:२-४; २२:३-४).

**''महिमा/गौरव''** विश्वासूंचे अंतिम तारण आहे. (८:१७-२२,३०). आशे विषयी ८:२४,२५ चे नोट्स पहा.

५:३-४ एक प्रश्न आहे. येशूच्या शिष्यांचे क्लेश व पीड़ा त्यांना (परमेश्वर येशू) त्यांच्यापासून वेगळे करू शकतात काय ? त्यांची

५ असा. **अशा** कोणत्याच प्रकारे निराश करित नाही. कारण जो पवित्र आत्मा आपल्याला दिला गेला आहे, त्याद्वारे
६ स्वर्गिय बापाचे प्रेम त्यांनी आपल्या हृदयात ओतले आहे. **जेव्हा** आपण आपल्या अशक्तपणात (असहाय अवस्था)
७ होतो, त्याच वेळी येशू परमेश्वर-रहित लोकांसाठी मेले. (**नीतिमान** मनुष्यासाठी कोणी मरणारा विरळां चांगल्या
८ मनुष्यासाठी मरण्यास कद्‌चित कोणी हिंमत करेल) **परंतु** परमेश्वर आपल्या वरील प्रेमाचे प्रमाण या प्रकारे
९ दाखवतात की जेव्हा आपण पापी होतो, येशू ख्रिस्त आपल्यासाठी मरण पावले. **यापेक्षा** अधिक असे की, जेव्हा त्यांच्या
रक्ताद्वारे आपण नीतिमान ठरविले जातो, तेव्हा आपण येशूच्याद्वारे परमेश्वराच्या क्रोधापासून निश्चितच वाचू
१० **यासाठी** की जेव्हा आपण परमेश्वराचे वैरी होतो, त्यांच्या पुत्राच्या मरणाने आपण त्यांचे मित्र बनलो व मैत्रीहून
११ अधिक हे की, आपण येशूच्या जीवनाद्वारे प्रत्येक दिवशी पापाच्या शक्तिपासून सोडविले जाऊ. **एवढेच** नव्हे तर
आपण येशू ख्रिस्ताच्या ठायी परमेश्वर बापात देखील आनंदित होतो, ज्याद्वारे आपला असा संबंध स्थापित झाला आहे.

---

स्वर्ग-आशा समाप्त करू शकतात काय ? यावर भर देऊन पौलाचे उत्तर आहे - नाही. कष्ट विश्वासूची आशा वाढवतात. आपली समस्या आपले भलेच करील या आशेने ते आनंदित होऊ शकतात. दु:ख आशेत बदलणे हा एक अनुभवच होय. ही गोष्ट विश्वासाच्या जीवनाद्वारे हळू-हळू शिकली जाऊ शकते.

केलशामुळे धीराने सहन करण्याची क्षमता उत्पन्न होते. परमेश्वर त्यांना संकट व समस्यांचा सामना करण्याजोगे बनवतात, असे विश्वासू शिकतात; ते समस्यांचा सामाना तर करतातच पण पुन्हा अविश्वासात जात नाहीत (इब्री १०:३५-३९). परमेश्वर काहीहि झाले तरी त्यांच्यासोबत राहून त्यांना विश्वासात स्थिर ठेवतील असेहि ते शिकतात. (८:३५-३७; योहान १०:२७,२८;१पेत्र५-७) धीराने सहन करित राहिल्यास त्यातून उत्तम चरित्र घडते. संकट सहन केल्यामुळे ते मजबूत होऊन भविष्यात येणाऱ्या संकटांना सहन करण्यास अधिक सक्षम होतात या प्रक्रियेद्वारे त्यांची आशा पूर्वीपक्षा अधिक शक्तिशाली होऊन त्यात वाढ देखील होते.

५:५-११ हे वचन दाखवतात की विश्वासूंची आशा देवपित्याच्या प्रेमावर अवलंबून आहे; आणि हाच एक दृढ पाया आहे. येथे "अंतिम तारण" हा विषय आहे. पौलाचा तर्क असा: जेव्हा आपण परमेश्वराचे शत्रु होतो तेव्हाच त्यांनी आपले प्रेम प्रकट केले. आता जर आपण त्यांचे मित्र आहोत तर त्यांचे प्रेम शेवटपर्यंत आम्हाला सांभाळणार नाही काया ? ८:३५-३९ शी तुलना करा.

५:५ देवबापाने शिष्यांना शेवटचा मुक्तिचा निश्चय हयाकरिता दिला नाही की शेवटी त्यांना निराश करावे. विश्वासू जाणतो की ज्याची आशा परमेश्वराने त्याला दिली आहे, तो ती त्यांना देणारच. हा विश्वास परमेश्वराच्या त्या प्रेमाचा परिणाम आहे जे त्यांनी पवित्र आत्म्याद्वारे आपल्या आत ओतले आहे.

"ओतले आहे" - बहुतांशी दर्शवितो की स्वर्गिय पित्याच्या प्रेमाच्या ज्ञानामुळेच शिष्य त्यांच्यावर प्रेम करतात. (१ योहान४:९,१०,१९). पवित्र आत्मा विश्वासंना परमेश्वराचे प्रेम व त्यांच्या वर आणि एकमेकांवर प्रेम करण्याची योग्यता देतात. ज्यांना देवबाप नीतिमान ठरवितात त्यांना पवित्र आत्मा सर्व काही देतो. (गल ३:१-३,१४).

५:६-८ विश्वासू बनण्या आधी आपण काय होतो हे सांगताना पौलाने उपयोगात आणलेले शब्द आहेत "अशक्य, भक्तिहिन आणि अपराधी" १० व्या वचनात तो "शत्रु" या शब्दाचा समावेश करतो-दुसऱ्या शब्दांत स्वभावाने आपण वाईट होतो (३:२३; उत्पत्ति ८:२१; यिर्मया १७:९; मत्तय ७:११). त्यावेळी आपण एका खऱ्या सत्य पित्याला मुकलो होतो, त्यांच्यावर प्रेम करित नव्हतो कारण वाईटाची आपल्याला आवड होती; यामुळे आपण त्यांचे शत्रु होतो. (याकोबाशी तुलना करा) स्वत: चांगले होणे, दुष्टता थांबवणे, देवबापाचे मित्र होणे अशक्य होते. या गोष्टी केवळ कठीणच नव्हे तर आटोक्या बाहेरच्या होत्या. वर्तमान काळातील ज्ञान, भक्ति व कर्म मार्गाद्वारे तारणाचे जे मार्ग दाखवले गेले त्यांचा पोकळपणा आपण पाहतो. जे आपण करू शकलो नव्हतो ते देवबापाने करून दाखविले. ख्रिस्त आमच्या साठी आले व आमचे पाप स्वत:वर घेतले. विश्वास केल्यामुळे आम्हांला ख्रिस्ताच्या रक्तामुळे नीतिमान ठरवले गेले (वचन ९) त्यांनी आम्हांला मित्र बनविले. (वचन १०) आमचा अनुभव व पाहण्याचा दृष्टिकान बदलून टाकला (वचन १-४). आमच्यात आपला आत्मा ओतून त्यास नविन बनविले (वचन ५).

५:९,१० ख्रिस्ताने क्रुसावर, स्वर्गिय पित्याचे प्रेमपूर्ण शब्द प्रकट केले. लोक अविश्वासात असतांनाच, ख्रिस्त त्यांच्यासाठी मरण पावले. ख्रिस्तावरील विश्वासामुळे देवबापाने लोकांना नीतिमान व आपला मित्र बनविले. ही एक निश्चित गोष्ट होय. हयापेक्षा अधिक असे की जे कार्य ख्रिस्ताने त्यांच्यात आरंभिले ते पूर्ण करून शेवटपर्यंत त्यांचे रक्षण करतील. सतत पापांत असणाऱ्यांवर परमेश्वराचा पवित्र क्रोध प्रकट होईल. (२:५,८; इफि ५:५,६; कल ३:६ प्रकटी ६:१६,१७). प्रभु येशू या सर्वांपासून विश्वासूंचे रक्षण करतील. (१ थेस्स १:१०; ५:९). ते लोक (विश्वासू) येशूच्या "जीवनाशी जुळलेले आहेत." (योहान १७:२१;२३; कल ३:३,४). अशा लोकांसाठी विनंती करण्यास येशू जिवंत आहेत. त्यांच्याकडून पाप झाले तर त्यांना वाचवण्यासाठी उपलब्ध आहेत. (१ योहान २:१). शेवटपर्यंत विश्वासू सुरक्षित राहतील प्रश्न आहे की "जर ते विश्वासात स्थिर राहिले नाहीत तर काय होईल?" ख्रिस्ताने केलेले कार्य व वर्तमान काळातील कार्यांनतर देखील ते नाश होतील काय ? उत्तर असे की ज्या परमेश्वराने त्यांना विश्वास दिला आहे, तेच त्यांना त्या विश्वासात स्थिर राहण्यास सामर्थ्य देतील. लूक २२:३१,३२; फिलि १:६,२९; इब्री १०:३९. असा विचार करणे शास्त्रानुकूल आहे काय की, जे देवबाप विश्वासूंचे रक्षण करतात त्यांचा अशा. महत्वपूर्ण क्षेत्रात परावभ होईल?

५:११ जे लोक याला समजू शकतात ते आनंदित होऊ शकतात. वचन २ पहा "संबंध" २ करिंथ ५:१८ पहा.

१२ **म्हणून** ज्याप्रकारे एका व्यक्तिद्वारे "पाप" जगात आले व "पापा" द्वारे मृत्यु, म्हणून सर्वांनी पाप केल्यामुळे सर्व
१३ माणसां मध्ये मरण पसरले. **नियमशास्त्र** दिले जाण्यापूर्वी जगात पाप होतेच. पण जेथे नियमशास्त्र नाही तेथे पाप
१४ असण्याची गोष्टच नाही. **असे** असूनहि मृत्युने आदामापासून मोशेपर्यंत राज्य केले. त्या लोकांवर देखील ज्यांनी
१५ आदामाच्या आज्ञाभंगासारखा अपराध केला नव्हता. आदाम दुसऱ्या 'येणाऱ्याचे''प्रतिरूप आहे. **परंतु** मोफत मिळणाऱ्या
भेटवस्तुची तुलना अपराधाशी केली जाऊ शकत नाही. कारण जर एका व्यक्तिच्या अपराधामुळे पुष्कळ माणसे मेली
त्याच प्रमाणे एकच व्यक्ति येशू ख्रिस्त याच्या कृपेमुळे परमेश्वराच्या दयेने हे बक्षिस पुष्कळ जणाकरिता
१६ उपलब्ध झाले. **या दानाची** तुलना पापाच्या त्या परिणामाशी केली जाऊ शकत नाही, जे प्रथम मनुष्य आदामाच्या
उल्लंघनामुळे झाले होते. कारण न्याय एका व्यक्तिद्वारे आला आणि त्यामुळे लोक दोषी ठरले, परंतु जी फुकट
१७ निर्दोषता सर्व अपराधानंतर आली, ती आपल्याला नीतिमान ठरवण्यासाठी होती. **यासाठी** की जेव्हा एका व्यक्तिच्या
अपराधामुळे मृत्युने राज्य केले तर जे लोक कृपेचे विपुलतेचे व निर्दोषतेचे बक्षिस प्राप्त करतात, किती अधिक
१८ प्रमाणात त्या एकाच येशू ख्रिस्ताद्वारे जीवनात राज्य करतील. **तर मग** जसे एकाच व्यक्तिच्या अपराधामुळे सर्व
लोकांवर दंड आला व सगळे दोषी ठरले तसे एकाच व्यक्तिच्या खऱ्या निर्णयाने सर्व माणसांना जीवन देणारे

---

५:१२-२१ आदाम जो मानव जातिचा प्रतिनिधी होता, त्यात व येशू जे नीतिमान लोकांचे प्रतिनिधी आहेत या दोघेत तुलना केली आहे. आदामाद्वारे जगात पाप व मृत्युच आगमन झाले; ख्रिस्ताद्वारे नीतिमत्व व जीवन आले. आदामाकडून येणाऱ्या मृत्युपेक्षा अधिक ख्रिस्ताद्वारे येणारे जीवन आहे असे पौल सांगतो. आदामाच्या वाईटाचा परिणाम जिंकण्यासाठी/त्यावर विजय प्राप्त करण्यासाठी परमेश्वराने जे काही ख्रिस्तात केले ती एक फार मोठी बाब आहे.

५:१२ आदामाच्या अपराधामुळे जगातील सर्व लोक अपराधी आहेत. उत्पत्ति २:१७; ३:१-१९. आदामाने मानवजातिच्या सिद्धांतानुसार मुलांना जन्म दिला (उत्पत्ति ४:१) त्यामुळे दुसऱ्या लोकांत हा अपराध एखादया भयंकर रोगाच्या रूपात पसरला. प्रतयेक पीढीत त्याची व्याप्ती आहे. (उत्पत्ति ८:२१; स्तोत्र ५१:५; ५८:३; यिर्मया ६:२३. आदामापासून असल्यामुळे सर्व लोक पापी झाले. (इब्री ७:९,१० शी तुलना करा) म्हणून जसे त्याने केले तसे सर्वांनी केले. पृथ्वीवर याच एका मानवाने संबंध मानवजातिचे प्रतिनिधित्व केले?

५:१३,१४ **"नियमशास्त्र"**- त्या आज्ञा ज्या त्यानुसार मोशेद्वारे परमेश्वराने दिल्या. पौलाचा अभिप्राय असा असावा: नियम दिले जाण्यापूर्वी लोकांनी पाप केले होते, पण ज्याप्रमाणे आदामाने दिलेली आज्ञा मोडली होती, त्यांनी तसे केले नव्हते. (उत्पत्ति २:१७) ते मरण पावले, पण आपल्या पापामुळे नाही. अबोध बाळे सुद्धा मेली. मृत्युने आदामापासून मोशे पर्यंत राज्य का केले? (येशूला १ करिंथ १५:४५ यांत "अंतिम आदाम" म्हटले गेले आहे). आदाम ख्रिस्ताचा एक नमूना कसा काय? पापाच्या संदर्भात नव्हे, कारण ख्रिस्त निर्दोष होते (२ करिंथ ५:२१; इब्री ४:१५; ७:२६; स्तोत्र २:२२). येथे केवळ एका गोष्टीतच येशू आदामाचा एक "प्रकार" "नमूना" किंवा "चित्र" आहे. -ज्याप्रमाणे एका व्यक्तिच्या आज्ञा भंगामुळे पुष्कळ लोकांवर प्रभाव पडला, त्याचप्रमाणे ख्रिस्ताच्या आज्ञापालनाने असंख्य लोकांवर परिणाम झाला. आदामापासून (संतती) असल्यामुळे सर्व मरतात (वचन १५). जे ख्रिस्तावर विश्वास ठेवतात ते ख्रिस्तापासून असल्यामुळे सदैव जिवंत राहतील. (वचन १८,१९).

५:१५ **"भेटवस्तु"**-वचन १७,६:२३; इफि २:८,९. आदामाच्या "पुष्कळ" याचा अर्थ आहे आदामाची संतती/मुले. बागेतील अपराधामुळे ते सर्व मरतात. हे निश्चित आहे ख्रिस्ताच्या कार्यामुळे सर्व मानवजातिवर परमेश्वराची दया वाहते. याचा अर्थ असा नव्हे की सर्वच पापे क्षमा होतात. जे ख्रिस्तावर विश्वास ठेवतात, ज्यांना क्षमाशील दया प्राप्त होते.

५:१६ **"न्याय"** -परमेश्वराचा न्याय **" तुम्ही निश्चित मराल"** असा होता. (उत्पत्ति २:१७), परमेश्वराचा दंड होता. आदि पिता आदामाच्या एका अपराधामुळा हा दंड सर्व मानवांवर आला. दुसरीकडे परमेश्वराचे वरदान केवळ आदामाच्या एका पापांपासून वाचवत नाही; परंतु इतिहासात केलेल्या असंख्य पापांपासून. आदामाच्या आज्ञाभंगामुळे लोक अपराधी ठरले पण देवबापाच्या दयेमुळे दंड समाप्त होतो आणि विश्वासामुळे ते त्यांना नीतिमान ठरवितात. (३:२२-२४).

५:१७ **"मृत्युने राज्य केले"** वचन १४,२१. सर्व मनुष्यांना मरावयाचे होते. निर्दयी शासकाने सर्वांना गिळून टाकले होते. या मृत्युच्या सुटकेकरिता परमेश्वराने ख्रिस्ताद्वारे एक मार्ग काढला. जे कोणी या मार्गावर आहेत, ते जीवनात शासन करतात.मृत्यु नावाच्या राजाच्या अधीन राहण्याऐवजी ते सार्वकालिक जीवन प्राप्त करून ख्रिस्तात राजाचे पद देखील प्राप्त करतात (योहान ५:२४; ११:२५,२६; इफि २:६; प्रकटी ३:२१;२२:५). ख्रिस्ताठायी असल्यामुळे आपण जे पराभवी होतो ते आता विजयी झालो आहोत. (८:३७) शी तुलना करा.

५:१८ **"दंड"** वचन १६.

**"खरा निर्णय"** -कदाचित ख्रिस्ताच्या नीतिमत्वाचे समर्पण जे अनीतिमानांसाठी बलिदान होते.

**"सर्व मानवजाति"** - परमेश्वराने सर्व लोकांसाठी सार्वकालिक जीवनाचा प्रबंध केला आहे. केवळ विश्वास ठेवणाऱ्यांना ते प्राप्त होते. (१ योहान ५:११,१२; योहान ३:३६; ७:३७,३८). नीतिमान ठरवले जाणे व सार्वकालिक जीवन प्राप्त होणे यांचा जवळचा संबंध आहे, दोन्ही सोबतच असतात.

१९ नीतिमत्व प्राप्त झाले. **कारण** जसे एका व्यक्तिच्या आज्ञा उल्लंघनाने पुष्कळ लोक अपराधी ठरले, तसे एकाच
२० व्यक्तिच्या आज्ञापालनाने पुष्कळ लोक निर्दोष ठरवले जातील. **शिवाय** अपराध वाढावा म्हणून नियमशास्त्र आले
२१ परंतु जेथे अपराधा वाढत गेला, कृपा आणखी विपुल झाली. **यासाठी** जसे पापने मरणावर राज्य केले, तसे कृपेने
**६** प्रभु येशू ख्रिस्ताच्या निर्दोषतेद्वारे सार्वकालिक जीवनात प्रकट व्हावे (शासन करावे). **तर** आता आम्ही काय म्हणावे?
२ आपण दुष्टतेत कायम राहावे काय ? या साठी की विनाअट कृपा वाढत राहावी. **मुळीच** नाही हे कसे शक्य आहे
३ की जेव्हा आपण एकदा दुष्टतेसाठी मेलो; तेव्हा पुन्हा दुष्टतेचे जीवन कसे जगावे? **तुम्हांस** ठाऊक नाही काय की
४ जितक्यांनी येशू ख्रिस्तामध्ये बप्तिस्मा घेतला, तितक्यांनी येशूच्या मरणाचा बपतिस्मा घेतला, **म्हणूनच** आपण
बापतिस्म्यात येशूबरोबर पुरले गेलो; यासाठी की ज्याप्रकारे परमेश्वराच्या गौरवाने येशू ख्रिस्त मरणातून उठले,

---

५:१९ **"आज्ञा उल्लंघनमुळे''** - उत्पत्ति ३:६.

**"आज्ञा पालनामुळे''** -फिली २:८,१२,१९ यांत एक विरोधाभास दिसतो. आदम व ख्रिस्त, दोन वेगवेगळे स्त्रोत आहेत, ज्यांच्यापासून लोक प्राप्त करतात. आदाम पाप, मृत्यु व दंड यांचा स्त्रोत आहे. ख्रिस्ताचे नीतिमत्व, जीवन व दया लोकांना, परमेश्वरासमोर ग्रहण योग्य बनवते.

५:२० **"नियमशास्त्र''** वचन १३,१४ आज्ञा मोडल्या जातात, त्यामुळे अपराध वाढतो; परंतु जेव्हा आज्ञाच नसतात, तेव्हा मोडण्याचा प्रश्न देखील नसतो.(४:१५)७:७-१२ यात पौल दाखवतो की परमेश्वराच्या आज्ञामुळे पाप वाढत होते. नियमशास्त्र देण्याचा उद्देश पाप वाढवणे नव्हता, (आज्ञा व नियमांना सोडूनही ते वाढत होते-उत्पत्ति ६:५,११; ८:२१); पण यासाठी की लोकांनी परमेश्वराची दया जाणावी व परमेश्वराची कृपा, पूर्ण गौरवाने व सामर्थ्याने प्रकट व्हावी.

५:२१ **"पापाने मृत्युवरशासन/राज्य केले''** - वचन १४,१७. पापामुळेच मृत्युने राज्य केले पाप अत्यंत क्रूर आहे व जे त्याची सेवा करतात त्यांना ते मृत्युरूपी वेतन मोबदल्यात देते. (६:२३; योहान ८:३४) परमेश्वराची दया, मृत्यु व पापाहून अधिक सामर्थी आहे. या द्वारे पापाचा नाश होतो; कारण ती लोकांना नीतिमान ठरवून नेहमीसाठी जीवनात प्रवेश देते. (६:२३; तीताला ३:३-७). ख्रिस्तामुळे दया शासन करते (इब्री ४:१६). जे लोक विश्वास ठेवतात, त्यांचे पाप क्षमा करते. त्यांना पापाच्या क्रूर शासन व मृत्युपासून मुक्त करून त्यांचा दोष पूर्णपणे दूर करते (६:१४; ८:१). येथे दोन स्वामी आहेत- ते पाप जे आदामाद्वारे आले (वचन १२) व ती कृपाजी ख्रिस्ताद्वारे आली (वचन १७; योहान १:१६,१७). आपण कोणत्या स्वामीची सेवा करू याची निवड करा.

६:१ पौलाने म्हटले होते की जेथे पाप वाढले तेथे कृपा देखील विपुल झाली. (५:२०) पौलाच्या शिक्षणापासून अजाण असणारे दुष्ट लोक असे म्हणू शकतात की दुष्टतेत कायम राहिल्याने चांगले प्रतिफळ मिळते परमेश्वराकडून जास्त कृपा मिळते, म्हणून खूप अधर्म करावा व क्षमेसाठी भरपूर कृपा प्राप्त करावी. ज्यांनी ख्रिस्ताच्या शुभवर्तमानावर विश्वास ठेवला आहे. त्यांच्याकरिता हा सल्ला किंवा हा प्रश्न किती मूर्खपणाचा आहे! पौल दोनदा विचारतो, "तुम्हांस ठाऊक नाही काय''? (वचन ३,१६)पून्हा दोनदा (वचन ६,९) तो "ठाऊक'' शब्दाचा उपयोग करतो. पौलाला माहित होते की परमेश्वर आपल्या शिष्यांना नीतिमान असे स्वीकार करतात यासाठी की त्यांनी पवित्र जीवन किंवा " नवे जीवन जगावे'' (४). या विषयावर अध्याय ८ च्या शेवटपर्यंत तो चर्चा करतो. योहान १७:१७-१९ यात पवित्र जीवना विषयी पहावे.

६:२ मुळीच नाही - ३:३० वचन १ यात विचारलेला प्रश्न हा संभाव्य प्रश्न आहे का ? यासाठी की विश्वासू "पापासाठी'' मेलेले आहेत? हे मरण कसे आले? ६ व ८ व्या वचनात उत्तर दिले आहे. "वधस्तंभावर खिळले गेले'' "ख्रिस्ता सोबत मेले'' त्यांच्या मरणात व जिवंत होण्यात ख्रिस्त संपूर्ण विश्वासूंच्या देहाचे प्रतिनिधि व प्रधान आहेत. जे काही ख्रिस्ताचे झाले तसेच विश्वासूंचेहि झाले, असा परमेश्वराचा दृष्टिकोन आहे. ख्रिस्त त्यांच्या (लोकांच्या) स्थानावर उभे राहून त्यांचे प्रतिनिधित्व करतात. परमेश्वर जाणतात की जे काही पापमय स्वभावात होते ते सर्व वधस्तंभावर चढवले गेले व समाप्त झाले आहे.

६:३,४ येथे पौल कोणत्या "बाप्तिस्म्याची'' गोष्ट करत आहे ? हा शब्द ग्रीक भाषेचा आहे. जर या शब्दाचे भाषांतर केले तर अशा प्रकारे वाचले जाईल आपण सर्व जे ख्रिस्तात बुडविले गेलो ते त्याच्या मृत्युत बुडविले गेलो होतो; म्हणून आपण त्यांच्यासोबत पुरले गेलो होतो; यासाठीच बुडवणे म्हणजे पाण्यात नव्हे तर ख्रिस्तात बुडवले जाणे असा अर्थ होईल; त्यांच्या बरोबर एका विशिष्ट संबंधात बांधले जाणे होय. पवित्र आत्म्याद्वारे त्यांच्या देहाचे अवयव होणे, ख्रिस्ताबरोबर एक होणे दर्शविते (१करिंथ १२:१२,१३; योहान १७:२१,२३).

बायबल मध्ये बाप्तिस्मा देणे किंवा त्याचा अर्थ अनेक ठिकाणी एका अलंकारिक भाषेत आहे. पहा लूक १२:५०; १ करिंथ १०:२. पौलाने शिकवलेल्या आत्मिक सत्याकडे, पाण्याचा बाप्तिस्मा संकेत करतो. पाण्यात उतरणे - ख्रिस्ताबरोबर मरणे व पुरले जाणे दर्शविते. पाण्यातून बाहेर येणे - ख्रिस्ताचे जिवंत होणे दर्शविते. पाण्याच्या बाप्तिस्म्यावर नोट्स मत्तय ३:६; २८:१९; मार्क १६:१६; प्रेषित २:३८ यात पहा. आत्म्याचा बाप्तिस्मा-प्रेषित १:५ पहा. ख्रिस्तात हा होता, "की आपण नविन जीवन जगावे,'' एक जिवंत झालेले जीवनपापाच्या दासत्वातून व आत्मिक मृत्युतून स्वतंत्र झालेले जीवन पहा २ करिंथ ५:१७; तीतला २:११-१४).

५ त्याचप्रकारे आम्ही देखील नविन प्रकारचे जीवन जगावे. **कारण** जर आम्ही येशूच्या मृत्युच्या समानतेत जोडले गेलो
६ आहोत तर त्यांच्या जिवंत होण्याच्या समानतेत देखील जोडले जाऊ. **आम्हाला** माहित आहे की आमचे जुणे मनुष्यत्व
येशू बरोबर वधस्तंभावर खिळले गेले होते; जेणेकरून पापमय शरीर नष्ट होऊन आम्ही पापाची सेवा करू नये.
७,८ **कारण** जो ख्रिस्ताबरोबर मेला, तो पापांपासून मुक्त झालेला आहे, **आता** जर आपण ख्रिस्ताबरोबर मरण पावलो,
९ तर आपण ख्रिस्ताबरोबर जिवंतहि राहू असा आम्हाला विश्वास आहे. **असे** ठाऊक असूनहि की ख्रिस्त जे मेलेल्यांतून
१० उठवले गेले, ते पुढे पुन्हा मरणार नाही. आता त्यांच्यावर मृत्युची सत्ता राहिलेली नाही. **कारण** ज्याप्रकारे ते मेले,
११ ते मरण सर्वांसाठी एकादांचेच होते, परंतु जे जीवन ते जगतात ते परमेश्वरासाठीच जगतात. **याचप्रकारे** तुम्ही देखील
१२ स्वत:ला पापांकरता मेलेले, पण आपल्या स्वामी येशू ख्रिस्ताद्वारे परमेश्वराकरिता जिवंत असे समजा, **म्हणून** तुम्ही
आपल्या मरणाऱ्या शरीरावर पापाला अधिकार देऊ नका, या साठी की तुम्ही त्याच्या वासनांच्या अधीन होऊ नये.
१३ **आपल्या** शरीराचे अवयव अनीतीची हत्यारे होण्याकरिता पापाच्या अधीन करू नका; परंतु मेलेल्यातून जिवंत
१४ झाल्यासारखे स्वत:ला व देहाच्या अवयवांना नीतीची साधने होण्यासाठी परमेश्वराला अर्पण करा. **पापाने** तुमच्यावर

---

६:५ **''जोडलेले''** हा मुख शब्द होय. विश्वासू ख्रिस्तात आहेत. (८:१; योहान १५:४; इफि १:३,४; फिलि १:१; कलस्सै १:२) व ख्रिस्ताबरोबर एक आहोत. (१२:५; १करिंथ ६:१५,१७; १२:१३ चे नोट्स पहा). जसा त्यांचा मृत्यु विश्वासूंचा मृत्यु तसेच ख्रिस्ताचे उठणे, विश्वासूंचे जिवंत होणे होय. (इफि२:६; कल २:१२; ३:१).

६:६ **''आपला जुणा मनुष्य स्वभाव किंवा जुणे जीवन''** -ख्रिस्तात नविन लोक होण्यापूर्वी ते जे काही होते.

**''वधस्तंभावर खिळले गेले''** - आपण स्वत: करू शकण्यासारखी ही बाब नाही जेव्हा ख्रिस्त ३० ए. डी. मध्ये क्रुसावर चढवले गेले, तेव्हा आपण विश्वासू देखील त्यांच्या सोबत वधस्तंभावर चढवले गेलो होतो. (वचन २; गल २:२०).

**''पापमय शरीर''** याचा अर्थ- विश्वासूंच्या शरीरात असणारा वाईट स्वभाव/किंवा वाईट स्वभावाचा परिणाम. ज्या प्रकारे आपला देह नष्ट केला गेलेला नाही; पण ख्रिस्ताच्या मरणामुळे आपण पापाच्या स्वभावाच्या सामार्थ्यापासून मुक्त होतो. (वचन १४,२२; ५:२१). परमेश्वराच्या दयेमुळे आपल्याला पापाच्या दास्यत्वात राहण्याची गरज नाही (८:४; गल ५:१६-२५; इफि ४:२२-२४; कल ३:५-१०).

६:७ परमेश्वराच्या दृष्टित आपण आदामाच्या ठायी होऊन पाप केले आणि ख्रिस्तात मेलो देखील (२करिंथ ५:१४; कल ३:३). आदामाच्या अपराधामुळे आपल्यावर असा दंड आला (५:१६,१८). ख्रिस्ताच मृत्युमुळे यापासून स्वतंत्रता मिळाली. ख्रिस्ताबरोबर मेल्यामुळे आपण पापांपासून स्वतंत्र (निरपराधी घोषित) केले गेलो; पापांशी संबंध तोडला गेला. आपल्या नांवावर आता कोणताहि अपराध लिहिलेला नाही. (४:७,८). ख्रिस्ताचे दु:ख व मृत्युमुळे आपल्या पापांची किंमत भरून दिली गेली आहे. वर लिहिलेल्या सर्व गोष्टी प्रत्येक विश्वासूच्या जीवनाचे सत्य आहे; केवळ विशिष्ट विश्वासूंचेच नव्हे.

६:८ वचन ४ ख्रिस्तासोबत विश्वूास एक नवे जीवन जगतात; असे जीवन जे परमेश्वराने त्यांना दिले आहे (योहान ५:२४; १४:२३). त्यांच्या सोबत ते नेहमी जगतील १ थेस्स ४:१७.

६:९,१० मृत्यु पापांचा परिणाम आहे (५:१२; ६:२३). विश्वासूंच्या पापांच्या दंड-रूपात, ख्रिस्त त्यांच्यासाठी मेले. (३:२५; योहान १:२९; १ करिंथ १५:३) आता ते नेहमीसाठी जिवत आहेत (प्रकट १:१८) ते परमेश्वराकरिता जिवंत आहेत, यासाठी की त्यांनी जगाच्या स्वामीला प्रसन्न करावे. (योहान ८:२९); स्वत:साठी किंवा पापासाठी नव्हे.

६:११ वरील गोष्टीत विश्वासूंना ख्रिस्तासारखे व्हावयाचे आहे. ख्रिस्तासारखेच, परमेश्वराकरिता जगायचे आहे. ज्याप्रमाणे ख्रिस्तावर मृत्युची सत्ता नाही तशीच विश्वासूंची हि स्थिति आहे. ( योहान ११:२५,२६).ज्याप्रमाणे परमेश्वर समजतात की ख्रिस्तासोबत विश्वासूहि मेले व नविन जीवनासाठी जिवंत झाले, तसेच विश्वासूंनी देखील समजावे.

६:१२ विश्वासूंच्या संसारिक देहात पापाचा किंवा पापी स्वभावाचा अंश नाही, असे पौलाला म्हणायचे नाही, (त्याला माहित होते की असे आहेच) ७:१८,२५; गल ५:१७; इफि ४:२२; १ योहान १:८. पापाने त्यांच्यावर शासन करावे अशी कोणतीहि संधि विश्वासूने पापाला देऊ नये असे पौल म्हणतो. (५:२१) विश्वासूंच्या जीवनाचा स्वामी ''पाप'' होता कामा नये (वचन १४; योहान ८:३१-३६)

६:१३ परमेश्वर विश्वासूंना **''मृत्युकडून जीवनात''** घेऊन आले आहेत. (योहान ५:२४). आता त्यांनी आपले पाय, हात, डोळे, कान, तोंड पापाच्या स्वाधीन करू नये. आता त्यांच्या जवळ एक नवे स्वामी व जिंवत बाप आहे, त्यांनी (विश्वासूंनी) आपले सर्व काही त्या स्वर्गिय बापाला दयावे (१२:१). पापाला किंवा स्वत:ला स्वामी न करता फक्त परमेश्वरालाच स्वामी मानावे. विश्वासू जर याठिकाणी अयशस्वी झाले तर, पाप हल्ला करावयास अगदी तयार आहे यासाठी की पुन्हा हयांना गुलाम बनवावे.

६:१४ जे पापांनी त्रस्त आहेत त्यांच्यासाठी एक संभाव्य गोड सत्य आहे. परमेश्वराच्या नियमांचे पालन केल्याने, चांगले झाल्याने आपण पापावर विजय प्राप्त करू असा विचार करू नये. पापाचे बंधन केवळ परमेश्वराच्या मदतीने तोडले जाऊ शकते. त्या देयेमुळे आमचे पाप, पापांची क्षमा, सार्वकालिक जीवन, पवित्र आत्मा व पापाशी युद्ध करण्याचे बळ प्राप्त होते.

**''नियमशास्त्राच्या अधीन नाही''** ७:१-४ शी तुलना करा.

१५ सत्ता चालवू. नये कारण तुम्ही नियमशास्त्राच्या अधीन नाही; पण विनाअट व असीमित कृपेच्या अधीन आहा. **तर**
मग काय ? आपण नियमशास्त्राच्या अधीन नसून कृपेच्या अधीन आहोत म्हणून पाप करत राहावे काय? कधीच
१६ नाही **तुम्हाला** माहित नाही काय की तुम्ही गुलामाच्या रूपात ज्याची आज्ञापालन करण्यासाठी स्वत:चे समर्पण
करता, त्याचेचे तुम्ही गुलाम आहा. मग पापाचे गुलाम जे मृत्युकडे घेऊन जाते किंवा आज्ञापालनाचे गुलाम, ज्याचा
१७ परिणाम नीतिमत्व आहे. **परंतु** परमेश्वराची स्तुति असो की जरी तुम्ही पापाचे दास होता तरी तुम्ही ते शिक्षण
१८ हृदयाने ग्रहण केले, जे तुम्हांला दिले गेले होते. **म्हणून** पापापासून स्वतंत्र केले गेल्यानंतर तुम्ही नीतिमत्वाचे गुलाम
१९ बनला आहात **गुलामांचे** व त्यांना ठेवणाऱ्यांचे उदाहरण देऊन कारण याप्रमाणे समजणे सोपे आहे. पहिले तुम्ही
अशुद्धता व कायदेहिनता (अमंगळपणा) याचे गुलाम होता. आता नीतिमत्वाचे गुलाम होण्याची निवड तुम्ही केलीच पाहिजे
२० यासाठी की तुम्ही पवित्र व्हावे. **कारण** जेव्हा तुम्ही पापाचेगुलाम होता, तेव्हा तुम्हाला याची चिंता नव्हती की जे
२१ काही उचित आहे तेच केले पाहिजे. **ज्या** गोष्टींची तुम्हांला लाज वाटते, त्या वेळेस तुम्हाला त्यापासून काय फायदा
२२ होत होता? कारण त्या सर्व गोष्टींचा अंत मरण आहे. **परंतु** तुम्ही पांपापासून मुक्त होऊन, परमेश्वराचे गुलाम
झाला आहात. आता तुम्ही ते सर्व काही करता ज्यापासून पवित्रता प्राप्त होते आणि ज्याचा परिणाम सार्वकालिक
२३ जीवन आहे, **कारण** पापाचे वेतन मरण आहे; परंतु आपले स्वामी प्रभु येशू ख्रिस्तात, परमेश्वराचे कृपादान कधीहि

---

**''दयेच्य अधीन''** - ५:२१ एक मधुर व सामर्थी स्वामी.

६:१५ सामान्यत: लोकांचा विचार असतो की नियमांना सक्तीने लागू केल्यास पाप थांबवता येते. लोक पौलाचे परमेश्वराच्या असीम देयेबद्दलचे विचार समजले नाहीत तर त्यांच्या मनात हा विचार येईल की पाप करण्यास पूर्ण मोकळीक आहे; खरे पाहिले असता पौल पापासून सुटण्याचा मार्ग सांगतो. शुभवर्तमान परमेश्वराची अशी शक्ति आहे की ज्यापासून मुक्ति मिळते (१:१६) लोक परमेश्वराचे खरे दास बनतात.

६:१६ लोकांच्या मते, ते ''पाप'' करण्यास ''मुक्त'' आहेत. पापात असणे प्रकट करते की त्यांच्याजवळ स्वतंत्रता नसून ते पापाचे गुलाम आहेत.

६:१७,१८ विश्वासूंना स्वतंत्रता कशी मिळते ते पहा. याचा अर्थ सुवार्तेचे व ख्रिस्ताच्या शिक्षणाचे पालन करणे होय. ''हृदयाने आज्ञा पाळणे याकडे लक्ष दया. आपल्या अपराधांना सोडून परमेश्वराचे सेवक बनण्याकरिता त्यांच्यावर बळजबरी केली गेली नव्हती. त्यांची ही स्वईच्छा होती. ''नीतिमत्वाचे गुलाम'' दयाळू स्वामीच्या इच्छा आनंदाने पूर्ण करण्यासाठी केलेले हे समर्पण होते; ही बांधिलकी नव्हती.

६:१९ वचन १३ ''गुलाम'' विश्वासू या नविन स्वामीशी बांधले गेले आहेत. (वचन १८). त्यांनी या सत्याच्या आधारावर इच्छेने जगावे. आपल्या विचारातून, कार्यातून पद्धतीतून व नीतिमत्वातून त्यांनी पळण्याचा प्रयत्न करू नये. ही ''गुलामी'' त्यांना या पृथ्वीवर सर्वाधिक प्रसन्नता, देवपित्याची सेवा करण्याची स्वतंत्रता व परमेश्वराचा आनंद घेण्यास मदत करते. (तुलना करा मत्तय ५:६,१०; ६:३३). चांगली कामे करण्याकरिता लोकांवर जबरदस्ती करण्याची आवश्यकता नाही. ते पूर्ण हृदयाने चांगलेच करण्याची इच्छा बाळगतात. ख्रिस्तात खरा विश्वास हेच उत्पन्न करतो. याचा अर्थ असा नव्हे की विश्वासू चुकत नाहीत किंवा चुकण्याची शक्यता नसते. शब्द ''अशक्तपणा'' वर लक्ष दया. ७:१८ शी तुलना करा. याचा अर्थ, ते नीतिमत्वाचे जीवन व्यतित करू इच्छितात.

''निवड तुम्ही करावी'' किंवा 'समर्पित करणे'' वचन १३; १२:१,२ याचा परिणाम जीवनाची पवित्रताच आहे.

६:२० एका व्यक्ति जवळ पाप व नीतिमत्व दोन्ही असू शकत नाही. (मत्तय ६:२४ शी तुलना करा) पौल म्हणतो की पापाचे गुलाम नीतिमान दिसू शकत नाही जीवनाचे स्वामी कोण आहेत याकडे त्याचा इशारा आहे. पापामुळे पाप्याचे नीतिमत्व परमेश्वराच्या दृष्टित कलंकित असे आहे. (यशा ६४:६). खरे पाहिल्यास ते पापाची सेवा करतात.

६:२१ रोमच्या विश्वासूनी पूर्ण प्रकारे मन बदलून स्वत:ला परमेश्वरासाठी सोपवून दिले होते; त्यांना जुण्या जीवनाची लाज वाटत होती. जर विश्वासूलां जुण्या पापमय जीवनाची लाज वाटत नसेल तर नक्कीच त्याच्या जीवनात काही गडबड असावी; शक्यता ही आहे की पुन्हा तो पापमय जीवनात परंतु शकतो (२ पेत्र २:२२). कुणी काहीही म्हणत असले तरी सर्वांसाठी पापमय जीवनाचा अंत मृत्युच आहे.

६:२२ पवित्रता व सार्वकालिक जीवन प्राप्त करणे म्हणजे परमेश्वराचा 'गुलाम' असणे परमेश्वराने सोडवलेली संपत्ति होणे; परमेश्वराची वाणी ऐकण्यास तत्पर असणे. आत्मिक स्वतंत्रतेची हिच एक पद्धत आहे. (गल ५:१,१३; योहान ८:३६) यामुळे आपणस स्वइच्छेने व आनंदाने परमेश्वराची सेवा करण्याची स्वतंत्रता प्राप्त होते.

६:२३ १६-२२ यात पांपाची गुलामी व परमेश्वराची गुलामी यात तुलना केली गेली आहे. पाप आपल्या गुलामांना मृत्यु रूपात वेतन देते, या मरणाद्वारे परमेश्वरापासून नेहमी दूर राहण्याचे जीवन आहे.(प्रकटी २१:८; २ थेस्स १:८,९; मत्तय २५:४१) पापाच्या गुलामांना त्यांच्या लायकी प्रमाणे वेतन मिळते परंतु परमेश्वर आपल्या गुलामांना मजूरी नव्हे तर भेटवस्तु देतात; जरी त्यांची लायकी नसली किंवा ते कमवू शकत नसले तरी. (पहा ४:४,५; ५:१७; लूक १७:१०; इफि २:८,९; योहान ३:१६; ४:१४). एखादा व्यक्ति परमेश्वराचा गुलाम कसा बनतो? तर स्वत:च्या हृदय परिवर्तनाने, व ख्रिस्तावर विश्वास केल्यामुळेच. सर्व विश्वासू

**७** न संपणारे जीवन आहे, **बंधूनो-भगिनींनो** मी त्या लोकांना लिहित आहे ज्यांना परमेश्वराच्या नियमशास्त्राचे असे
२ ज्ञान आहे की या पृथ्वीवर संपूर्ण जीवन एखादया व्यक्तिला त्या नियमांच्या अधीन राहावे लागते ? **उदा.** जोपर्यंत
पतिजिवंत आहे, तो पर्यंत कायदयानुसार एक विवाहित स्त्री आपल्या पतिशी बांधलेली आहे पर जेव्हा तो मरण
३ पावतो, तेवहा ती विवाह-कायदयापासून मुक्त होऊन जाते. **म्हणून** जर पति जिवंत असताना ती परपुरूषाची झाली
तर तिला व्यभिचारिणी म्हणतील. पण तिचा पति मरण पावल्या नंतर, त्या वैवाहिक बंधनातून ती मुक्त होते व
४ दुसऱ्या पुरूषाशी विवाह केल्यामुळे ती व्यभिचारिणी होत नाही. **म्हणून** माझ्या भाऊ-बहिणींनो तुम्ही ख्रिस्ताच्या
शरीराद्वारे मोशेने दिलेल्या परमेश्वराच्या नियमांसाठी मेला. यासाठी की तुम्ही मेलेल्यांतून उठवले जाऊन ख्रिस्ताचे
५ व्हावे व परमेश्वरासाठी (पवित्रता) फळ आणावे. **जेव्हा** तुम्ही शारीरिक होता; नियमशास्त्रा द्वारे उत्पन्न वाईट
अभिलाषा आपल्या देहात कार्य करत होती, ज्यामुळे आपण मृत्यु (शारीरिक व सार्वकालिक) करिता परिणाम उत्पन्न
६ करावे. **ज्या** गोष्टीने आपल्याला स्वत:च्या नियंत्रणात ठेवले होते, आता त्यासाठी मेल्यामुळे आपण नियमशास्त्रापासून
सोडवले गेलो यासाठी की पवित्र आत्म्याच्या नव्या पद्धतीने सेवा करावी, रीति-विधि आणि बलीदान केल्याने नव्हे.
७ **तर** मग आम्ही काय म्हणावे ? नियमशास्त्राद्वारे वाईट काय आहे, हे मला कळत नाही ? उदा. करता जर
८ परमेश्वराने वारंवार म्हटले नसते की "तुम्ही लोभ करू नका", तर लोभ काय आहे, हे समजले गेले नसते. **आज्ञा**

---

जणू परमेश्वराने विकत घेतलेली संपत्तिच आहेत व त्यांच्याजवळ सेवामय हृदय आहे. त्यांची सेवा यासाठी नसते की त्यांना अनंतजीवन प्राप्त व्हावे; पण यासाठी की त्यांच्या जवळ ते सार्वकालिक जीवन आहे.

७:१ जे नियम परमेश्वराने मोशेला दिले त्यानुसार त्याला मरणाऱ्या लोकांवर अधिकार नव्हता. पौलाच्या मते विश्वासू ख्रिस्तात मेले आहेत. (६:६-८). याच कारणाने ते नियमांच्या अधीन नाहित (६:१४). ते नियम त्यांना दोषी ठरवू शकत नाहीत.

७:२ उत्पत्ति २:२४; मत्तय १९:३-९. मोशेचे नियम कोणत्याहि पत्नीला घटस्फोट देण्याची परवानगी देत नाही.

७:३-४ स्त्रीच्या पहिल्या पतीच्या मृत्युमुळे तिला मुक्ती मिळाली आहे की तिने दुसरा विवाह करावा. आत्मिक रीतिने पहिला पति कोण आहे? काहीजण म्हणतात मृत्युपूर्वी नियमाशास्त्राधीन ते येशू आहेत (गल ४:४) जास्त लोकांचे मत असे आहे की मोशे द्वारे दिलेले नियमशास्त्र आहे. विश्वासूच्या संबंधात हा नियम शास्त्र तेव्हाच मेला जेव्हा येशूचे मरण झाले. मग पहिला पति नियमशास्त्र आहे की नियमशास्त्राधीन येशू ख्रिस्त. विशेष गोष्ट जी पौल सांगतो. ती ही की जेव्हा ख्रिस्त मेले तेव्हा विश्वासू देखील मरण पावले. (६:६,८). मेलेले असल्यामुळे ते नियमशास्त्राच्या अधिकारातून मुक्त झाले. ते आत्मिक "पति" होण्यासाठी स्वतंत्र आहेत. परमेश्वराबरोबर नविन संबंध ठेवण्यास ते स्वतंत्र आहेत. ख्रिस्ताला आपला स्वामी व तारक स्वीकार केल्याने ते त्यांची "नवरी" /"वधू" बनतात. मत्तय २२:२; योहान ३:२९; २ करिंथ ११:२; इफि ५:२५-३३; प्रकटी १९:७. "ख्रिस्त व विश्वासूंचे एक होणे" याचा उद्देश पहा. "परमेश्वराकरिता आत्मिक फळ आणण्यासाठी. योहान १५:१८पहा.

७:५ नियमशास्त्राने पापमय इच्छांना जन्म दिला. पहा वचन ७-९; ३:२०; ४:१५; ५:२०. जे कार्य करून तो दोषी ठरतो, तेच कार्य करण्याची मनुष्याची इच्छा असते. जे खाण्याची मनाई असते, तेच फळ गोड लागते. परंतु या सर्वांचा परिणाम मृत्युच आहे. (६:१६,२१,२३).

"शरीर" या ग्रीक शब्दाची निर्मिती "सार्क्स" पासून आहे. सार्क्स पासून सार्की तयार झाले. हा शब्द लोकांच्या पापमय स्वभावाकडे इशारा करतो. ते पापमय असल्यामुहे आपल्या अभिलोबेचे गुलाम आहेत. या सर्व गोष्टी त्याकडे संकेत करतात जे मनुष्याच्या मनात, प्राणात व शरीरात आहेत. १:१८-३२; ३:९-१९; उत्पत्ति ८:२१; यिर्म १७:९; मत्तय ७:११; १५:१९; इफि २:१-३; ४:१७-१९; तीताला ३:३.

७:६ मोशेच्या नियमान्वये आपण "त्याच्या काबूत होतो. पौल नियमांची अधीनता परमेश्वराची दया, पवित्र आत्म्याच्या स्वतंत्र सेवेचा विरोधाभास या वचनात मांडतो (२ करिंथ ३:६,१७ देखील पहा). वचन ८ मध्ये पौल पवित्र आत्म्याच्या मदतीने सेवा करण्यावर भर देतो. पुनरूत्थानानंतर परमेश्वराने आपला आत्मा एका नव्या रूपात दिला म्हणून पौला याला एक नवा मार्ग म्हणतो. (योहान ७:३८; १४:१६,१७; प्रेरित १:४; २:४).

७:७ पौलाच्या मते नियमशास्त्राने पापमय इच्छांना जन्म दिला (वचन ५) जर असे असेल तर ते स्वत: पापमय होत नाही का ? नाही, नियमशास्त्र स्वत: पवित्र, सत्य व उत्तम आहे. (वचन १२) परंतु लोक स्वभावाने, अपवित्र अनीतिमान व वाईट आहेत (३:९-१९). नियमशास्त्र प्रकट करते की ही लोकांची उणीव आहे. या वचनात व पुढच्या वचनात पौल दाखवतो की त्याच्या जीवनात सर्वकाही सत्य कसे होते.

त्याच्या स्वत:च्या संबंधात विचारांना नष्ट करणारी आज्ञा, अभिलाषेच्या विरोधात होती. (निर्ग. २०:१७). खरे पाहिल्यास अभिलाषा न ठेवण्याच्या आज्ञेने त्यांची अभिलाष तीव्र झाली व त्यात भर पडली. पापमय हृदयाकरिता परमेश्वराचे नियमशास्त्र "मुळीच नाही" पण त्यामुळे या अभिलाषा अधिक प्रबळ व तीव्र होत जातात. "विद्रोह" हा शरीरा चा एक भाग होय जो परमेश्वराच्या नियमशास्त्राच्या विरोध करतो (८:७).

७:८ ज्योपर्यंत ही गोष्ट चांगल्या प्रकारे पौलाने समजून घेतली नाही तो पर्यंत त्याने स्वत:च्या ठायी पाप किंवा त्याच्या प्रभावाला ओळखले नाही; जणू पाप अक्रियाशील होते.

९ दिल्यामुळे माझ्या आत पापाने संधि साधून सर्व प्रकारचा लोभ उत्पन्न केला. **एक** समयी मी नियमशास्त्रापासून
१० वेगळे जीवन व्यतित करत होतो, पण जेव्हा नियम शास्त्र दिले गेले, पाप पुन्हा जगृत झाले व मी मेला. **जी** आज्ञा
११ जीवन देईल अशी अपेक्षा होती तिने मृत्यु आणली. **याकरता** की वाईटाने आज्ञेच्या मदतीने लाभ घेऊन मला धोका
१२,१३ दिला व मला आज्ञेने मारून टाकले. **म्हणूनच** परमेश्वरीय आज्ञापवित्र, चांगली व खरी आहे. **जे** चांगले आहे ते
माझ्याकरिता मृत्यु बनू शकते का ? मुळीच नाही. पण यासाठी की पापाने वाईटच दिसावे; जे काही चांगले होते
१४ त्यामुळे माझ्यात मृत्यु उत्पन्न केली का, यासाठी की आज्ञेच्या द्वारे पापाने जास्तीत जास्त काय दिसावे ? **आपल्याला**
माहित आहे की नियमशास्त्र आत्मिक आहे; परंतु मी आत्मिक नाही, व पापाच्या द्वारे गुलामाच्या रूपात विकलेला
१५ आहे. **मला** समजत नाही की मी काय करतो, कारण जे काही मी करू इच्छितो ते करू शकत नाही. परंतु तेच
१६ करतो जे मला आवडत नाही. **जर** मी तेच करतो जे करू इच्छित नाही, तर मी हे मान्य करतो की नियमशास्त्र

---

७:९ पौल जुण्या कराराने जन्माला होता. ख्रिस्तात नवाजन्म घेण्यापूर्वी तो नियमांच्या प्रति जबाबदार होता. एके समयी तो आत्मिक रीतिने जिवंत होता या साठी की त्याने नियमांचा आत्मिक अर्थ जाणला नव्हता. जेव्हा त्याने हे जाणले की आज्ञा ही आहे की वाईट अभिलाषा करू नये तेव्हा त्याला पापाची जाणीव झाली कारण तो आत्मिक रीतिने जिवंत नव्हता. ''मी मेलो'' हा त्याच अनुभवाकडे त्याने केलेला इशारा आहे.

७:१० प्रामाणिकपणाचे, नैतिकतेचे जीवन जगणे हा परमेश्वराच्या नियमांचा हेतू होता. पौलासाठी हा जणू मृत्युचाचा अनुभव होता. नियमशास्त्राद्वारे त्याला कळले की पापाचा परिणाम मृत्यु आहे.

७:११ पापाचा धोका देणारा स्वभाव -इब्री ३:१३ शी तुलना करा. नियमशास्त्रात जीवनाची प्रतिज्ञा दिली गेली परंतु यात केवळ मृत्युचा. समावेश होता.

७:१२ वचन ७

७:१३ नियमशास्त्रात खोट नाही; मानवाची खरी समस्या म्हणजे त्याच्या ठायी आसलेला अपराधी स्वभाव. पाप काय आहे. हे दर्शवण्यासाठी परमेश्वर नियमशास्त्राचा उपयोग करतात. दुषित मानवी स्वभाव ते मानण्याची इच्छा बाळगत नाही, असे करू हि शकत नाही. परमेश्वराच्या पवित्र आज्ञा मोडणे, पापाची भयानकता दर्शविते.

७:१४ वचन ७-१३ पौल आपल्य अनुभवाबद्दल सांगताना भूतकाळाच्या गोष्टी सांगतो १४-२५ मध्ये त्याने याला वर्तमान काळात बदलून टाकले. हा बदल महत्वाचा आहे. नव्या जन्मानंतर तो काय होता याबद्दल सर्व सांगतो. तो ''मी'' ''मला'' ''माझ्या'' व 'स्वत:' इत्यादि शब्दांचा उपयोग १२ वचनात ४० दा करतो. शेवटी एकदाच तो येशूविषयी बोलतो. तो परमेश्वराच्या आत्म्याविषयी मुळीच बोलत नाही. वर्तमान काळात सर्वकाहि सांगून तो २५ व्या वचनात ख्रिस्ताद्वारे परमेश्वराचे आभार मानतो. एक विश्वासू होण्याच्या नात्याने आपल्या अनुभवांचे तो स्पष्टीकरण देतो. १४ व्या वचनात तो सांगतो की तो स्वभावाने कसा आहे. परमेश्वराच्या नियमशास्त्राने दाखविले की तो व्यैयक्तिक पाप अवस्थेत कसा आहे. १४-१५ या वचनात पौल पापामुळे दु:खी होतो. आपण देखील तो पर्यंत पापाच्या गाढ अवस्थतेचा अनुभव करू शकत नाही जो पर्यंत परमेश्वराच्या आत्म्याने जागृत केले जात नाही. या वचनात पापमय स्वभावाच्या विरोधात, तारणप्राप्त न करणाऱ्यांचे मोठे युद्ध पाहिले जोते. अविश्वासू लोक आपल्या सर्व इच्छेवर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न करतात पण तरीहि पापमय स्वभावाच्या दोन सीमेत हे युद्ध कायम राहते. अविश्वासू स्वत:च्या मोठेपणासाठी प्रसन्नतेसाठी चुकीच्या मार्गाने काही प्राप्त करण्यासाठी जगतात, ख्रिस्त किंवा परमेवराच्या प्रशंसेसाठी नव्हे. ज्या संघर्षाविषयी पौल सांगतो, तो वेगळा होय.

७:१५-२४ पौलाप्रमाणे काही विश्वासू चांगले बनव्याची इच्छा बाळगतात, पण स्वत:त काही वाईट पाहतात. पौलाच्य जीवनात पापाचे दासत्व एका निर्दयी हुकुमशाहासारखे रेंगाळण्याचा प्रयत्न करत होते. जे काही तो बनू इच्छित होता बनू शकला नव्हता; जे करू इच्छित होता, ते करू शकला नव्हता; जे करण्याची त्याची इच्छा नव्हती, तेच तो करत होता.

७:१५ **''तेच करतो जे मला आवडत नाही''** १ करिंथ ६:९,१०. पौलाने स्पष्ट सांगितले की जे लोक अशी कामें करतात, ते परमेश्वराच्या राज्यात प्रवेश करणार नाहीत. कोणत्या गोष्टीशी नेमका त्याचा संघर्ष होता, ते स्पष्ट नाही; परंतु त्या इच्छा ज्या त्याच्या जुण्या स्वभावाच्या उरलेल्या परिणामांची भयानकता प्रकट करतात वचन ७,८.

परमेश्वराचा स्तर (परमेश्वराच्या प्रेषित पौलाचे) बाहय व्यवहार व आंतरिक विचारांची पद्धत व इच्छेसाठी पवित्रतेत व धार्मिकतेत पूर्ण होते. (२करिंथ ७:१; मत्तय ६:४८). या स्तराखालील जीवन पौलाला पसंत नव्हते. परंतु तो त्या उच्च स्तराला ही कायम ठेवू शकत नव्हता. जो संघर्ष पौल सहन करत होता त्याचा उद्देश हा होता की त्याचा विवेक परमेश्वर व मनुष्य यांच्यासाठी शुद्ध असावा. प्रेषित २४:१६; १करिंथ १:१२; म्हणजेच तो मुद्दाम पापात राहिला नाही.

७:१७ पौलाला कटु सत्य माहित होते की एक शत्रु त्याच्यात आहे जो त्याहून बलवान आहे.
''..... मी नव्हे... पण पांप जे माझ्यात वसलेले आहे.'' ख्रिस्तात नविन बनण्यापूर्वी त्याच्याजवळ जुणा स्वभाव होता.(हें आपल्यासाठीहि सत्य आहे.)
''मी नव्हे'' चा अर्थ - एक मोठे परिवर्तन जे वचन ४ मध्ये आहे. ख्रिस्त मरणान्वये आपण परमेश्वराच्या दृष्टित मेलो. (६:३-७; गलती ५:२४; कलस्सै ३:३), पौलाच्या मते हे परमेश्वराचे कार्य होते. त्याचे किंवा सर्व विश्वासूंचे वाईट स्वभावाशी काहीही नाते नाही. तो ख्रिस्तात जिवंत होता (कलस्सै २:११,१२ शी तुलना करा). म्हणून तो पापमय स्वभाव नाकारतो. योहान १:८ व इतर

१७,१८ चांगले आहे. **अशी** स्थितित याला करणारा मी नव्हे, पण माझ्यात वसलेले पाप आहे. **मला** ठाऊक आहे की, माझ्यात
अर्थात माझ्या शरीरात काहीच चांगले नाही. जे चांगले काम करण्याची माझी इच्छा नसते, ते करता येत नाही; जे
१९,२० वाईट मी करू इच्छित नाही तेच करतो. **जर** मी तेच करतो, ज्याची इच्छा नसते **तर** ते करणारा मी नव्हे, पण
२१ माझ्यात वसलेले पाप आहे. **मी** असा नियम स्वत:मध्ये बघतो की जेव्हा मी चांगले करू इच्छितो, तेव्हा वाईट मला
२२,२३ दाबण्यासाठी तयार आहे. **मी** परमेश्वराच्या गोष्टींमुळे हर्ष करितो **परंतु** आपल्या अवयवांची दुसरी कामें पाहतो, जी
माझ्या मनातील विचारांशी युद्ध करून मला माझ्या अवयवांत कार्य करणाऱ्या वाइट कार्यप्रणालीचे दास बनवतात.
२४ **मी** किती निराधार मनुष्य आहे, मला या मरणाच्या शरीरापासून

ठिकाणी, पाप किंवा त्याचा प्रभाव त्यात जिवंत होता. परंतु आता हा स्वभाव एदखादया विदेशी सारखा होता, ज्याला पौल नापसंत करतो. दुष्टशक्ति, दुष्टाला नव्हे पण त्याचा जुणा स्वभाव, त्याचा उरलेला अंश, पौलात वाईट अभिलाषा व कृप्रवृत्ति निर्माण करते; पण पौल जो नविन मानव होतो, जो ख्रिस्ताकरिता क्रूसित झाला होता, परमेश्वराच्या आत्म्याद्वारे नविन निर्मिती होता, म्हणून त्याला या गोष्टी करण्याची इच्छा नव्हती, व त्याने त्या केल्या देखील नाहीत. जुणा मनुष्य जो नियुक्त-मृत्युचे स्थान अस्वीकार करत होता, नास धूस करणारा होता. हा जुणा मनुष्य/स्वभाव पौलाला आपल्या अधिकाराच्या नियंत्रणात घेऊन आपली इच्छा पूर्ण करण्याचा प्रयत्न करत होता. यासाठी की हा "मी" नव्हतो ज्याने वाईट केले यासाठी की "मी" (ख्रिस्तात नवा मनुष्य) वाईटासाठी दोषी ठरलो नाही (४:८ पहा व समजा) म्हणून मृत्यु व नरक दंड त्यांच्यावर नाही जे ख्रिस्ताठायी आहेत(८:१) जुण्या वाईट स्वभावाने/उरलेल्या प्रभावाने त्यांनी काही केले तरी त्यांची मुक्ति/तारण कायम राहते. "जुणा मनुष्य" परमेश्वराच्या दृष्टित दोषी ठरवला गेला, वधस्तंभावर खिळला गेला, मारला गेलेला आहे. पौल पवित्र -जन असल्यामुळे, वाईटाचा बहाणा करत नव्हता-तो आम्हाला शिकवण्याकरता परमेश्वराच्या आत्म्याद्वारे शिकवत होता. आपल्या पापी स्वभावाचा पक्ष न घेता तो त्याचा तिटकारा करतो, व त्याचा प्रभाव व उपस्थिति पासून स्वतंत्र राहतो. तो आपल्या कामासाठी स्वत:ला जबाबदार समजतो. दुसऱ्या ठिकाणी तो लिहितो की "आम्ही सर्व जे, ख्रिस्ताच्या सिंहासना समोर उभे राहू ते आपल्या चांगल्या -वाईट सर्व कार्यांचा हिशेब देतील. (२करिंथ ५:१०).

७:१८ येथे परमेश्वराने पौलाला मानवी "शरीरा" (साकर्स-वचन ५) विषयी शिकवले. आदामापासून आपण सर्वांनी यास प्राप्त केले आहे. १:२९-३२; ३:९-१९; ८:५-८; १३:१४; उत्पत्ति ५:३;८:२१; यिर्म १७:९; मत्तय ७:११; १५:१९; गलती ५:१६,१७; इफि. २:१-३; १ तीमथ्य १:१५ चे नोट्स पहा.

पौल म्हणतो की आदामापासून प्राप्त केलेल्या स्वभावात कोणतेहि आत्मिक सत्य नाही. जे लोक आपल्या पापमय स्वभावाचे गुलाम आहेत, ते हे सांगू शकत नाही की परमेश्वराच्या दृष्टित काय चांगले/आत्मिक आहे(लूक १६:१५ शी तुलना करा). येशू ने म्हटले होते की आपल्या "स्व" ला पूर्णपणे मरण्याची गरज आहे, पौलाचे शिक्षण येशूच्या शिकवणुकी सारखी आहे. (मत्तय १०:३८; लूक ९:२३). येथे "प्रतिदिनी" या कडे लक्ष - दया - दर दिवशी यांचे नविनीकरण होणे आवश्यक आहे नाहीतर हे आपल्यावर शासन करण्यास प्रारंभ करेल.

येथे पौलाच्या चांगल्या इच्छेत व वाईट कार्यात एक अंतर दिसते. या आधारे सर्व विश्वासूंनी सत्याचा अवलंब करावा का ? आपल्या पापमय स्वभावाच्या विरोधात संघर्ष करताना पौलांच्या लक्षात आले की या दुष्ट स्वभावाला/प्रभावाला पराजित करण्याचे कोणतेच साधन त्याच्याजवळ नव्हते.

७:१९-२० दुसऱ्या शब्दांत तो याच गोष्टीशी घोषणा करतो. वचन १५,१७.

७:२१ "नियमशास्त्र" यातील गोष्टी निसर्ग नियमाप्रमाणेच सामर्थी आहेत. पौलाला कळले की ही गोष्ट कधी-कधी होणारी बाब नव्हे; म्हणून तो नेहमी चांगलेच करू पाहतो.(हा विश्वासूचा नवा स्वभाव आहे) त्याला कळले की चांगले करताना, वाईट विरोध करते व स्वत:कडे आकर्षित करण्याचा प्रयत्न करते.

७:२२ तारणप्राप्त न करणाऱ्या मनुष्याचे हृदय (आंतरिक भाग) कसे आहे, हे पवित्रशास्त्र सांगते. अशा लोकांची मने परमेश्वराच्या नियमांनी प्रसन्न होत नाही. उत्पत्ति ८:२१; यिर्म १७:९; मत्तय १५:१९. पापात मेलेले लोक (इफि २:१-३) परमेश्वराच्या कोणत्याहि चांगल्या गोष्टींनी प्रसन्न होत नाहीत. पौल म्हणतो की तो ख्रिस्तात जे काही होता, त्यात तो परमेश्वराच्य सत्यतेत प्रसन्न होत होता की "परमेश्वराच्या गोष्टीत मी प्रसन्न" व "मी तुझ्या नियमशास्त्राशी खूप प्रेम करतो" स्तोत्र ११९:७७,९७.

७:२३ **"दुसऱ्या कामांत"** परमेश्वराचे नियमशास्त्र सोडून दुसऱ्या व्यवस्थेकडे २२ व्या वचनात संकेत करतो; हे २१ व्या वचनातहि आहे. त्यातील कठोर भाषेकडे लक्ष दया. हे नियमशास्त्र त्याच्या विरोधात संघर्ष करून त्याला आपला कैदी बनवू पाहते. पौल आपल्या बुद्धिच्या व इच्छाशक्तिच्या बळावर जुण्या स्वभावार विजय प्राप्त करू शकला नाही व ही व्यथा तो पुढच्या वचनात प्रकट करतो.

७:२४ आपल्या अयशस्वीपणामुळे त्याच्या हृदयात गाढ दु:खच उत्पन्न झाले. त्याला ठाऊक होते की वाईट विचारांना बदलण्यात तो निरूपाय आहे.

"मृत्युचे शरीर" - ६:१२ पहा जेथे तो "मरणाधीन देह" अशी भाषा वापरतो. तुलना करा ६:६ "पापमय देह" (वचन १७; ८:१०). पौलाच्या मते देह पापमय स्वभाव/प्रभावा ने बांधलेले आहे. दुसऱ्या शब्दात "साकर्स" पापी स्वभाव/पापाचा प्रभाव शरीरात राहतो.

२५ कोण स्वतंत्र करेल? **मी** आपला स्वामी येशू ख्रिस्त परमेश्वर याची उपकारस्तुति करतो. मी मनाने नियमशास्त्राचा
८ गुलाम तर आहे परंतु पापमय स्वभावात पापाच्या नियमशास्त्राचा दास आहे. **म्हणून** ख्रिस्त येशूमध्ये असलेल्यांना
२ दंडाची आज्ञा नाही कारण ते शरीराच्या प्रेरणेने नव्हे तर परमेश्वरीय आत्म्याच्या प्रेरणेने जीवन जगत आहेत.
३ कारण येशू ख्रिस्ताद्वारे जीवनाच्या आत्म्याच्या नियमाने मला पाप व मृत्युपासून स्वतंत्र केले आहे. **परमेश्वराद्वारे**
दिले गेलेले नियमशास्त्र, शरीरामुळे, स्वत: बलहीन होते, त्याला परमेश्वराने आपल्या पुत्राला पापमय करून

---

भविष्यकाळी या मृत्युच्या देहापासून पौलाला स्वतंत्रता दिसते. ८:२३; १करिंथ १५:५३,५४; फिलि ३:२१ शी तुलना करा. तो या गोष्टीला प्राप्त करू शकतो. ज्या व्यक्तिने वचन १८-२१ यात लिहिले होते, त्यानेच ८:३७ व २ करिंथ २:१४ देखील लिहिले होते. या दोहात कोण बरोबर आहे; एकाच वेळी दोन्हीहि बरोबर आहेत.

७:२५ त्याच वेळी येशू ख्रिस्ताद्वारे मृत्युच्या शरीरापासून मुक्ततेसाठी, पौल परमेश्वराचे आभार मानतो (असे तो ख्रिस्तात विश्वासू होण्याच्या नात्यानेच करू शकत होता.) त्याच्या अपराधी स्वभावामुळे तो गुलामीचा अनुभव करतो. जर आपण त्याच्या कथनाकडे दुर्लक्ष केले तर, आपल्याला मागील वचनांचा अर्थ लावणे व समजणे कठीण होईल. (असे नव्या करारातील अनेक भागांविषयी खरे आहे) १३:१४; गल ५:१६,१७; १ योहान १:८ देखील पहा. प्रश्न हा आहे की विश्वासू या पापमय स्वभावा/प्रभावा पासून स्वतंत्र आहे का? तो परमेश्वराची सेवा, स्वतंत्र्येत व आनंदाने करू शकत नाही का ? आंतरिक मनुष्यत्वाच्या शत्रुवर तो विजय प्राप्त करू शकणार नाही की ? अध्याय ६ यात मार्ग आहे व अध्याय ८ यात तो अधिक स्पष्ट करतो. अध्याय ७ यात सांगतो की नियमशास्त्र पूर्ण करण्याच्य प्रयत्नात तो विजयी होऊ शकत नाही किंवा स्वत:च्या बळाने पापाशी दोन हात करू शकत नाही. कारण पाप कोणत्याहि महाबलीहून जास्त शक्तिमान आहे. तो फारो सारखा म्हणतो, ''मी स्वामीला जाणत नाही आणि त्यांच्या प्रजेला देखील जाऊ देणार नाही (निर्ग ५:२).

पौल यासाठी लिहित नाही की विश्वासूंनी निराश व्हावे; पण यासाठी की त्यांनी परमेश्वराच्या पद्धतीने विजय प्राप्त करावा.

८:१ **''म्हणून''** शब्द मागील शब्दांना जोडतो व या गोष्टीची निश्चिती करतो की ७:१४-२५ यांत पौल स्वत:ला ख्रिस्त येशूत एक व्यक्ति म्हणतो. पापाशी संबंध अगदी तोडला गेला होता. ७:१७ त्याचे आंतरिक भाग बदलून गेले होते म्हणून तो परमेश्वराच्या वचनात रमत जात होता. (७:२२). मृत्युच्या देहातून सुटका झाल्याबद्दल उपकारस्तुति देखील करू शकला (७:२५). ख्रिस्तात असल्यामुळे त्याला व कोणालाहि दंड नाही.

पापाशी संघर्षमय परिस्थितित विश्वास जरी स्वत:ला दोषी ठरवित असला तरी परमेश्वर तसे करत नाही. ४:७,८ शी तुलना करा. जर परमेश्वर लोकांच्या विरोधात अपराध पाहत नाही तर त्यांना का दोषी ठरवतील?

**''ख्रिस्त येशूत''** याचा अर्थ येशूची जुळणे किंवा त्यांच्या आत्मिक देहाचे सदस्य होणे - ६:३; १ करिंथ १२:१२,१३.

**''मृत्यु व नरक दंड नाही''** म्हणजे नीतिमान ठरवले जाणे. (३:२४; ४:७,८; ५:१) योहान ५:२४ देखील पहा. ख्रिस्त विश्वासूंसाठी मरण पावल्यामुळे जे कोणी त्यांच्याशी जुळलेले आहेत त्यांच्यासाठी ख्रिस्ताने दोष व पाप नेहमीसाठी संपवून टाकले आहे. ते नविन जीवनासाठी जिवंत असून दंडापासून दूर आहेत. विश्वासूंना दंडाज्ञा न होण्याचे आणखी एक कारण म्हणजे ख्रिस्तात विश्वासाचा असा मार्ग जो पाप व मृत्युच्या नियमापासून स्वतंत्रता देतो. (वचन २). ख्रिस्त विश्वासूंना शुद्ध करून नीतिमान ठरवतात. हा एकमात्र असा मार्ग आहे ज्याच्याद्वारे पापी स्वभाव, जग व सैतानावर विजय प्राप्त होतो.

''जे वाईट स्वभावाने नव्हे तर परमेश्वरीय आत्म्याच्या प्रेरणेने जीवन जगतात'' पुष्कळ ज्ञान्यांच्या मते हे वाक्य चुकून ४ थ्या वचनातून उतरवले गेले व ग्रीक भाषेत पहिल्या वचनात नव्हते. दुसऱ्यांचे मत वेगळे आहे. जे लोक ख्रिस्त येशूत आहेत त्यांची हिच व्याख्या आहे. जर आपण या प्रकारे समजलो तर हे स्पष्ट होत जाते. म्हणून ख्रिस्त येशूत जे आहेत त्यांच्यावर दंड आज्ञा नाही; कारण ते परमेश्वराच्या आत्म्याने जीवन जगतात.

८:२ या पूर्ण अध्यायत व ७:१४-२५ यात विरोधाभास आहे, आम्ही खिस्तात ''जे काही आहोत'' त्याविषयी हा अध्याय सांगजो. अध्याय ७ मध्ये पाप व मृत्युच्या नियमापेक्षा एक वेगळा नियम दिसतो. विश्वासूंना बलवान करणारा हा ''आत्म्याचा नियम'' आहे. विश्वासूत पवित्र आत्म्याचे वसणे व सर्व काही करण्यास योग्य बनवणे होय. ८ व्या अध्यायात पौल, ख्रिस्त व परमेश्वराच्या आत्म्याकडे जवळ जवळ ३० दा इशारा करतो (७:१४ चे नोट्स पहा) पौल या अद्भुत सत्यावर प्रकाश घालतो की परमेश्वराने विश्वासूंच्या देहात आपल्या आत्म्याला रहावयास पाठविले आहे; ते विजयासाठी; कारण पवित्र आत्मा हे एक बळ आहे (वचन ४,१३) तो शांती व जीवन देतो (वचन ६), तो मर्गादर्शन करतो (वचन १४).

तो सांगतो की ती परमेश्वराची बाळे आहेत (वचन १५,१६) तो त्यांच्यात राहून त्यांच्यासाठी प्रार्थना करतो (वचन २६,२७), योहान १४:१६,१७ यात पवित्र आत्म्यावरील नोट्स पहा.

८:३ **''नियमशास्त्र''** मोशेद्वारे दिलेले नियम लोकांना वाचवण्यात पाप आणि वाईटावर विजय देण्यास असमर्थ होते. (३:१९,२०; ४:१५; ७:५; ७,१४).

**''शरीर''** (वचन ४,५,८,९, व १३ देखील) ७:५ वरील नोट्स पहा. पापी लोकांना वाचवण्याचा मार्ग दयावयास परमेश्वराला. आपला पुत्र पाठवावा लागला (योहान ३:१४-१६). पुत्र येशू वाईट मनुष्याच्या रूपात आले नाहीत. (२करिंथ ५:२१; इब्री ४:१५; ७:२६;१पेत्र २:२२). या पृथ्वीवर येशूचे बाहय स्वरूप मानवासारखे होते; ते पांपासाठी बलिदान म्हणून आले होते (हि शब्द ग्रीक भाषेत नाही पण अर्थ हाच आहे). ते मानवाच्या पाप-समस्येचे समाधान करावयास आले होते व त्यासाठी प्राण दिला.(३:२४,२५).

४ बलिदान चढवले. **म्हणून** परमेश्वराने अपराधाला पापमय स्वभावात दोषी ठरवले, यासाठी की नियमशास्त्राची
५ धार्मिक मागणी आपल्यात जे शरीरानुसार नाही परंतु आत्म्यानुसार चालतात, पूर्ण केली जावी. **जे** लोक शरीराच्या
आधारे जीवन जगतात, ते आपल्या अभिलाषांवर आपले मन लावतात पण जे परमेश्वराच्या आत्म्याद्वारे चालतात
६ ते परमेश्वराच्या आत्म्याच्या इच्छेवर चित्त लावतात. **दुष्ट** मनुष्याचे मन मृत्यु होय, परंतु जे मन परमेश्वरीय
७ आत्म्याद्वारे नियंत्रित केले जाते ते जीवन व शांती आहे. **पण** शरीरावर मन लावणे परमेश्वराच्या विरोधात जाणे
८ होय. **ते** परमेश्वरीय विधानाप्रति अधीनता स्वीकार करत नाही व करू ही शकत नाही. **जे** लोक शारीरिक अवस्थेत
९ आहेत, ते परमेश्वराला प्रसन्न करू शकत नाही. **जर** परमेश्वरीय आत्मा तुमच्या आत वसतो तर तुम्ही शारीरिक
१० अवस्थेत नाही, परंतु आत्मिक दशेत आहात. **जर** कोणाच्या आत ख्रिस्ताचा आत्मा नाही, तर तो ख्रिस्ताचा नाही.
जर ख्रिस्त मनात आहे तर, जरी पापामुळे तुमचे देह मेलेले आहे, तरी नीतिमत्वामुळे; तुमचा आत्मा जिवंत आहे.

---

८:४ परमेश्वराचे लक्ष्य:लोकांना अपराधाचा दोष, दंड व शक्तिपासून सोडवणे हे होते. स्वत:साठी एक पवित्र समाज बनवणे जो नियमशास्त्राच्या नीतिमत्तेला पूर्ण करेल.(९:१२,१४). इब्री ८:१० देखील पहा. विश्वासूंशी ही अपेक्षा नाही की जुण्या करारातील गोष्टींचे त्यांनी पालन करावे(६:१४;७:४); तसेच दिवस, रीति, विधि इत्या. पालन करण्याची गरज नाही परंतु परमेश्वराची इच्छा आहे की जुण्या करारातील नैतिक नियमशास्त्राचे पालन विश्वासूंनी करावे; या दोन आज्ञेत दिसते; १३:८-१०, मत्तय २२:३७-४०. या सर्व "आत्म्यानुसार जीवन" जगण्याद्वारे पूर्ण होतील; पूर्ण अध्यायात परमेश्वराच्या आत्म्याबद्दल सांगितले आहे. गलती ५:१६-१८ देखील पहा. आत्म्यानुसार जगणे म्हणजे: तो आमच्यात राहतो यांची जाणीव होणे (वचन ९,१५). स्वत:ला त्याच्याठायी सोपवणे ६:१३.

त्याचे म्हणणे मान्य करणे (वचन १४; गल ५:२५).
त्याच्या बळावर व अधिकारावर भरंवसा करणे व त्याचा उपयोग करणे (वचन १३)
त्याच्या उपयोग करणे (वचन १३).

८:५-८ **"अभिलाषा"** (७:५; गल ५:१७) या पृथ्वीवरील दोन प्रकारच्या लोकांचे वर्णन पौल करतो. एका प्रकारचे लोक एका तऱ्हेने विचार करतात, दूसरे क्रांतिकारी पद्धतीने, अविश्वासू लोकांची अभिलाष त्यांना वेगळया मार्गावर नेते परंतु परमेश्वराचा आत्मा, परमेश्वराची इच्छा विश्वासूंच्या मनात आणतो. लोकांच्या जीवन शैलीवर लोकांचा प्रभाव अवलंबून असतो. (पहा २ करिंथ १०:५; फिलि ४:८; कलस्से ३:१६; स्तोत्र १:२).

पापी स्वभावाच्या गोष्टी कधीकधी धार्मिक व बुद्धिमत्तेच्या देखील असू शकतात; परंतु त्या परमेश्वराच्या नसतात. (मत्तय १६:२३) त्या स्वर्गिय बाबी नाहीत (कलस्सै ३:२) परंतु पृथ्वीच्या आहेत (फिलि ३:१९). परमेश्वराच्या आत्म्याशिवाय त्या स्वाभाविक दिसतात.

**"मृत्यु"** वचन ६ :म्हणजे आत्मिक मृत्यु किंवा परमेश्वरा पासून वेगळे (यश ५९:२; इफि २:१; ४:१८). लोकांचे स्वाभाविक मन अशा गोष्टींवर लागलेले असते ज्या त्यांना आवडतात. त्या गोष्टींचे खऱ्या परमेश्वराशी काही देणे-घेणे नसते, त्या परमेश्वर विरोधी असतात (वचन ७). असा व्यक्ति विचार करू शकतो की तो परमेश्वराच्या पक्षात आहे व तो परमेश्वरावर प्रेम करतो परंतु हा धोका आहे.

परमेश्वराचे म्हणणे ऐकण्यासाठी व्यक्तिचे मन परिवर्तन होणे गरजेचे आहे. नविन जीवनाचे विचार मनात आणल्याशिवाय परमेश्वराला कोणी प्रसन्न करत शकत नाही. जरी असा मनुष्य धार्मिक, नैतिक किंवा शिक्षित असून, जोमाने परमेश्वराच्या नियमांचे पालन करू असेल तरी परमेश्वराच्या आत्म्याशिवाय सर्वकाही पाप व मृत्युच आहे; व परमेश्वर ते स्वीकार करणर नाहीत. योहान ३:३-८. नीतिमत्व व नैतिकतेने जरी एखादयाचा पापी स्वभाव लपलेला असला तरी परमेश्वरास तो ग्रहण योग्य नाही परमेश्वराला आंतरिक गोष्टींशी देणे-घेणे आहे. (इब्री ४:१२,१३). मनुष्याचे धार्मिक विचार व अपराधी भावना, पांपाने कलंकित आहेत. तुलना करा यशया १:११-१७; नीति १४:२२.

८:९ **"च्यात"** वचन ५-८ यांत पौल दोन प्रकारच्या व्यक्तिविषयी सांगतो. त्यांच्या दोन मर्यादा असतात परमेश्वराच्या आत्म्याशिवाय ते पापमय स्वभावाचे जीवन जगतात; परंतु ज्यांच्या जवळ परमेश्वराचा आत्मा आहे त्यांनी पाप व वाईट स्वभाव त्यागलेला आहे; परमेश्वराचा आत्मा त्यांच्यात राहतो व तो व्यक्तिदेखील आत्म्यात राहतो.

या वचनात परमेश्वराच्या आत्म्याला येशू ख्रिसताचा आत्मा म्हटले गेले आहे. फिलि २:६, लूक २:११ पहा. ख्रिस्ताच्या आत्म्याशिवाय कोणीहि देवबापाचा नाही, नीतिमान ठरवला जात नाही. असे लोक स्वत:ला ख्रिस्ती म्हणत असले तरी ते ख्रिस्ती नाहीत. ख्रिस्ताचा आत्मा कसा प्राप्त होतो? ख्रिस्तात विश्वासाद्वारे लोकांनी विश्वास केल्यांमुळे पवित्र आत्मा पुरस्कार स्वरूपात देवबाप देतात (५:५)

८:१० पौल ९ व्या वचनात म्हणतो की परमेश्वर विश्वासूच्या ठायी वसतात. येथे तो म्हणतो की ख्रिस्त स्वत: त्यांच्यात वसतात. (योहान १७:२३; २ करिंथ १३:५; कलसै १:२७; प्रकटी ३:२०) आपल्या आत्म्याच्या रूपात ते त्यांच्यात आहेत. हे वचन परमेश्वर, पुत्र व आत्म्याची एकता दर्शविते. (याचा अर्थ हा नव्हे की बाप, ख्रिस्त व पवित्र आत्मा एकच व्यक्ति आहे). मत्तय ३:१६; योहान १७:१; २योहान ३ इत्या. विश्वासूचे शरीर मेलेले आहे. ६:१२; ७:२४ शी तुलना करा. इतरांप्रमाणे ख्रिस्ती लोकांच्यातहि मृत्युची प्रक्रिया चालू आहे. जर ख्रिस्त आपल्या जिवंत अवस्थेत आले नाहीत तर आपण मरणारच; याचे कारण पाप आहे. जीवनाचा आत्मा (वचन २) विश्वासूत आहे, येशूमुळे त्यांचा आत्मा जिवंत आहे.

११ **जर** परमेश्वराचा आत्मा ज्याने ख्रिस्ताला मेलेल्यातून जिवंत केले, तुमच्यात आहे तर ज्याने ख्रिस्ताला मृतकातून
१२ उठवले, त्या आत्म्यामुळे जो तुमच्यात आहे, तुमच्या मर्त्य शरीराला देखील जीवन देईल. **म्हणून** बंधू भगिनींनो
१३ आपण शरीराचे कर्जदार/ऋणी नाही की त्याचे ऐकावे. **कारण** जर तुम्ही शरीरानुसार जीवन जगाल तर मराल,
१४ परंतु जर पवित्र आत्म्याद्वारे देहाच्या वाईट कामांना माराल, तरजगाल. यास्तव **जे** लोक यहोवा परमेश्वराच्या
१५ आत्म्याद्वारे जीवन जगतात तेच त्यांचे पुत्र-कन्या आहेत. **कारण** तुम्ही असा आत्मा प्राप्त केला नाही, जो तुम्हाला
भिण्यासाठी दास बनवतो, परंतु तुम्ही तर दत्तकपणाचा आत्मा प्राप्त केला आहे. म्हणून आपण त्यांना अब्बा, बापा
१६ अशी हाक मारतो. **मला** वाटते की, आमचे या दिवसातील दु:ख त्या सन्मानापुढे जो आम्हावर प्रकट केला जाईल,
तुलना करण्याच्या लायकीचे नाही. परमेश्वराचा आत्मा आपल्या आत्म्याबरोबर साक्ष देतो की आपण स्वर्गिय
१७ बापाची मुले -मुली आहोत. **जर** मुले मुलीतर, आपण वारीस आहोत अर्थात ख्रिस्ताबरोबर बापाचे वारीस

---

८:११ येथे दोन प्रकारचे सत्य आहे- मेलेल्यातून येशूचे उठवले जाणे (१:४; मत्तय २८:६) विश्वासूंचे भविष्यात जिवंत होणे वचन २३; योहान ६:३९; १ करिंथ १५:१२. १ थेस्स ४:१६. शुभवर्तमानानुसार देह विश्वासूच्या आत्म्यासाठी, मात्र एक नाशवंत घर नव्हे, परंतु एका हत्याराच्या रूपात महत्वपूर्ण आहे. ज्याप्रमाणे येशूचा देह उठवला गेला त्याच प्रमाणे विश्वासूचा देह उठविला जाईल व सन्मान प्राप्त करेल (फिलि ३:२१).

८:१२-१३ या महान सत्याप्रति विश्वासूचा व्यवहार कसा असावा? परमेश्वाराच्या अद्‌भुत कृपेच्या प्रकाशत त्यांची जबाबदारी काय आहे? या विषयी पौल ६:११-१३,१९ यात काही सांगतो. विश्वासूंनी आपल्या पापमय स्वभावाचा विरोध करावा; पवित्र आत्म्याच्या बळाच्या सहयोगाने आपल्या दैहिक कार्यांना ठार मारावे (कलस्सै ३:५-१०) पहा. मत्तय ५:२९,३०; गल ५:२४ शी तुलना करा. प्रत्येक चुकीचे कार्य पवित्र आत्म्याच्या मदतीने ठारमारणे होय. पापाला व त्याच्या सामर्थ्याला नष्ट करण्याचे कार्य प्रभुच्या शक्तिचे आहे, आपले नाही, आपण त्यांच्याशी सहयोग करावा (फिलि २:१२,१३). ज्याप्रमाणे विषारी सापांना आपण घरी राहू देत नाही याचप्रमाणे, वाईट कामें व इच्छा यांना देहात वास करू देऊ नये.

खरा विश्वासू आत्म्याच्या शक्तिने आपल्या जीवनातील दुष्टता सोडून देतो व त्याचा विरोध करतो. हा निर्णय तो पूर्वीच घेतो, अचानक घेतलेला हा निर्णय नव्हे हे हळू व कष्टदायक असले तरी काही विश्वासू पूर्णपणे यात यशस्वी होतात. दैहिक कामांना जर आपण मारले नाही तर त्याचा अर्थ होतो की, आपल्यात जीवनाचा आत्मा कार्य करत नाही. (१ योहान ३:६-९ शी तुलना करा). निरंतर देहाच्या इच्छेने जगणे यागोष्टीचे प्रमाण आहे की त्याच्यात आत्मा नाही. असे जीवन सतत मृत्युकडे जाते (वचन ६; ६:१६,२३).

८:१४ येथे परमेश्वराचा बाळ होण्याचा अर्थ आहे: जी बालके परमेश्वराच्या आत्म्याद्वारे उत्पन्न झाली आहेत तिच परमेश्वराची बाळे आहेत. (योहान १:१२,१३). ती परमेश्वराच्या आत्म्याच्या मार्गदर्शनाचे पालन करतात (योहान १०:२७). यासाठी की त्यांनी ''वाईट कामांना ठार मारावे''. तो त्यांना स्वार्थ व पापांपासून दूर घेऊन जातो. जर असा अनुभव नसेल तर तो व्यक्ति मन पालट होणे, विश्वासाचा अनुभव घेणे, तारण होणे यापासून वंचित आहे. (१ योहान २:४-६; ३:३; ७:१०; योहान १४:२३,२४).

पौल विश्वासूंना परमेश्वराचे ''पुत्र-कन्या'' म्हणतो. ६:१६-२२ यात तो त्यांना गुलाम म्हणतो - येथे विरोधाभास नाही कारण ''दास्यत्वा'' विषयी त्याचा अर्थ लादलेले बंधन नाही परंतु आनंदाने व स्वइच्छेने परमेश्वराची सेवा होय. त्यांचे गुलाम बनून विश्वासू स्वत:ला पुत्र-कन्या सिद्ध करतात. जर ते परमेश्वराचे गुलाम होण्यास तयार नसतील तर ते पुत्र कन्या होण्याच्या लायकीचे नाहीत.

८:१५ विश्वासू स्वत: परमेश्वराचे गुलाम बनतात, इच्छा किंवा भितीमुळे नव्हे. (इब्री २:१४,१५ शी तुलना करा). ते परमेश्वराच्या आत्म्याच्या वासामुळे - जाणून -समजून परमेश्वराला आपला बाप म्हणतात.

**''दत्तकपण''** २३ वचन पहा.

अरामी भाषेत बापासाठी ''अब्बा'' शब्द आहे (मार्क १४:३६; गल ४:६).

८:१६ परमेश्वराचा व विश्वासूंचा आत्मा यातील अंतर पहा. ते दोन्ही एकसारखे नाहीत. योहान १४:१६,१७. जेव्हा विश्वासू आपल्या दैहिक कार्यांना जीवे मारतात (वचन १३,१४) तेव्हा त्यांच्या हृदयात आत्म्यात व परमेश्वराच्या आत्म्यात आनंदाची सहमती असते. परमेश्वराचा आत्मा त्यांना निश्चिंत करतो की ती परमेश्वराची मुले आहेत (१ योहान ३:२४; ४:१३ शी तुलना करा). परमेश्वराच्या आत्म्याची साक्ष हा एक आंतरिक अनुभव आहे. आपली आंतरिक साक्ष व बायबलची बाह्य साक्ष एकमेकांशी सहमत आहेत याची आपल्याला खातरी असते. परमेश्वराचा आत्मा वचनात सांगितलेल्या गोष्टीच्या विरोधात कधीहि सांगणार नाही. परमेश्वराला, वचनाला, व्यैयक्तिक व विश्वासूच्या हृदयात वास्तविक बनवतो. निश्चयतेसाठी पहा ५:५; १ योहान ५:१०,२०; १ करिंथ २:९-१२; योहान १६:१३-१५. आत्म्यास दु:ख देणे म्हणजे त्याची ध्वनि शांत करणे व ही धोक्याची बाब आहे. (४ इफि ४:३०).

८:१७ ''वारीस'' येशू सर्व वस्तूंचे वारीसदार आहेत. (इब्री १:२) म्हणजेच सर्व वस्तुंना रचणे होय. पहा ४:१३; १ करिंथ ३:२१-२३; इफि १:१४; कलस्सै १:१२; प्रकट २१:७; मत्तय ५:५.

१८ **जर** आपण ख्रिस्ताच्या दु:खात सहभगी होतो तर आपण त्यांच्या सन्मानात व गौरवात सुद्धा सामील होऊ शकू.
१९,२० **सृष्टि** मोठया उत्कंठेने परमेश्वराच्या पुत्र-कन्यांच्या प्रकट होण्याची प्रतीक्षा करत आहे. **कारण** सृष्टि आपल्या
२१ इच्छेने व्यर्थतेच्या अधीन केली गेली नव्हती. पण त्यांच्या इच्छेमुळे ज्यांनी तिला अधीन केले होते. **ते** पण हया
आशेने की सृष्टि गुलामी व सडकेपणतून मुक्त केली जाऊन परमेश्वराच्या बालकांच्या अद्‌भुत स्वतंत्रते आणली
२२,२३ जावी-**आम्हाला** ठाऊक आहे की पूर्ण सृष्टि जणू प्रसूति वेदनेने कव्हत आहे. **मात्र** सृष्टिच केवळ नव्हे तर स्वत:
ज्यांच्या जवळ पवित्र आत्म्याचे प्रथम फळ आहे ते आपणहि स्वत: दत्तकपणाची म्हणजे आपल्या देहाची सुटका
२४,२५ होण्याची वाट पाहू कव्हत आहोत. **याच** आशेसाठी आपण मुक्ति देखील प्राप्त केली आहे. **परंतु** जी आशा दिसते,
ती आशा नाही, कारण जे काही व्यक्ति पाहतो त्याची आशा तो का धरणार ? पण जर आम्ही दिसत असलेल्या
२६ गोष्टींची आशा बाळगली तर त्याकरता आपण धैर्याने आशा ठेवतो. **याच** प्रकारे पवित्र आत्मा आपल्या अशक्त
पणात सहाय्य करतो. यासाठी की आपल्याला ठाऊक नाही की काय व कसे मागावे. परंतु परमेश्वराचा आत्मा
२७ स्वत:आमच्यासाठी अशी कव्हन मध्यस्थी करतो की जी शब्दांत सांगता येत नाही. **जे** हृदयाच्या भावनेला
पारखातात त्यांना ठाऊक की पवित्र आत्म्याची काय इच्छा आहे, कारण तो वेगळे केलेल्या लोकांसाठी देवबापाच्या

---

**''दु:खात सहभागी''** (दु:खानंतर सन्मान हिच परमेश्वराची पद्धत होती, तिच आपल्य मुलांचे मार्गदर्शन करण्याची रीत आहे. लूक २४:२६). आज देखील परमेश्वर याच पद्धतीचा अवलंब करतात. योहान १६:३३; प्रेषित १४:२२; १ पेत्र ४:१,१२). जे सर्व लोक सहन करतात, तसा त्रास, दु:ख, क्लेश सहन करणे नव्हे पण याचा अर्थ हा आहे या साठी की आपण त्यांचे आहोत, एका अशा जगात आहोत जे ख्रिस्ताला पसंत करत नाहीत, त्यांना तुच्छ जाणतात, असे सर्व लोक जे ख्रिस्ताचे आहेत ते सर्व दु:ख सहन करतील. (२ तिमथ्य ३:१२; योहान १५:१८-२१)

जर येशू सोबत छळ सहन करण्याची आपली तयारी नाही तर त्यांच्या सन्मानात व वतनात आपली भागीदारी आहे, असा विचार करण्याचा आपल्याला अधिकारच नाही. दु:खातून जातांना असे का ? हा प्रश्न करू नका या उलट जर क्लेश व पीडा नाही तर विचारा की क्लेश का नाही ?

**''सन्मान व आदर''** ५:२; ९:२३; योहान १७:२२-२४; कलसै १:२७; ३:४; १ थेस्सलनी २:१०; इब्री २:१४; १पेत्र ४:१३,१४; ५:१०.

८:१८ पौलाने अतिशय दु:ख सहन केले. (२ करिंथ ११:२३-२९) परंतु अनंत सन्मानांच्या तुलनेत ते अगदी ''कमी जाणले'' - २ करिंथ ४:१७. त्याला खातरी होती की तो असा सन्मान प्राप्त करेल, ज्याच्या मदतीने त्याला धैयाने वर आनंदाने दु:ख सहन करण्यास मदत होईल (५:३).

८:१९ **''परमेश्वराचे पुत्र व कन्यांचे प्रकट होणे''** -मुले-मुली वचन २३; कलसै ३:४; १ पेत्र १:५; १ योहान ३:१,३.

८:२०-२३ पहिल्या व्यक्तिच्या दोषामुळे संपूर्ण विश्वावर समस्या आली उत्पत्ति ३:१४-१९. जे काही परमेश्वराने आरंभी बनवले ते सर्व चांगले होते (उत्पत्ति १:३१). पापामुळे मृत्यु व नाश यांचे उत्तम सृष्टित पदार्पण झाले. ही सृष्टि जी कण्हत आहे ती स्वतंत्र होऊन गौरवात प्रवेश करेल यश ११:६-९; २५ ६-८; ३५:१-१०; ४९:८-१३ यासमयी सृष्टि जशी असावी तशी नाही. येशूच्या आगमना नंतर जशी असेल तशी ही नाही. येशू द्वारे सृष्टि पापांपासून सोडवल्या जाणाऱ्या परिणामांचीहि भागीदार बनेल.

८:२३ पहा ७:२४; २ करिंथ ५:४. आपल्या मुक्तिच्या अंतिम टप्प्याची विश्वास उत्कंठेने वाट पाहतात व कण्हतात.म्हणजे त्यांचे जिवंत होणे व सन्मानित होणे (गौरव) वचन ३०. येथे त्यांच्या शरीराची ''सुटका होणे'' म्हटले गेले आहे. पहा १ करिंथ १५:५१-५४' फिलि ३:२१; योहान ५:२८,२९.

**''दत्तक घेतले जाणे''** म्हणजे विश्वासू आत्मा प्राण व शरीर यात ख्रिस्तासारखे नेहमीसाठी बदलून जातील स्वतंत्र व बदललेल्या सृष्टित विश्वासू परमेश्वराची बालके होण्याचा अधिकार प्राप्त करतील.

८:२४-२५ **''आशा''** ५:२ पौल व इतर लेखक ज्याप्रमाणे आशे बद्दल सांगतात, त्याचा ग्रीक अर्थ, इंग्रजीतल्या आशेहून अधिक विशाल आहे. म्हणजेच जे काही परमेश्वराने दाखवले ते अवश्य होणारच, ही विश्वासाची दुसरी सीमा होय. तीताला १:२; १ पेत्र १:२१ पहा.

८:२६ हा अध्याय विश्वासूंच्या आत्मिक जीवन व मुक्ति विषयी अद्‌भुत प्रकटीकरणाने भरलेला आहे. यात तीन प्रकारचे कव्हने आहे. पहा वचन २२ व २३. सृष्टि, विश्वास व परमेश्वराचा आत्मा सर्व एकत्र कण्हत आहेत. आपल्यात परमेश्वराचा आत्मा का कण्हतो? कारण तो आपले कल्याण इच्छितो. तो आमच्या बुद्धित, पवित्रतेत व येशूच्या समानतेत रूचि ठेवतो. त्याचा भरसक प्रयत्न असतो की आपण पापाच्या दलदलीतून व सैतानाच्या प्रभावापासून वाचावे; पित्याची बळकट व फलदायके बालके बनवण्याच्या प्रयत्नात तो असतो. पौलाच्या आत्मिक प्रेरणेने केलेल्या प्रार्थनांशी तुलना करा- कलस्सै १:९-१२.

**''का?''** कारण विश्वासू स्वत:पूर्ण तऱ्हेने अशक्त आहे. (७:१४-२५), त्याला आत्म्याची मदत व मध्यस्थीची अतिशय गरज आहे. परमेश्वराशी कसे व काय बोलावे आपल्याला ठाऊक नाही; आपल्या अशक्तपणाला बलशाली बनवण्यासाठी , परमेश्वराचा आत्मा आमच्यात कार्य करतो. (२ करिंथ १२:९,१०) त्याच्याच द्वारे आपण आपल्या अशक्तपणात बलवान होतो.

८:२७ विश्वासूंच्या जवळ दोन बुद्धिमान मध्यस्थ आहेत (वचन ३४. त्यांच्या जवळ एक सर्वात अधिक बलवान आहे, जे या दोन मध्यस्थांची ऐकतात, यासाठी की ते दोघे परमेश्वरानुसार विनंती करतात, देवबाप नेहमी पुत्र व आत्मा यांची प्रार्थना ऐकतात

२८ इच्देनुसार प्रार्थना करतो. **आम्हाला** माहित आहे की ज्या लोकांना, त्याचा उद्देश्य पूर्ण करण्यासाठी बोलावले गेले
२९ आहे, व जे त्यांच्यावर प्रेम करतात, त्यांच्यासाठी सर्वकाही चांगल्या साठीच होते. **याकरता** ज्यांना देवपित्याने
३० पूर्वीपासून ओळखले होते यासाठी की येशू सर्व सोबतीच्या विश्वासूत सर्वश्रेष्ठ ठरवले जावेत. **याच** बरोबर ज्यांनी
पूर्वी पासून ठरवले होते त्यांना बोलावले सुद्धा, त्यांना नीतिमान घोषित केले आणि ज्यांना नीतिमान बनवले त्यांना
३१ आदर व सन्मान देखील दिला. **तर** मग हया गोष्टींवरून आपण काय म्हणावे ? जर परमेश्वर आपल्या सोबत आहे,
३२ तर आपला शत्रु कोण होऊ शकणार? **ज्याने** आपल्या स्वत:च्या पुत्रास राखून ठेवले नाही, परंतु त्यास आपणा

---

(१ योहान ५:१४,१५ शी तुलना करा). विश्वासूच्या अशक्तपणात जगाच्या वाईट स्वभावात व सैतानावर विजय प्राप्त करण्यासाठी त्रैक्य परमेश्वर कार्यरत आहेत.

८:२८ येथे जे वचन आहे, त्याची अमलबजावणी आपल्या जीवनात फार कमी लोक करतात. जे कोणी या शब्दांवर विश्वास करून ते लागू करतात ते जणू एका तापलेल्या कठोर भूमित एखादया मोठया खडकाच्या थंड छायेसारखे आहेत. अशक्यतेहि हे वचन सत्य आहे (वचन ३५-३९ चे काही अनुभव, विश्वासूंचे असू शकतात) प्रसन्न आहेत ते लोक जे कठीण समस्येतही हे सत्य लागू करू शकतात.

पौल म्हणतो ''आम्हाला ठाऊक आहे की'', म्हणजेच आशेचे किरण दिसते असे नाही किंवा आमचा अनुमान आहे की, असे होईल असेहि नाही, तर असे की आपण यांवर भरंवसा करू शकतो कारण परमेश्वराने ते प्रकट केले आहे. (उदा. उत्पत्ति ५०:२०) जे त्यांच्यावर प्रेम करतात ''बोलावले गेले आहे''. विश्वासूंना परमेश्वराने आपले कार्य पूर्ण करण्यासाठी बोलावले आहे. (वचन ३०, १:५,६; १करिंथ १६:२३; १ योहान ४:८,१६) यासंबंधी दोन विचार आहेत. पहिला हा की ''संदर्भ - मध्यस्थी'' यासत पवित्र आत्म्याची सेवा म्हणून ''सर्वकाही'' म्हणजे पवित्र आत्मा काय व कशी प्रार्थना करतो. दुसरी कडे लोक म्हणतात की, ज्या परिस्थितितून विश्वासू जातात त्या सर्वांना परमेश्वर त्यांना कल्याणा(म्हणजे ख्रिस्तासारखे होणे) साठी उपयोगात आणतात. आमच्या मते संदर्भ अर्थ घेणे जास्त उचित होईल.

८:२९ २८ त्या वचनात परमेश्वराचा उद्देश आहे, विश्वासूचे ख्रिस्तासारखे होणे (इब्री २:१०,११; १ योहान ३:१;२). याहून दुसरा मोठा हेतू असू शकत नाही. पौल या बाबतीत पाच पावलांची गोष्ट करतो. दोन-संसाराच्या प्रारंभीचे दोन ख्रिस्ताच्या विश्वासू जीवनाच्या प्रारंभाचे आणि एक अजून बाकी आहे. ही सर्व पाऊले जुळलेली आहेत व परमेश्वर त्यांना घडवतो हे निश्चित आहे.

''जाणले होते'' ''माहित होते'' या गोष्टी परमेश्वरीय योजनेनुसार परमेश्वराच्या ज्ञानावर आधारित आहेत. पौल पूर्वज्ञानाचे वर्णन व पूर्वीपासून ठरवले जाण्याशी त्याचा संबंध याविषयी सांगत नाही. या पत्राच्या शेवटी असलेले नोट्स पहा. **''पूर्वीपासून ठरवले''** हे पवित्रशास्त्र ६ वेळ पाहिले जाऊ शकते. (येथे वचन ३०; प्रेषित ४:२८; १ करिंथ २:७; इफि १:५,११. याचा नशीब व कर्म यांशी अजिबात संबंध नाही. जे काही केले जाईल त्यासंबंधीचे ज्ञान असणे हा त्याचा अर्थ होय. सर्वशक्तिमान परमेश्वराला जे हवे ते होईल. प्रेषित ४:२८. यात जी घटना दर्शवली आहे ती नव्या करारातील विश्वासूंच्या विषयी, पूर्वी पासून ठरवले जाण्याबद्दल सांगते. अनंत नाशासाठी कोणालाही परमेश्वराने ठरवले असा उल्लेख यात नाही; हीच गोष्ट विश्वासूंना खूप शांती व आशा देते. यामुळे परमेश्वराने त्यांना तारणसाठी ठरवले आहे की नाही याविषयी निराश होण्याचे कारण नाही. योहान ६:३७,४४ मधील नोट्स पहा. ज्याची इच्छा आहे तो ख्रिस्ताजवळ येऊ शकतो. (प्रकटी २२:१७). जो भरंवसा ठेवतो त्याचे हे प्रमाण आहे की परमेश्वराने त्यांना निवडले आहे.

८:३० **''बोलावले''** वचन २८; १:६ याचा अर्थ - बोलावले जाणे. परमेश्वराच्या पाचारणविषयी - (११:२९; गलती १:६; २ थेस्स २:१४; १करिंथ १:९;२४; गलती ५:१३; कलस्सै ३:१५; १ तिमथ्य ६:१२; १ पेत्र २:२,९,२०, २१;३:९) यहूदा १; २ तिमथ्य १:९; इब्री ३:१. विश्वासूंनी जाणावे की परमेश्वराने त्यांना बोलावले आहे.

''नितिमान घोषित'' परमेश्वर विश्वासूंना ताबडतोब क्षमा करतात व पूर्णपणे निर्दोष असे पाहतात. पहा १:१६,१७; ३:२१-२८; ४:५; ६:८; ५:१; १०:१०.

''आदर व सन्मान'' वचन १७,१८,२३ - परमेश्वराचे तारण हे त्यांचे शेवटचे पाऊल आहे ज्याची सुरवात जुण्या काळचीच आहे. 'जाणणे', ठरवले जाणे जसे निश्चित आहे तसेच 'आदर व सन्मान' निश्चित आहे(तुलना करा ४:१७). जे ठरवले गेले, ते बोलावले गेले, नीतिमान ठरले व त्यांना आदर सन्मान देखील मिळाला. हे गौरव व हा आनंद सन्मान प्राप्त होणे ख्रिस्ताच्या द्वितीय आगमनानंतर होईल. विश्वासू ख्रिस्तात जुळले असल्यामुळे वास्तविक दृष्टिया त्यांनीहि आदर सन्मान प्राप्त केला आहे पहा. योहान १७:२२; इफि २:६; कलस्सै ३:३-४. हे सर्व त्यांच्या अंतिम तारणाविषयी आहे. ज्यांना परमेश्वराने आपल्या पुत्रावर भरंवसा करण्यासाठी बोलावले आहे. स्वत: ख्रिस्तांनी या गोष्टीला योहान ६:३६-४०; १०:२७-२९ यात सांगितले आहे.

८:३१ आपण काय म्हणावे? आपल्या लोकांसाठी देवबाप ज्या कही योजना तयार करतात त्या संबंधी आमचे सर्व शब्द विश्वास, स्तुति आणि निश्चयतेचे असावेत. आपण असा विश्वास करतो तो देवबाप आमच्या बाजूला, आत व आपल्या सोबत आहे; परमेश्वराच्या आपल्या साठीच्या योजना कोणीही नष्ट करू शकत नाही. (वचन ३७, इब्री १३:६; योहान १०:२९; रोम ५:२०)

८:३२ परमेश्वर प्रेम असल्यामुळे त्यांना ''देणे'' आवडते. (१ योहान ४:८; २ पेत्र १:३; २ करिंथ ९:१५; प्रेषित १४:१७; मत्तय ५:४५; ७:१०; स्त्रोत १४५:९). ते पूर्ण दयेचे परमेश्वर आहेत(१ पेत्र ५:१०). त्यांचे सिंहासन ''कृपेचे'' सिंहासन आहे. (इब्री ४:१६). विशेषत: त्यांची दया त्याच्या लोकांवर आहे. (रोम ५:२१). त्यांची ''कृपा'' सर्व कमतरतेवर व दुष्टतेवर विजयी ठरते.

३३ सर्वांकरीता समर्पण केले, तो येशू सोबत आपल्याला सर्वसर्व कांही कसे देणार नाही? **देवबापाच्या** निवडलेल्या
३४ लोकांच्या विरोधात कोण आरोप सिद्ध करणार ? देवपिता स्वत: त्यांना निरपराधी सिद्ध करतात. **कोण** त्यांना
अपराधी ठरवणार? येशू मेले, पण याहून श्रेष्ठ म्हणजे ते मेलेल्यांतून उठले आणि आता सर्वोच्च अधिकारांसाहित
३५ देवबापा सोबत आहेत व आपल्यासाठी मध्यस्थीहि करीत आहे. **ख्रिस्ताच्या** प्रीतिपासून आपल्याला कोण वेगळे
३६ करील? क्लेश, आपत्ति, छळणूक, उपासमार, नग्नता, समस्या किंवा तरवार ही विभक्त करतील काय? **जसे** लिहिले
३७ आहे की, ''तुझ्यामुळे आम्ही दिवस भर मारले जातो; कापावयाच्या मेंढरांसारखे आम्हांला समजले जाते. **नाही,**
३८ या सर्व गोष्टीत ज्याने आपणावर प्रेम केले त्याच्या द्वारे आपण जिंकणाऱ्या लोकांपेक्षाहि महाविजयी ठरतो. **कारण**
३९ मला खातरी आहे की मरण, जीवन देवदूत, अधिकारी, शक्ति, वर्तमानकाळातील किंवा भविष्यकाळातील गोष्टी, **न**
उंची, न खोली, न इतर कोणतीहि सृष्ट वस्तु आम्हाला परमेश्वराच्या त्या प्रीतिपासून वेगळे करू शकत नाही, जी
**९** आपल्या प्रभु येशूत आहे. **मी** ख्रिस्तामध्ये खरे बोलत आहे, मी खोटे बोलत नाही, माझा विवेक देखील पवित्र
२,३ आत्म्यात साक्षदेतो **की** माझ्या हृदयात एक भारी ओझे आणि कायम टिकणारे दु:ख आहे. **खरेच** जे लोक माझ्या

---

परमेश्वराने आपल्या पुत्राला सर्वात मोठे 'बक्षिस' म्हणून दिले आहे. तारणाच्या अंतिम टप्पयावर जे काही करणे राहिले आहे ते करण्यात, परमेश्वर काही ऊणे ठेवतील काय?

८:३३ विश्वासू नीतिमान ठरवले गेल्यामुळे परमेश्वर त्यांच्या विरोधात कसलाहि आरोप ऐकू शकत नाहीत. कोणताहि आरोप परमेश्वर ग्रहण करणार नाहीत. ४:६-८ पहा; व त्यावरील टीप देखील. परमेश्वर त्यांच्या दोषांना मोजत नाहीत, याचा अर्थ असा होईल का की विश्वासूंना दुष्टता करण्याची सूट मिळते? मुळीच नाही ६:१,१५; ८:४; १२-१४.

८:३४ कोण एखादया विश्वासूला अपराधी गणू शकतो? कोणीहि नाही, सैतान किंवा दुसरे लोक देखील नाही, किंवा स्वत: विश्वासू सुद्धा नाही. त्यांच्या अपराधासाठी ख्रिस्ताने एका बलिदानाच्या रूपात आपले प्राण दिले आहेत;(इब्री १०:१०,१४) पूर्ण अधिकारांसह ते येशू बापा बरोबर आहेत. दोष लागत असतांना देवबाप त्यांचा बचाव करतात. त्यांचे जीवन व मध्यस्थी विश्वासूंना आता व सदा सर्वकाळ सुरक्षित ठेवतात (५:९,१०; इब्री ७:२५; १ योहान २:१).

८:३५-३९ येथे विश्वासूसाठी ख्रिस्ताचे प्रेम असा अर्थ होतो; विश्वासूंचा ख्रिस्तासाठी नव्हे. ख्रिस्ताची प्रीति दुष्टतेमुळे संपली तर ? पण त्यांचे प्रेम कधीहि समाप्त होत नाही. कारण ते सदाकाळचे आहे.(यिर्मया ३१:३) या पृथ्वीवर त्यांच्या आगमनापूर्वी प्रेमाचा प्रारंभ झाला व तो सर्वकाळ राहणार. ख्रिस्त लोकांच्या पापी व वाईट स्वभावाला जाणत होते म्हणूनच त्यांनी लोकांना आपल्या प्रेमाचे लक्ष्य बनवले. येशूचे प्रेम ज्ञानापलिकडचे आहे(इफि ३:१९) सर्व बाधा. ओलांडून लोकांना आपल्या प्रिय व पवित्र उपस्थितित त्यांचे प्रेम आणते. (श्रेष्ठ ८:६,७ शी तुलना करा).

पौल समस्या व धोका या सामान्य बाबीविषयी या ठिकाणी बोलतो. (योहान १६:३३; प्रेषित १४:२२ इत्या.) सैतान विश्वासूंवर विजय प्राप्त करण्यासाठी मनात शंका आणतो की, ख्रिस्त खरोखरच त्यांचयावर प्रेम करतात काय ? काही काळ लोक शंकेत राहू शकतात. अशा परिस्थितित ख्रिस्त त्यांचा त्याग करतील काय? त्यांचे प्रेम समाप्त होईल काय? नाही कधीच नाही. जीवनाच्या सर्व संभाव्य अनुभवांनंतर ते सुरक्षित पोचणार.

८:३६ स्त्रोत ४४:२२.

८:३७ या अध्यायाच्या संदर्भात असे म्हणू शकतो की ख्रिस्त विश्वासूला विपुल विजय देतात. हा अनुभव एकटया-दुकटया लोकांसाठी नाही. शब्द ''आपण'' यांत रोमच्या सर्व विश्वासूंचा समावेश होतो. (सध्याच्या सर्व विश्वासूंचा देखील) असा अनुभव त्याचा होऊ शकतो जो केवळ विजयीच होत नाही परंतु ज्याच्यासाठी पराजय शक्यच नाही. ''आपण'' म्हणजे ''कदाचित आम्ही'' किंवा ''शक्य'' असे नाही. पाप, सैतान, संसार व शरीर विश्वासूंना काही काळ अस्वस्थ चिंतित किंवा पिडित करू शकेल २ करिंथ ४:८,९. परंतु त्या विश्वासूवर या सर्व गोष्टी अंतिम विजय प्राप्त करू शकत नाही.

विजयाच्याहि पुढे असलेलया लोकांचा पराभव करणे शक्य नाही करण ज्या परमेश्वराने त्यांना विश्वास दिला आहे. ते देवबाप त्यांना शेवटपर्यंत विश्वासात कायम ठेवतील, त्यांना ख्रिस्तात सुरक्षित ठेवून शेवटी अंतिम विजय देतील.

८:३८ पौल ठासून म्हणतो की विश्वासू येशू ख्रिस्ताच्या देखरेखीत आहेत. म्हणूनच जीवन व त्यांच्याशी जुळलेली प्रलोभने त्यांना देवबापापासून वेगळी करू शकत नाही. भविष्य, मृत्यु व कोणतीहि वाईट किंवा चांगली शक्ति सुद्धा नाही. काही म्हणतील की येथे पापा संबंधी काही नाही. विश्वासू च्या पापाशी संबंधित प्रश्नाविषयी परमेश्वर वचन ३४ व ४:८ यात काय म्हणतात. कृपा शासन करते (५:२१) पौल या सत्याप्रति आश्वस्त होता तसेच आपणहि आनंदित असावे.

ख्रिस्ताचा शुभसंदेश काय आहे हे सांगतांना तो मुक्तिच्या सामर्थ्याविषयी सुद्धा सांगतो. परमेश्वराच्या क्रोधाच्या अधीन असलेल्या मानवाच्या भयंकर स्थिति विषयी सांगतांना पौल दर्शवितो की कशा प्रकारे, क्षमा प्राप्त कलेले, नीतिमान झालेले, शुद्ध केले गेलेले, सन्मानित बनवलेले व प्रेम करणारे लोक अनंत सुरक्षिततेच्या स्थानी पोंचतात. यावरून आपण पाहतो की त्यांना लाज का वाटत नाही (१:१६). येशूचा संदेश अद्‌भुत अतुलनीय, शक्तिवान व वर्णनापालिकडचा आहे. मानवाच्या आवश्यकतेसाठी व परमेश्वराच्या सन्माना योग्य आहे. आपण विश्वास करावा, शिकावे व आनंदित रहावे; जीवनभर लोकांना सांगत रहावे.

९:१-३ तो परमेश्वराद्वारे दिल्या गेलेल्या तारणाच्या कार्याला संपवतो. ९,१०,११ यात पौल सांगतो की तारणाच्या कार्याला व शुभवर्तमानाला इस्त्राएलाने तुच्छ का जाणले, व इस्त्राएलाचे भविष्य काय आहे.

४ नात्यातले आहेत म्हणजेच इस्त्राएली, त्यांच्यामुळे मी ख्रिस्ताद्वारे शापभ्रष्ट ठरलो असतो. **दत्तकपणाचा** हक्क व
५ महिमा-करार, नियमशास्त्रदान, परमेश्वराची सेवा व अभिवचने त्यांचीच आहेत, **पूर्वज** हि त्यांचेच आहेत, शरीराच्या
दृष्टिकोनातून ख्रिस्त यहूद्यांतून आले होते, जे सर्वांवर असून परमेश्वर आहेत; व युगानुयुग प्रशंसनीय आहेत
६ असेच होवो. **तरी** देवबापाचे वचन व्यर्थ झाले आसे नाही; कारण इस्त्राएल वंशातले ते सर्व इस्त्राएली नाहीत. ते
७ सर्व इस्त्राएली नाहीत. **ते** सर्व अब्राहामाचे संतान देखील नाहीत, जरी ते अब्राहामाच्या वंशाचे असले तरी नाहीत
८ तरी देखील "इसहाकाच्या वंशाला तुझे संतान म्हणतील." **याचा** अर्थ असा की जी केवळ शरीरिक रीतिने यहूदी
९ वंशात जन्मली, ती देवबापाची मुहे नाहीत, पण अभिवचनानुसार जन्मलेली मुलेच संतान म्हटली जातील. **कारण**
१० "पुढे याच सुमारास मी येईन तेव्हा सारेला एक पुत्र होईल" या शब्दात ती प्रतिज्ञा होती. **इतकेच** नव्हे तर जेव्हा
११,१२ रिबकाहि इसहाकापासून गरोदर राहिली. **ती** मुले जी जन्मली नव्हती किंवा ज्यांनी बर-वाईट केले नव्हते, **यासाठी**
की परमेश्वरचा उद्देश कायम राहावा; जो कार्यांवर नव्हे तर त्यांच्या निवडीवर अवलंबून आहे.(आणि परमेश्वर जे
१३ स्वत: पाचारण करतात) तिला सांगण्यात आले की, "वडील धाकटयाची सेवा करील" **कारण** जसे लिहिले आहे की

---

**"विवेक"** प्रेषित २३:१; २४:२६; १ करिंथ ४:४; ८:७; २ करिंथ १:२२; १ तिमथ्य ५:१९; ३:९. पौल ठामपणे सांगतो जरी यहूदी लोक त्याला शत्रु मानित होते.

(प्रेषित २१:२१,२८; २४:५); खरे पाहता, पौल त्यांच्यावर प्रेम करत होता, इतका की त्यांच्या तारणासाठी आपला नाश करण्यासहि तयार होता (जर हे शक्य असते तर). निर्ग ३२:३२ व गल ३:१३ शी तुलना करा. इस्त्राएलाची सुटका करणारे देवबाप पौलाच्या जीवनात कार्यशील होते.

९:४,५ पौल ३:१ यात पूर्ण प्रकारे उत्तर देतो. राष्ट्राच्या स्वरूपात इस्त्राएलाचे काही फायदे होते ते ख्रिस्ताचा नकार करण्याद्वारे संपले नव्हते. या वचनात पौल ज्या भाषेचा उपयोग करतो, त्यावरून हा संकेत इस्त्राएलाकडेच आहे असे सिद्ध होते.

दत्तक पणा याचा अर्थ - परमेश्वराने इस्त्राएलाला आपले लोक होण्यासाठी निवडले आहे. अनु ७:६; १४:१-२) ज्या ठिकाणी परमेश्वराची उपासना पाहता येत होती तेथे भविष्यात येणाऱ्या गौरवाची प्रतिज्ञा, ही पृथ्वीवर राहणाऱ्या लोकापैकी त्यांच्यासाठीच होती. निर्ग ४०:३४,३५; १ राजे ८:११; यहे ४३:२-५; ४४:४). परमेश्वराने त्यांच्याशी करार केला होता. (उत्पत्ति १५:१८; निर्ग २४:८; २ शमु ७:१६; २३:५; यिर्म ३१:३१-३३; ३४:४०). केवळ त्यांनाच देवपित्याने नियम दिले होते. निर्ग २०:१,२) अनु ४:८. उपासनेची पद्धत परमेश्वरानेच त्यांना दिली होती. (निर्ग २५:४०; १ राजे अध्या ६). संपूर्ण पवित्रशास्त्रात मोठाल्या आशीर्वादांची प्रतिज्ञा आहे. पूर्वज त्यांचेच आहेत ते ज्यांना परमेश्वराने पुढारीपण करण्यास निवडले होते. (११:२८; उत्पत्ति १२:१-३; निर्ग ३:६). येशू यहूदी असून अब्राहम व दाविदाच्या वंशाचे होते.

**"ख्रिस्त जे सर्वोच्च आहेत..सदा सर्वकाळ प्रशंसनीय आहेत"** हे स्पष्ट आहे की येशूच परमेश्वर आहेत. पहा फिल २:६ व लूक २:११.

९:६ अनेक आशीर्वाद असतानाहि यहूदयांनी ख्रिस्त व त्यांच्या संदेशास मान्य केले नाही. परमेश्वराचे राज्य त्यांच्याकडून काढून घेतले गेले व ते इतरांना दिले गेले. (योहान १:११; मत्तय २१:४२,४३). याचा अर्थ असा लावता येईल काय की परमेश्वराचे वचन पूर्ण झाले नाही व प्रतिज्ञा भंग झाली पौल म्हणतो नाही. तो दोन प्रकारच्या यहूदयांचे वर्णन करतो, ते जे इस्त्राएलातून निघाले परंतु ज्यामधून परमेश्वराने निवडीद्वारे त्यांना पाचारण केले; दुसऱ्या प्रकारचे लोक खरे यहूदी आहेत. पहा. २:२८,२९; मत्तय ३:९; योहान ८:३९,४१.

९:७-९ उत्पत्ति २१:१२ अब्राहमाजवळ इतर दुसरी मुले होती. उत्पत्ति १६:१५;२५:१,२). परमेश्वराने अब्राहामाचा वारीस व आत्मिक वंश होण्यासाठी इसहाकाची निवड केली होती. तो "प्रतिज्ञेचा" बालक होता. ४:१८-२१; उत्पत्ति १५:४०; १७:१५,१६; १८:१०; २१:१-३. दुसऱ्या शब्दात म्हणायचे झाले तर. करारानुसार परमेश्वराने अब्राहामाला जी प्रतिज्ञा केली त्यांत स्वाभाविक पद्धतीने त्यांच्यापासून उत्पन्न होणारे. सर्वच त्याच्या वंशाचे नव्हते, परंतु केवळ तेच ज्यांना परमेश्वराने निवडले होते.

हीच सत्यता इसहाकाच्या वंशासाठीहि सत्य ठरते, परमेश्वराने फक्त याकोबाला इसहाकाचा वारीस होण्यासाठी निवडले होते; त्याचप्रमाणे अब्राहामाच्या वंशावलीत प्रतिज्ञा प्राप्तीसाठी, व लोकांना पुढारीपण देण्यासाठी देखील. एसावास तुच्छ लेखिले जाणे जुळलेले नव्हते; देवबापाने आपल्या समंजसपणाने एकाची निवड केली व दुसऱ्याला तुच्छ जाणले; देवपित्याने असेहि म्हटले नाही की मोठा नरकात जाईल व धाकटा स्वर्गात; परंतु वडील धाकटयाची सेवा करील" असे म्हटले.

९:११ या अध्यायात, एका व्यक्तिच्या तारणाची नव्हे तर लोकांशी व राष्ट्रांशी परमेश्वराने केलेल्या व्यवहाराविषयी सांगितले आहे.

९:१२ उत्पत्ति २५:२३.

९:१३ मलाकी १:२,३ परमेश्वराच्या नापसंती विषयी :स्तोत्र ५:५; मलाकी १:३; लूक १४:२६ यावरील टीप पहा. याकोबावरील आपले प्रेम परमेश्वराने इतिहासात दाखवले. एसावाच्या वंशाचा इतिहास दर्शवितो की त्यांच्यासाठी तसे प्रेम परमेश्वराजवळ नव्हते.

इतिहासात वचन १२ च्या पूर्णतिच्या पुष्टिसाठी पौल मलाकीच्या गोष्टींची पुनरावृत्ति करतो.

१४ मी याकोबावर प्रीति केली आणि एसावाचा द्वेष केला. **तर** आपण काय म्हणावे? परमेश्वर अन्यायी आहेत का?
१५,१६ मुळीच नाही. **कारण** ते मोशेस म्हणतात, ''ज्या कोणावर मी दया करतो त्याच्यावर मी दया करीन **आणि** ज्या कोणावर
मी करूणा करतो त्याच्यावर मी करूणा करीन''.म्हणून देवबापाचा चांगुलपणा प्रयासाने किंवा मनोकामनेने प्राप्त
१७ केला जाऊ शकत नाही. **परमेश्वराच्या** वचनात मिसर देशाचा राजा फिरोन याला सांगितले गेले होते की, ''मी तुला
पुढे केले आहे ते यासाठी की तुमच्यात मी आपला पराक्रम दाखवावा आणि माझ्या नावाची घोषणा संपूर्ण पृथ्वीवर
१८ केली जावी.''**म्हणून** त्यांच्या इच्छेप्रमाणे ज्यांवर दया दाखवाविशी वाटते ते दया करतात व ज्यांना कठोर
१९,२० करावयाचे आहे त्यांना कठीण हृदयाचे करतात. **तेव्हा** तू मला म्हणशील की परमेश्वर दोष का शोधतात? कोण
२१ त्यांच्या इच्छेविरूद्ध जाणार? **परंतु** हे मानवा, देंवाला उत्तर मागणारा तू कोण? **एखादी** वस्तु रचनाकाराला म्हणू
शकेल काय की '' तू माझी रचना अशी का केलीस? कुंभाराला अधिकार नाही काय की त्याने मातीच्या एका

---

९:१४:२४ या युगात इस्त्राएल देशाचा तिरस्कार केला जाणे अगदी योग्य आहे. परमेश्वराच्या न्यायाचा प्रश्न उठणे साहाजिकच होते (वचन १४) उत्तर हेच आहे की परमेश्वर सार्वभौमिक आहेत, आणि ते आपल्या इच्छेनुसार सर्व करतात. सर्व अपराधी आहेत(३:९,२३). देवबाप कुणाचाहि अस्वीकार करू शकतात. परमेश्वराला काही विचारण्याचा किंवा अन्यायाबद्दल दोष लावण्याचा कोणालाहि अधिकार नाही. (२०,२१) परमेश्वर -परमेश्वर आहेत. निसर्गाचे ते महान राजा आहेत (स्तोत्र ४७:१-३; यश ४०:२२,२३; दानि ४:३४,३५; मलाकी १:१४). स्वइच्छेने परमेश्वर वाटेल ते करू शकतात.

काहींची निवड करणे व काहींना सोडून देणे याचा कर्म, पुनर्जन्म किंवा मागील जन्माशी कोणताहि संबंध नाही. (यात कोणती देखील वास्तविकता नाही ईयोब ११:१२; योहान ९:३ चे नोट्स)

यात एका हुकुमशहाचा उद्दामपणा नाही कारण परमेश्वर सार्वभौमिक आहेत. प्रत्येक बाबतीत आपलीच इच्छा पूर्ण करतात. परमेश्वर प्रेम आहेत (१ योहान ४:९). ते आपल्या स्वभावानुसार कार्य करतात म्हणूनच जेव्हा योग्य वेळ असते तेव्हा त्यांची दया प्रकट होते. (१०:१२;११:३२; निर्ग ३४:६,७; मीका ७:१८. जेव्हा मानवाचे परिवर्तन होत नाही, तो पापात राहण्याची इच्छा ठेवतो, तेव्हा न्यायी स्वभावाचे असल्यामुळे परमेश्वर लोकांना शिक्षा-शासन करणे गरजेचे समजतात; पण या अवस्थेत त्यांचे प्रेमी हृदय दु:खी होणे. यिर्म ४८:३०-३९; लूक १९:४१ वरील नोट्स पहा. रोमकरास पत्रातील या वचनांना वेगळे करून पाहिले जाऊ नये. परमेश्वराची सार्वभौमिकता, पूर्वज्ञान व पूर्वी पासून निश्चित असल्याचे रहस्य काहीहि का असेना एक गोष्ट निश्चित आहे की वचनात सांगितलेल्या स्वभावाच्या विपरीत देवबाप काही देखील करत नाही; ते वाईट करत नाहीत; त्यांचे कार्य पूर्ण न्याय व प्रेमावर अवलंबून आहे; आपली हृदये त्या मजबूत खडकावर विसंबून राहू शकतात.

९:१४ उत्पत्ति १८:३५; इत्या.

९:१५ निर्ग ३३:१९.

९:१६ परमेश्वराला ज्ञान आहे की कोणाला शासन करावे व कोणावर कृपा करावी; त्यांची कृपा नि:शुल्क आहे. मानव परमेश्वराला या बाबतीत बाध्य करू शकत नाही. परमेश्वराचे हृदय कठोर आहे, ते कृपा करत नाहीत असे समजू नये (११:३२; यश ५५:७). परमेश्वराची दयाळू प्रेमळ इच्छा आहे. त्यांच्याजवळ कठोर इच्छा नाही जी याच्या विरोधात जाईल.
गरजेप्रमाणे ते दंड व कृपा करतात.(१०:२०,२१; उत्पत्ति ६:७; यिर्म ४८:३०-३९; यहे १८:३०-३२; लूक १९:४१-४४). आपण निश्चितपणे म्हणू शकतो की परमेश्वराची सार्वभौमिकता त्यांच्या प्रेमाच्या विरूद्ध जात नाही किंवा कोणासाठी अन्यायाचे कार्य करण्यास प्रेरित करत नाही.

९:१७ निर्ग ९:१६; ७:१७ वाईट मनुष्यासाठी असा व्यवहार करून परमेश्वर आपला सन्मान व ज्ञान वाढवू शकतात. जगासाठी ही एक लाभाची व कृपा प्राप्तीची गोष्ट आहे.

९:१८ निर्ग ४:२१ यात फारोच्या कठोर हृदयावरील टीप पहा. परमेश्वराने कृपाळू होऊन देशावरील विपत्तिंना दूर करावे अशी फारोची इच्छा होती परंतु स्वत:च्या कुकर्मांना त्यागून परमेश्वराची सेवा करण्याची इच्छा त्याने बाळगली नाही म्हणून पहिल्याहून जास्त पाप व हृदयाचा कठोरपण वाढवून परमेश्वराने त्यावर शासन केले.(१:२१-२६,२८ शी तुलना करा). जे लोक शासन योग्य नाहीत त्यांना देवबाप कठोर करत नाही, त्यांना जे सर्वोत्तम वाटते तेच ते करतात.

९:१९-२१ मनुष्य आपल्या दुष्ट अवस्थेसाठी व कठोर हृदयासाठी परमेश्वरावर दोष लावेल हे पौलाला ठाऊक होते. खरे पाहता मनुष्यच त्यासाठी जबाबदार आहे. मानवाजवळ परमेश्वराशी वाद घालण्यासारखे काहीही नाही याची पौलाला जाणीव होती. तुलना करा उत्पत्ति ३:१२,१३. कुंभाराशी वाद घालण्याचा, भांडयाला/पात्राला काहीच अधिकार नाही. तुलना करा यश २९:१६; ४५:९; ६४:८; यिर्म १८:४-६.

परमेश्वराने निसर्ग -निर्मिती करतांना कोणतीहि वाईट गोष्ट रचीली नाही. आणि प्रेमी कुंभार कुरूप भांडे तयार करत नाही. वाईट भांडयाशी, सैतानाची भूमिका जुळलेली आहे. मनुष्याला स्वत:च्या चुकीची व अयोग्यतेची जाणीव होणे गरजेचे आहे. परमेश्वर सार्वभौम असून आपल्या मर्जीने रचना करतात, हा विश्वास मानवाने ठेवावा. विरूद्ध बोलण्याऐवजी, दोष लावण्याऐवजी स्वत:चे समर्पण केल्याने परमेश्वर आपला उपयोग चांगल्या कार्यासाठी करतील.

एकच गोळा (वचन २१) सर्वांजवळ वाईट स्वभाव आहे ३:९; इफि २:३. या स्वभावानुसार काही मनुष्य स्वत:ला वाईट माती व काही स्वत:ला चांगली माती बनवतात. आपण सर्वच एका गोळयातून म्हणजेच आदामातून निघालेले आहोत त्या मुळेच वाईट स्वभावाचे आहोत. (३:१९;५:१२; ७:१८)

२२ गोळयाने एखादे पात्र एका विशेष उपयोगासाठी व दुसरे एखादया साधारण उपयोगासाठी रचावे? **परमेश्वराला** असा
अधिकार नाही काय की त्यांने नाश होणाऱ्यांवर आपला क्रोध व सामर्थ्य दाखववावा? आणि त्यांनी तसे केलेहि आहे
२३,२४ **की** परमेश्वराने ज्यांना पूर्वीपासून गौरव दाखवण्यासाठी तयार केले. **त्यांत** आपण सर्व पाचारण झालेले लोक आहोत
२५ मग ते यहूदयांतून असोत की परराष्ट्रीयातून. **जसे** होशेय च्या पुस्तकात लिहिले आहे; जे माझे लोक नव्हते त्यांनी
२६ मी आपले लोक म्हणेन.**असे** होईल की जेथे म्हटले होते की तुम्ही माझे लोक नाही, तेथे त्यांना देवबापाची मुले
२७ म्हटले जाईल. **इस्त्राएलविषयी** यशयाहि पुकारतो की: जरी इस्त्राएलाच्या वंशाची संख्या समुद्राच्या वाळूसारखी
२८ असली तरी मुठभर लोकच वाचविले जातील; **कारण** की परमेश्वर पृथ्वीवर आपले कार्य लवकर समाप्त करतील.
२९ **आणि** एका दुसऱ्या ठिकाणी यशया म्हणतो की जर सेनाधीश प्रभुने आमच्यावर कृपादृष्टि केली नसती तर, सर्व
३० यहूदयांचा नाश झाला असता, अगदी जसे सदोम व गमोरा नावाचे शहरातील लोक नष्ट झाले होते तसे. **तर** मग
काय म्हणावे? असे की परराष्ट्रीय परमेश्वरासमोर निर्दोष ठरवले गेले, कारण तो आशीर्वाद त्यांनी विश्वासाद्वारे
३१ प्राप्त केला होता. **परंतु** इस्त्राएल निर्दोष ठरवले जाण्याच्या आशीर्वादाला आपल्या नियमांच्या पालनाद्वारे प्राप्त करू
३२ इच्छितांनाहि तसे करू शकला नाही, **असे** का ? हे यासाठी की त्यांनी विश्वासाने नव्हे तर नियमाशास्त्राच्या
३३ पालनाद्वारे हा आशीर्वाद प्राप्त करण्याचा प्रयत्न केला. ते ठेच लावणाऱ्या धोंडयामुळे, ठेचाळलेत. **जसे** लिहिले आहे
की, पाहा मी यहूदयांच्या मध्ये सीयोनेतून एक असा धोंडा अर्थात येशू ठेवला आहे, ज्यास ते नाकारतील, परंतु जो
**१०** कोणी त्याजवर विश्वास ठेवील तो लाजिरवाणा होणार नाही. **बंधुनों**-भगिनींनो इस्त्राएलाविषयी माझी मनीषा व
२ प्रार्थना हीच आहे की त्यांचे तारण व्हावे. **मी** त्यांच्याविषयी साक्ष देतो की त्यांना देवबापा विषयी उत्साह आहे परंतु
३,४ ज्ञानानुसार नाही. **कारण** त्यांनी देवपित्याच्या नीतिमत्वाविषयी समर्पण करण्यास नकार दिला. **कारण** जो कोणी

---

९:२२-२४ मानवासोबत कार्य करण्याचा परमेश्वराचा चांगला उद्देश्य आहे. जर लोकांनी जाणले की पापाच्या विरोधात देवबाप क्रोधी आहेत व ते काहीही करू शकतात तर हे संपूर्ण विश्वासाच्या लाभाचे आहे.(वचन १७) आणि हे ऐतिहासिक सत्य आहे. फारो व मिस्त्री लोकांच्या विरोधात (वचन १७) आणि इतिहासात इतर लोकांविरूद्ध कार्य करण्याचा त्यांनी निर्णय घेतला.

येथे पौल दोन प्रकारच्या लोकांतील भिन्नता दर्शवतो. ''श्रापाची भांडी'' जी नष्ट होण्यासाठीच ठेवली आहेत व ''कृपेची भांडी'' जी सन्मानासाठी सुरक्षित ठेवली गेली आहेत. याचा अर्थ विश्वासू ज्यांना तारणासाठी व अविश्वासू ज्यांना सर्वानाशासाठी तयार केले गेले आहे. अविश्वासू संबंधात कोणी त्यांना नाशासाठी तयार केले किंवा त्यांनी स्वत:ला दंडासाठी तयार केले याबाबत पौल सांगत नाही. (तुलना करा ८:१७,१८). १:१८-३२; २:४-११; नीति १:२४-३३; यहे १८:३०-३२; मत्तय २३:३७; १तिमथ्य २:३,४ च्या आधारे म्हणू शकतो की लोकांनी स्वत:च, स्वत:ला नाशासाठी तयार केले आहे; मत्तय १३:३८,३९ पहा. परमेश्वराच्या क्रोधाशी संबंधित १:१८; गणना २५:३; अनुवाद ४:२५; स्तोत्र ९०:७-११ व योहान ३:३६ वरील नोट्स पहा.

९:२४ **''परराष्ट्रीय''** १:५,१६ दर्शविते की हा परमेश्वराचा सार्वभौम अधिकार आहे की त्यांनी इस्त्राएलातून काहींची निवड करावी व परराष्ट्रीयांवर दयाळुपणा दाखववा. वचन २५-२९ यात पौल दाखवतो की हे सर्व वचनावर आाधारित आहे व देवबापाचे वचन कधीही अपयशी होत नाही (वचन ६)

९:२५ होशेय २:२३ **''माझे लोक''** ते जे परमेश्वराचे किंवा इस्त्राएली नव्हते.

९:२६ होशेय १:१०.

९:२७-२८ यश १०:२२,२३.

९:२९ यशा १:९. राष्ट्र भ्रष्ट झाले होते, जर परमेश्वराने त्यातून काहींची निवड केली नसली तर संपूर्ण राष्ट्र नष्ट झाले असते (उत्पत्ति १९:२३-२५).

**''सेनाधीश प्रभु यहोवा''** १ शमु १:३ पहा.

९:३०-३२ यहूदी लोकांजवळ असलेल्या परमेश्वर स्थापित निर्देशाच्या पालनाद्वारे ते देवबापाला प्रसन्न करू पाहता होते परंतु स्वप्रयत्नाने नीतिमान होण्याचा त्यांच्या प्रयत्न व्यर्थ ठरला (३:९,१९,२०)

परराष्ट्रीयांजवळ असे काहीच नव्हते, व त्यांना नीतिमत्वाशी काही देणे-घेणे नव्हते. ख्रिस्ताचा संदेश ऐकून त्यांनी विश्वास ठेवला व नीतिमत्व ''प्राप्त केले.'' असे विश्वासद्वारे घडले. (येशू खडकाला परमेश्वराने यरूशलेमेत ठेवले त्याला यहूदयांनी तुच्छ लेखिले. (योहान १:११) मत्तय २१:४२ प्रेषित ४:११; १ पेत्र २:६-८. लक्ष दयावे पौलानुसार परमेश्वराने यहूदयांना अपयशी केले नव्हते, परंतु स्वत:च्या चुकांमुळे ते तसे झालेत.

९:३३ यशया ८:१४; २८:१६ ''सीयोन'' यरूशलेम आहे.

१०:१ यहूदी नास्तिक किंवा निष्काळजी पापी नव्हते. (२:१७-२०). पौलाने त्यांचा उत्साह पाहिला व त्याला त्यांची कीव आली त्याला स्वत:च्या नैतिक उत्साहाची जाणीव होती ती त्याच्या आत्मिक जाणीवेवर किंवा ज्ञानावर आधारित नव्हती. या उत्साहामुळेच तो एकदा मार्ग चुकला होता. (प्रेषित ८:१-३; ९:१,२; २२:३,४. २६:९-११. फिलि ३:६). ते नीतिमत्वाच्या उत्साहाने भरलेले होते परंतु त्यांना क्षमा प्राप्त झाली नव्हती. परमेश्वराला ओळखणे किंवा त्यांना प्रसन्न करणे यागोष्टी कडे ''उत्साह'' दुर्लक्ष

५ विश्वास करतो, त्याच्यासाठी ख्रिस्त येशू नियमशास्त्राची समाप्ति असा आहे. **नियमशास्त्रानुसार** जी नीतिमत्ता
आहे, त्याचे वर्णन मोशे अशाप्रकारे करतो; ''जो मनुष्य नियमशास्त्राच्या नीतिमत्वाचे आचरण करतो तो त्यांच्याद्वारे
६ जिवंत राहील. **जी** नीतिमत्ता विश्वासावर आधारित आहे ती या प्रमाणे बोलते : ''तुम्ही आपल्या मनात म्हणू नका
७ की स्वार्गत कोण चढले? (अर्थात ख्रिस्ताला खाली आणावयास)'' किंवा **अधोलोकी** कोण उतरेल? (अर्थात ख्रिस्ताला
८,९ मेलेल्यातून वर आणावयास)'' **तर** ते काय म्हणते ? ''**वचन** तुमच्या जवळ आहे, तुमच्या मुखात व हृदयात आहे;
तेच वचन जे आम्ही गाजवितो ते हे आहे की तुम्ही येशू प्रभु आहे असे मुखाने म्हणाल व हृदयाने विश्वास कराल
१० की देवबापाने येशूला मेलेल्यांतून उठविले तर तारण प्राप्त कराल.**कारण** निर्दोष ठरण्याकरता आत्म्याने विश्वास
११ केला जातो व तारण प्राप्तीसाठी मुखाने कबूल केले जाते.**जेसे** परमेश्वराच्या वचनात लिहिले आहे की: ''जो कोणी
त्यांच्यावर विश्वास ठेवील तो कधीही फजित होणर नाही'' यासाठी की यहूदी व परराष्ट्रीय यांत कोणताच भेद
१२ नाही, कारण सर्वांचा प्रभु तोच व जे त्यांचा धावा करतात, **आणि** जो कोणी येशूचे नांव घेईल त्याचे तारण होईल.

---

करतो. इतर लोकांप्रमाणे यहूदयांना माहित नव्हते की जे देवबापावर विश्वास ठेवतात त्यांना परमेश्वर बक्षिसाच्या रूपात नीतिमत्व देतात(३:२४; ४:४,५,१३). नीतिमत्ता कमविली जाते असा त्यांचा विचार होता म्हणून ख्रिस्ताद्वारे प्राप्त होणाऱ्या नीतिमत्तेप्रति त्यांचे समर्पण नव्हते. इतरांसारखे कार्य करून, त्या द्वारे तारण प्राप्त करण्याचा प्रयत्न करत होते.

१०:४ **''नियमशास्त्र''** - ३:२०; ३१; ४:१५; ५:२०; ६:१४; ७:४,७,१२; १४; ८:३,४; गल ३:१९; २३-२५. ख्रिस्त येशूने विधि किंवा नियमशास्त्र यापासून विश्वासूचे नाते तोडले आहे.

१०:५ लेवीय १८:५.

१०:६-८ अनु ३०:१२-१४ मोशेचे शब्द ख्रिस्तांच्या संदेशासोबत लागू करणे, पौलासाठी न्यायोचित होते का? परमेश्वराच्या आत्म्याद्वारे पौल मोशेच्या शब्दांचा आत्मिक अर्थ समजू शकला.

१०:७ **''अधोलोक''** -प्रकटी ९:१; २:११; ११:८; २०:१,३ येथे खाली म्हणने मृतक आत्म्यांचे स्थान.

१०:९-१० **''वचन''** जे पौलाने लोकांना दिले (वचन८) परमेश्वराने येशूला मृतकांतून उठवल्यामुळे ते स्वर्गात आहेत. (१:३,४;४:२४,२५; ८:३२,३४). नीतिमत्वाचे बक्षिस घेण्यासाठी लोकांनी पाप व स्वत:चे प्रयत्न सोडून देवबापावर विश्वास करावा. तारण प्राप्ती साठी येशूच्या शारीरिक उठण्यावर भरंवसा ठेवणे आवश्यक आहे. पहा ४:२४,२५; १ करिंथ १५:१-८ हे शुभवर्तमानाचा मुख्य पैलु होय. प्रेषितांची कृत्ये येशूच्या जिवंत होण्यावर जास्त भर देते. १:३; २:२४ इत्या. जर आपला यावर भरंवसा नाही तर देवबापाने पुत्रासंबंधी जे काही लिहिले, त्यावर देखील आमच्या विश्वास नाही, येशूवर विश्वास ठेवण्याचा खरा अर्थ म्हणजे त्यांच्या जिवंत होण्यावर विश्वास ठेवणे.

येशू सर्वोच्च आहेत, असा विश्वास बाळगावा. योहान ८:२४; प्रेषित २:३६; १ करिंथ ८:६; १२:३; इफि ४:५. येशू सर्व ईश्वरांपैकी एक नाहीत परंतु तेच केवळ प्रभु आहेत; म्हणजेच पौलाच्या मते. येशूच संपूर्ण अधिकार ठेवतात; तसेच सर्व गोष्टींचे अधिकारी व शरीरात परमेश्वर आहेत. वचन १३; लूक २:११; ८:२४; व निर्ग ३:१४; १५ चे नोट्स). येशूवर विश्वास ठेवल्याने परमेश्वर कृपा करतात व तारण देतात. हृदयाचा विश्वास मुखाद्वारे बोलून अंगिकार करण्यास भाग पाडतो मत्तय १०:३२,३३ पहा. जे अंगिकारास घाबरतात त्यांचा विश्वास संदेह निर्माण करतो; कारण अंगीकार केल्याशिवाय विश्वास असूच शकत नाही.

येशूच प्रभु आहे म्हणणारा विश्वास सिद्ध करतो की व्यक्ति येशूला स्वत:चा स्वामी/प्रभु म्हणून ग्रहण करत आहे. (१४:९;मत्तय ७:२१; योहान ३:२६; प्रेषित ५:३२; इब्री ५:९; १ योहान २:३,४). प्रेषित २२:१० चे नोट्स पहा. येशूला सर्वांचा स्वामी मानून स्वत: मात्र येशूला प्रभु मानित नाही, अशी हिंमत करणारा विश्वासू नसणार; इतरांना सांगतो पण स्वत: तसे करत नाही. लोकांनी ख्रिस्ताजवळ आल्यानंतर येशूचे स्वामित्व नाकारण्यासारखा अपराध करू नये.

रोमकरांस यास नीतिमत्वाच्या शिक्षणचा अंत १० व्या वचनात होतो. परमेश्वराच्या आत्म्याच्या प्रेरणेने पौलाने खालील बाबी सांगितल्या:

परमेश्वर पूर्ण :सत्य आहेत, लोकांजवळ स्वत:ची नीतिमत्ता नाही. (१:१८,३:१९) ते परमेश्वराच्या नीतिमत्ते विषयी (वचन २) अज्ञानी/अजाण आहेत; ते स्वत:ची नीतिमत्ता स्थापित करण्याचा प्रयत्न करतात (वचन ३) हे कदापि होऊ शकत नाही. (३:२०; २८; ८:३).

परमेश्वरा समक्ष नीतिमान ठरणे म्हणजे ख्रिस्ताचे नीतिमत्व प्राप्त करणे (३:२२-३६); ते विश्वासाने प्रकट होते (१:१६,१७; ४:५; ५:१).

परमेश्वर ज्यांना नीतिमान ठरवतात तेच खरे जीवन जगतात (६:१६,१७; ८:४,१३,१४).

१०:११ यश २८:१६; रोम १:१६; ५:५ शी तुलना करा.

१०:१२ ''अंतर नाही'' ३:२२,२३,२९,३०. केवळ एकच स्वामी (प्रभु/मालक) आहे, व ते येशू आहेत. पहा, त्यांचे चरित्र कसे आहे. येशू त्यांच्या कडे येणाऱ्यांचे कल्याण करतात व अशी मनीषा करतात. की त्यांनी सर्व बाबतीत विशेषकरून आत्मिक बाबीत श्रीमंत असावे. तुलना करा ५:२१; २करिंथ ८:९; १तीमथ्य १:१३,१४.

१३,१४ **ज्यांवर** त्या लोकांनी विश्वास ठेवला नाही, त्याचा धावा ते कसा करतील? **ज्यंनी** त्यांच्याविषयी ऐकले नाही
त्यांच्यावर ते कसा विश्वास ठेवतील? आणि घोषणा करणाऱ्यांशिवाय ते कसे ऐकतील? संदेश देणारा व्यक्ति
१५ नसल्यास ते कसे ऐकतील? **आणि** जर संदेश देणारे पाठवले नाहीत तर ते घोषणा तरी कशी करतील? जसे
१६ की लिहिले आहे की, "शांतिच्या गोष्टींची, सुवार्ता सांगणाऱ्याचे चरण किती मनोरम आहेत.''**तथापि** सर्वांनी
१७ ही सुवार्ता स्वीकार केली नाही. यशया म्हणतो, 'हे प्रभू आमच्या सुवार्तेवर कोणी विश्वास ठेवला आहे? **याप्रमाणे**
१८ विश्वास सुवार्तेने व सुवार्ता ख्रिस्ताच्या वचनांद्वारे होते. **पण** मी विचारतो, त्यांनी ऐकले नव्हते काय ? हो, खरोखर
१९ ऐकले होते. त्यांची वाणी पूर्ण पृथ्वीवर व त्यांचे शब्द जगाच्या अंतापर्यंत पोहांचले आहेत. **परंतु** मी म्हणतो की
इस्त्राएलाला हे कळले नव्हते काय ? प्रथम मोशे म्हणतो, जे लोक एक राष्ट्र नाहीत त्यांच्याद्वारे मी तुम्हाला ईर्ष्येस
२० पेटवीन, एका मूर्ख राष्ट्राद्वारे मी तुम्हाला क्रोधित करीन. **पण** यशया फार धीट होऊन म्हणतो, जे माझा शोध करत
नव्हते त्यांनी मला प्राप्त केले; ज्यांनी माझ्या विषयी विचारले नव्हते, त्यांच्या वर मी प्रकट झालो, परंतु इस्त्राएलला
**११** तो म्हणतो, माझी आज्ञा मोडणाऱ्याव बंडखोर लोकांकडे मी आपले हात पसरले आहेत.**म्हणून** मी म्हणतो की देवाने
आपल्या लोकांचा त्याग केला काय? मुळीच नाही. मी पण इस्त्राएली, अब्राहामाच्या वंशाचा व बन्यामिनाच्या
२ गोत्रातला आहे. **ज्या** लोकांना स्वर्गिय बाप जाणत होते, त्यांना त्यांनी टाकून दिलेले नाही. एलीयाच्या बाबतीत
वचन काय म्हणते, तुम्हाला माहित आहे काय? इस्त्राएला विरूद्ध त्याने देवाजवळ अशी विनंती केली, व म्हणाला,
३ **'हे स्वामी**, त्यांनी तुमच्या संदेष्टयांना जिवे मारले; आणि तुमच्या वेदया तोडून टाकल्या. केवळ मी एकटाच
४ राहिलो आहे, व ते माझा प्राण घेऊ पहातात. **परमेश्वराचे** उत्तर काय होते? मी स्वत:साठी सात हजार माणसे राखून

---

१०:१३ पौल योएल २:३२ कडे संकेत करते जेथे इब्री भाषेत प्रभु हा शब्द "यहोवा'' आहे. येथे पौल येशू ख्रिस्ताविषयी सांगत आहे. (वचन ९) प्रभु हाक देणे, म्हणजे परमेश्वरास बोलावणे. येथे संकेत हा आहे की येशू शरीरात वास्तविक देवबाप आहेत.(वचन ९) लूक २:११ यातील इतर वचने पहा. येथे त्यांना हाक मारण्याचा अर्थ आहे त्यांना च्यावर विश्वास करणे (वचन१४) या वचनात कृपा व तारण यांचे निमंत्रण सर्वांसाठीच आहे. १:१६ वरील तारणचे नोट्स पहा.

१०:१४ पौल आपल्या संदेशाच्या समाप्तीत लोकांना तारण देऊन नीतिमान होण्याकडे घेऊन जातो. पण जर हे याला ऐकत नाहीत, विश्वास ठेवत नाहीत तर हा कसला शुभसंदेश ? म्हणूनच तो सुवार्तिकांना पाठवण्याच्या पक्षात आहे. प्रेषित १:८; योहान २०:२१; लूक २४:४६,४७; मार्क १६:१५; मत्तय २८:१८-२० पहा.

१०:१५ यश ५२:७ शुभवर्तमान दूर-दूर नेल्यामुळे पाय घायाळ व घाणेरडे होऊ शकतात; परंतु परमेश्वराच्या दृष्टित असे पाय, पृथ्वीवर सर्वांत सुंदर आहेत.

१०:१६-२१ इस्त्राएलाने ख्रिस्ताचा स्वीकार केला नाही व हा परमेश्वराच्या दृष्टित एक अपराध होता.

१०:१६ हे त्यांचे मोठे पाप होते; ज्यामुळे त्यांचा स्वीकार केला गेला नाही. जेव्हा येशू आले तेव्हा लोकांनी त्यांना ग्रहण केले नाही (योहान १:११)

१०:१७ वचन १४ विश्वास -वचनामुळे होतो.

१०:१८ यहूदयांनी शुभसंदेश ऐकला होता. स्तोत्र १९:४ यात निसर्गाची साक्ष आहे; त्यांना ख्रिस्ताची मृत्यु, पुनरूत्थान व या पत्राच्या लिहिल्या जाण्या पर्यंत हा संदेश त्यांना प्राप्त होत राहिला. प्रेषित १:८; २:३६; १३:१४-१६; १७:१,२,१०; १८:५; १९:८ पहा.

१०:१९-२१ यहूदयांना असे वाटले का, की परमेश्वर त्यांचे पाप लहान समजतील? मुळीच नाही. त्यांचे समर्पण नव्हते. इतरांसारखे कार्य करून, त्या द्वारे तारण प्राप्त करण्याचा प्रयत्न करत होते. पौल पवित्रशास्त्रातून तीन वचन दाखवतो की त्यांनी परराष्ट्रीयांपेक्षा (ज्यांनी विश्वास केला होता) अधिक माहिती होती.

१०:१९ अनु ३२:२१ येथे 'मूर्ख' राष्ट्र (परराष्ट्रीय) याची तुलना यहूदयांशी केली गेली आहे ज्यांना थोडे फार समजत होते.

१०:२०,२१ यश ६५:१, २ सत्य/जिवंत परमेश्वरसाठी परराष्ट्रीय भुकेले नव्हते. यहूदी होते, तरी त्यांनी प्राप्त केले नाही. याचे कारण होते त्यांचा आज्ञा भंग करण्याचा धीटपण. परमेश्वर हात पसरून, धीराने व कृपेने त्यांची वाट बघत उभे आहेत असे चित्र येथे दिसत; त्यांच्या करता मोठी कामे करण्यासाठी मत्तय २३:३७; यहूदा २:१०-१९ होशेय ११:८. यावरून आपण असा विश्वास कसा करावा की, असे परमेश्वर त्यांच्या जन्माच्या आधीच त्यांना नरकात घालण्याचा निश्चय करू शकतात? यासाठी की ते सर्वकाही करू शकतात?

११:१-१० ९,१० व ११ अध्याय एक घटक बनवितात येथे विषय आहे एका राष्ट्राच्या पतनाचा. अध्याय १० मध्ये पौल दाखवतो की परमेश्वराच्या नव्हे तर त्यांच्या स्वत:च्या चुकांमुळे त्यांचे पतन झाले होते. अध्याय ११ ते त्यांनी मन कठोर केले तरी, अविश्वास केला तरी सुद्धा त्यांच्यासाठी परमेश्वराजवळ एक योजना आहे, त्यानुसार परमेश्वर या राष्ट्राला जवळ करतीलच.

१ ल्या वचनात विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर या अध्यायात आहे. पौल म्हणतो "नाही'', तो यहूदी असल्यावर देखील परमेश्वराने त्याला त्यागिले नाही हे प्रमाण सिद्ध करते की देवबाप त्यांनाहि टाकणार नाहीत. तो पुढे म्हणतो की प्रथम प्रेषित व यरूशलेमेची मंडळी यहूदयांतूनच होती.

रोमन साम्राज्यात अनेक मंडळयात यहूदी विश्वासू होते; पूर्ण राष्ट्र बंडखोर होते तरी. त्यापैकी काहींनीच विश्वास केला व आज्ञा पाळली. ही स्थिति एलीच्या काळा प्रमाणे होती (ख्रिस्ताच्या ८५० वर्ष पूर्वी) १ राजे १९:१४-१८ पहा.

५ ठेवली आहेत ज्यांनी बआल देवतापूढे गुडघे टेकले नाहीत. **तसेच** सध्याच्या काळी देखील कृपेच्या आधारे काही लोक
वाचलेले आहेत. जर हे कृपेने राहिले असेल तर कर्मांना स्थानच नाही, नाहीतर दया, दया होणार नाही; परंतु जर
७ कर्मांनुसार आहे तर मग ही असिमित दयेमुळे नाही. नाहीतर कर्म कधी कर्मच राहिले नसते. **तर** मग काय?
८ इस्त्राएलाला जे हवे ते मिळाले नाही, परंतु निवडलेल्या लोकांना ते प्राप्त झाले. दुसरे सर्व आंधळे केले गेले. **जसे**
लिहिले आहे; स्वर्गीय पित्याने त्यांना मंद आत्मा दिला आहे. असे डोळे दिले ज्यांना पाहता येत नाही; असे कान दिले
९ जे आतापर्यंत ऐकू शकत नाही. **दावीदहि** म्हणतो, त्यांचे मन त्यांना फांस व सापळा आणि ठेच लावणारा दगड व
१० प्रतिफळ असे होवो; **त्यांचे** डोळे अंधकारमय होवोत इतके की त्यांना दिसू नये. त्यांची पाठ नेहमीसाठी वाकावी.
११ **म्हणून** मी म्हणतो की त्यांचे पतन व्हावे. म्हणून ते अडखळले काय? अजिबात नाही, परंतु, त्यांच्यात ईर्ष्या निर्माण
१२ होण्यांसाठी त्यांच्या अपराधाने परराष्ट्रीयांचे तारण झाले आहे. **आता** जर त्यांच्या अपयशाचा अर्थ जगाची संपत्ति
आणि त्याचा नाश हे जर परराष्ट्रीयांचे धन आहे तर त्यांची भरती आणखी किती चांगुलपणा उत्पन्न करेल. मी
१३ परराष्ट्रीयांना उद्देशून बोलत आहे. **कारण** मी परराष्ट्रीयांना वचन देण्यासाठी प्रेषित झालो आहे. मी आपल्या
१४ सेवेचा आदर करतो. **जर** माझ्या हाडामांसाच्या लोकांमध्ये मी कसेहिकरून ईर्ष्या निर्माण केली यासाठी की, त्याद्वारे
१५ काहींना तारावे. **जर** त्यांचा नकार म्हणजे जगाचा समेट ठरतो तर त्यांचा स्वीकार हा त्यांचे मेलेल्यातून जिवंत
१६ होणे नसणार. तर मग काय असेल? **प्रथम** फळाच्या रूपात जे दिले जाते, जर ते पवित्र आहे तर उरलेले देखील

---

११:५ परमेश्वराने कृपेच्या आधारेच त्यांची निवड केली. ही निवड त्यांची झाली ज्यांनी येशूवर विश्वास ठेवला, यामध्ये त्यांच्या योग्यतेचे काहीही देणे घेणे नव्हते ३:२४.

११:७ ९:३०-३० पहा. इस्त्राएलात अनेकांना ''आंधळे'' करण्यात आले होते. प्रथम त्यांनी दैविय ज्ञान तुच्छ लेखिले म्हणून देवबापाने त्यांना शासन केल्यामुळे ते प्रकाश प्राप्त करू शकलेच नाही. यश ६:९,१०.

११:८ २९:४; यश २९:१० तुलना करा. यश ६:९,१० व मत्तय १३:१३-१५.

११:९ स्तोत्र ६९:२२,२३.

११:११ वचन ३२ यात पौल कठोर झालेल्या, ठेच लागलेल्या व पतन होणाऱ्या इसत्राएलाच्या मोठया भागाचा उल्लेख करतो. ९:३२,३३. या देशाच्या पतनाचा हा अर्थ आहे का, की त्याला पुन्हा उभे होता येणार नाही? किंवा त्याची पुर्नरचना होणार नाही? इस्त्राएलावंर कोपल्यामुळे देवबाप फक्त मंडळीतच कार्यशील आहेत काय ? पौलाचे उत्तर स्पष्ट आहे; देवबापाने आताहि इस्त्राएलाचा त्याग केला नसून आजदेखील त्यांच्या जवळ त्यांच्यासाठी योजना आहे. (प्रेषित १:६,७ शी तुलना करा) तो म्हणतो की त्यांच्य पतनातहि देवबापाची योजना कायम राहिली. ते कठोर होते; देवबापाच्या पुत्रास त्यांनी नकार दिला; हे संसाराच्या लाभासाठीच झाले. (प्रेषित २:२२-२४).

त्यांच्या वाईट कृत्यांच्या परिणामी शुभवर्तमान सर्वांना उपलब्ध झाले. त्यांनी शुभवर्तमानाचा तिरस्कार केला परिणामी देवपिता दुसऱ्या राष्ट्रांकडे वळले. (तुलना करा १:१६; प्रेषित १३:४६; मत्तय २१:४२,४३).

११:१२ पौलाचा तर्क बरोबर होता. इस्त्राएलाच्या पापांमुळे शुभवर्तमानाचे धन सर्व विश्वाला प्राप्त झाले म्हणून त्याची भरपूरी बहुमूल्य ठरेल.

**''जर''** ते भरपूरी प्राप्त करतील तर त्याचा अर्थ अधिक धन होईल असे पौल म्हणत नाही तो केवळ त्यांच्या भविष्यातील विपुलतेचे सत्य सांगतो. ते एका राष्ट्राच्या स्वरूपात देवबापाकडे वळतील व देवबाप त्यांच्यासाठीच्या सर्व प्रतिज्ञा पूर्ण करतील. (यश २:१-५; ११:१-९; यिर्म २३:५-८; यहेज ३७:२१-२८; जखऱ्या १४:९,१६,२१).

**''धन''** या विषयी २:४; १०:१२; २ करिंथ ८:९; इफि १:७,१८; २:७; ३:८,१६; फिली ४:१९;कलस्सै १:२७.

११:१३ गल २:७.

११:१४ वचन ११; १०:१,१९ ''लोक'' -''शरीर'' जसे आपण मांस व रक्त म्हणतो.

११:१५ वचन १२ यात त्या वेळेचा उल्लेख करतो जेव्हा देवबाप पूर्ण राष्ट्राचा स्वीकार करतील, म्हणजेच ''मृत्यु पासून जीवन'' असे होईल. काही लोकांच्या मते हे ''मेलेल्यातून उठणे'' होय (योहान ५:२८,२९) इतरजण समजतात की इस्त्राएलाच्या परिवर्तनामुळे हे अद्‌भुत आत्मिक जीवन व आशीर्वाद समस्त विश्वासाठी आहे. पहा ८:२०:२३; प्रेषित ३:२१; मत्तय १९:२८). कदाचित याचा अर्थ दोन्ही गोष्टी असू शकेल.

११:१६ **''प्रथम फळ''** गणना १५:१७-२१. येथे प्रथम फळ म्हणजे यहूदयांतील काही निवडलेले लोक ज्यांनी ख्रिस्ताचा स्वीकार केला (वचन ५) या देशाचे पहिले लोक- अब्राहम, इसकाक व याकोब होते. अविश्वासाच्या स्थितित असलेले हे राष्ट्र आताहि पवित्र आहे असे पौल म्हणतो. लेवीय २०:७,८ चे नोट्स ''मूळ'' म्हणजे अब्राहाम, इसहाक व याकोब किंवा केवळ अब्राहाम होऊ शकतो (४:१). त्यांच्यातून निघालेले राष्ट्र देवपित्यासाठी विशेष पवित्र राष्ट्र होते. (अनु ७:६; १४:२); ही स्थिति आज देखील आहे. (वचन २९).

१७ पवित्र ठरणार जर मूळ पवित्र आहे तर फांदयाहि पवित्र ठरतील. जर काही फांदया तोडल्यात आणि तुम्ही जे रानटी जैतून
१८ असतां त्यांच्या जागी कलमरूपाने लावला गेलात व जैतूनाच्या पौष्टिक मुळाचे भागीदार झालात तर **फांदयांच्या**
विरोधात गर्व करू नका. जर बढाई मारली तर, तर हे लक्षात असू दया की तुम्ही फांदयामुळाला आधार देत नाहीत
१९ परंतु मूळ फांदयांना संभाळते. **म्हणून** माझे कलम व्हावे म्हणून फांदया तोडून टाकण्यात आल्या असे तुम्ही
२० म्हणाल. तुमचे म्हणणे बरोबर आहे, पण ते अविश्वासामुळे वेगळे केले गेले पण तुम्ही विश्वासामुळे स्थिर आहात.
२१ अभिमान करू नका, परंतु भीति बाळगा. **यासाठी** की देवबापाने मुळाच्या फांदया राखल्या नाहीत तर तुम्हालाहि
२२ सोडणार नाहीत. **कारण** देवपित्याची ममता व कडकपणा पाहा; जे लोक अपयशी झालेत. त्यांच्या सोबत कडकपणा
२३ केला परंतु तुम्हांशी ममता; जर तुम्ही त्यांच्या करूणेत कायम स्थिर राहिलात तर **आणि** जे जर अविश्वासात राहिले
२४ नाहीत तर कलम लावण्यास देव समर्थ आहे. **कारण** जर तुम्ही रानटी जैतून वृक्षातून कापले गेले होतात ज्यांचा
स्वभाव रानटी होता व आपल्या स्वभावा विपरीत एका चांगल्या जैतूनाच्या वृक्षात कलम केले गेलात, तर या
२५ मूळच्याच फांदया त्यांचे कलम आपल्या जैतूनात किती विशेषकरून सोप्या रीतिने लावण्यात येईल. **हे** भाऊ-बहिणींनो
तुम्ही या रहस्यापासूनअजाण राहावे अशी माझी इच्छा नाही, या साठी की तुम्ही आपल्या दृष्टित स्वत:ला शहाणे
२६ समजू नये: तोपर्यंत हा इस्त्राएलाचा अंशत: आंधळेपणा आहे. **हया** रीतिने इस्त्राएलाचे तारण होईल. शास्त्रात
२७,२८ लिहिल्या प्रमाणे, मुक्त करणारे येशू सीयोनातून येतील. **ते** याकोबापासून अभक्ति दूर करतील. **शुभवर्तमानाच्या**
२९ दृष्टिकोनातून तुमच्या मुळे ते शत्रु आहेत. परंतु निवडीच्या दृष्टिने पूर्वजांमुळे देवाने त्यांच्यावर प्रीति केली. **देवाचे**
३० कृपादान पाचारण काढून घेतले जात नाही. **ज्याप्रमाणे** पूर्वी तुम्ही देवाची आज्ञा भंग करत होता, परंतु आता
३१ तुम्हाला त्याच्या आज्ञाभंगाने दया प्राप्त झाली आहे; **त्याप्रमाणे** तुम्हांवरील ममतेने त्यांनाहि आता कृपा झाली व्हावी
३२ म्हणून त्यांनी आता आज्ञाभंग केला आहे. **म्हणून** देवाने त्या सर्वांना आज्ञा भंगाच्या कोंडवाडयात डांबून ठेवले आहे,

---

११:१७-२४ **''जैतूनाचे वृक्ष''** म्हणजेच पूर्वीचे इस्त्राएल राष्ट्र ज्याने ख्रिस्ताला नाकारले. अविश्वासामुळे राष्ट्राच्या काही शाखा- फांदया तोडण्यात आल्या (१७,२०). त्यांच्या ऐवजी इतर यहूदी ख्रिस्ती लोकांना जीवे मारले गेले होते. (वचन १७,१९; मत्तय २१:४३) परराष्ट्रीय जंगली वृक्षा सारखे होते. (वचन २४) त्यांचा जैतून वृक्षाशी काही संबंध नव्हता. परंतु आता ख्रिस्ताद्वारे ते एका नात्यात जुळले आहेत. वचन २४ पौल परराष्ट्रीयांना सावध करतो, त्यांनी चुकणाऱ्या इस्त्राएलामुळे गर्व करू नये (वचन १८) नम्र बनावे (वचन २०) कारण देव परराष्ट्रीयांच्या फांदया तोडून इस्त्राएलाशी सुद्धा जोडू शकतो.

याचा अर्थ असा आहे का की तारण प्राप्त लोक देखील नरकात जाऊ शकतात ? पौलाचा हा विषय नाही. जैतूनाचे वृक्ष ख्रिस्तांचे आत्मिक देह नाही. येशूच्या दिवसात बायबल मध्ये इस्त्राएलाचे विश्वासू व अविश्वासू हे जैतूनाचे वृक्ष होते. केवळ अविश्वासू तोडले गेले होते. राष्ट्राचा अधिकांश भाग आज ही त्याच स्थितित आहे. या युगासाठी परमेश्वराने त्यांना वेगळे केले आहे व उद्देश प्राप्तीसाठी परराष्ट्रीयांना आपल्या वृक्षाशी जोडले आहे. इस्त्राएलाप्रमाणे परराष्ट्रीय देखील अविश्वासात व धीटाई करण्यात फसू शकतात. पौल ठामपणे सांगतो की त्यांनी तसे केल्यास देवबाप त्यांना शासन करतील (वचन २१,२२) विश्वासाद्वारे इस्त्राएल पुन्हा एकदा वृक्षाशी जोडला जाईल. (वचन २४) प्रेषित १:६ चे नोट्स पहा.

११:२५ परराष्ट्रीयांनी अजाण राहून धोका पत्करावा अशी पौलाची इच्छा नव्हती. जर त्यांनी समजून घेतले की देवाचे इस्त्राएलाशी काही देणे घेणे नसून आता सर्व प्रतिज्ञा मंडळीसाठी आहेत, तर त्यांची वाढ होईल. पौल इस्त्राएलाविषयी स्पष्ट सांगून या गोष्टींची पूर्ति करतो. या शिक्षणाला तो ''रहस्य'' संबोधतो. (परमेश्वराच्या प्रकटीकरणाशिवाय मनुष्य हे समजू शकत नाही) परराष्ट्रीयांची पूर्ण संख्या जो पर्यंत आत येत नाही तो पर्यंत इस्त्राएललाला आंधळे केले गेले आहे; म्हणजेच पौलाच्या मते त्यावेळी हृदय व अंत:करणाचे आंधळेपण दूर केले जाईल.

११:२६,२७ **''इस्त्राएल''** म्हणजे पौलाच्या मते पूर्ण इस्त्राएल होय; जो पर्यंत परराष्ट्रीयांची पूर्ण संख्या प्रवेश करत नाही.
पुष्टीसाठी पौल यश ५९:२०,२१; २७:९ ''सीयोन'' यरूशलेमकडे संकेत करतो. ''सीयोनेचा अर्थ आहे यरूशलेम. ''याकोबाचा'' अर्थ म्हणजे इस्त्राएलाचे लोक. कराराचा अर्थ आहे. ती सहमति (अतूट संबंध) ज्याद्वारे देवबाप इस्त्राएलाशी बांधले जातील यिर्म ३१:३१-३४.

११:२८ **''शत्रु''** शुभवर्तमानाच्य विरोधात आणि परराष्ट्रींयांना ख्रिस्ताकडे येऊ देण्यात ज्याकाही बाधा-अडचणी इस्त्राएल आणु शकत होता व त्यांनी जे केले त्याविषयी.(१थेस्स २:१४-१६).
**''आवडते''** इस्त्राएलाच्या अविश्वासूपणात व वाईट व्यवहारातहि देवबापाचे त्यांच्यावर प्रेम आहे. हे केवळ अब्राहम इसहाक व याकोबामुळे आहे.)

११:२९ मलाखी ३:६ देवाने इस्त्राएलाला या युगात वेगळे केले असले तरी त्यांच्याविषयी त्यांनी आपले मन बदललेले नाही. आज ही त्यांना ते आपले राष्ट्र मानतात. त्यांचे काही वरदान ९:४,५ यात दिसतात.

११:३०,३१ ज्याप्रकारे एकेकाळी परराष्ट्रीय अविश्वासात तारणशिवाय होते तसेच आजदेखील अविश्वासू यहूदी आहेत; परंतु परराष्ट्रीयांप्रमाणेच देव यहूदयांवरही आपली दया प्रकट करतील.

११:३२ गल ३:२३,२४ शी तुलना करा. परराष्ट्रीयांना त्यांच्या दुष्ट हृदयावर सोडले गेले आहे( १:२४-३२). यहूदयांना कठोर बनवून देवाने त्यांना दंड दिला आहे. आज्ञा भंगाच्या क्रियेद्वारे त्यांना देवाच्या मुलाला क्रुसावर चढवले (११:७,८). सर्वच पापाच्या,

३३ यासाठी की सर्वांवर कृपा करता यावी. **अहाहा** देवाची बुद्धी व ज्ञानाची खोली त्यांचे निर्णय किती गहन व मार्ग किती
३४,३५ अगम्य आहेत. **देवबापाचे** विचार काय आहेत हे कोणी जाणले; कोण त्यांचा सल्लागार होऊ शकेल ? **किंवा** कोणी
३६ त्यांना प्रथम दिले की त्याची. फेड करील? **कारण** सर्व काही त्यांच्यापासून, त्यांच्याच द्वारे व त्यांच्याच साठी आहे.
१२ देवबापाची प्रशंसा/गौरव युगानुयुग होवो. असेच होवो. **म्हणून** बंधुजनहो, मी तुम्हांला देवाच्या करूणेमुळे विनंती
करतो की तुम्ही आपले शरीर, एक जिवंत पवित्र व देवाला ग्रहणयोग्य बलिदान म्हणून समर्पण करा, जी तुमची
२ आत्मिक सेवा आहे. **या** जगा सारखे होऊ नका. परंतु तुमच्या मनाच्या नवीनिकरणाने स्वत:बदलत जा; यासाठी

---

आज्ञाभंगाच्या बंधनात होते. ही दया यहूदी व परराष्ट्रीयांच्या साठीहि होती. या वचनात देवाचा एकच उद्देश्य होता. नीति, प्रेम, दया, कृपा सर्वांवर प्रकट करणे. मनुष्याला कठोर करून दंड देण्यात रूचि घेणारे ते देवपिता नाहीत, उलट दया करण्यात त्यांना आनंद वाटतो (मिखा ७:१८,१९; विलाप ३:३१-३३ इ)

या वचनाचा नीट व सरळ अर्थ लावावयास हवा. बायबलच्या मते येशूचा नकार करणारे, क्षमा प्राप्त न करता मरणारे, नेहमीसाठी नष्ट होतात. २:५,६; ६:२३; योहान ३:३६; प्रकटी २१:८).

**"सर्वांवर कृपा"** म्हणजे यहूदी व परराष्ट्रीयांवरहि दया दाखवण्याच्या बाबतीत देव पक्षपात करत नाही. यहूदी व परराष्ट्रीय यांचे तारण देवाच्या योजनेशी परस्पर जुळलेले आहे.

११:३३-३६ येथे पौल शुभवर्तमानाचा अर्थ व यहूदी आणि परराष्ट्रीय यांच्या प्रति व्यवहार सांगून शेवट करतो. त्याला ठाऊक आहे की सर्वकाहींचे वर्णन त्याने केलेले नाही. त्याच्या ज्ञानापलीकडे काही रहस्य आहेत. देवाच्या बुद्धीची खोली कोणताहि मनुष्य समजू शकत नाही; यामुळेच देवाच्या महानतेचा स्वीकार करून तो त्यांची महिमा करतो.

११:३३ देवाच्या वचनाचे जितके अध्ययन केले तितकेच कमी करण त्यानंतरच हे निदर्शनास येते की देव असीमित रूपाने आमच्या वर सार्वोच्च आहे. देवाच्या व्यवहारा ऐवजी जो ते आपल्याशी किंवा दुसऱ्याशी करतात, आपण आपला लहान मेंदू देवबापाच्या असीमित बुद्धीच्या प्रति समर्पित करून स्तुति करणे शिकावे.

११:३४ यश ४०:१३ याचा संदर्भ पहा (यश ४०:१२-२६). येथे देवाच्या महानतेचे चित्र रेखाटले आहे. निसर्ग आणि जग याच्या संचालनात परमेश्वराला कोणत्या हि मनुष्याच्या गरज पडत नाही.

११:३५ ईयाब ४१:११ देवबाप मनुष्याचे कर्जदार नाहीत, तारण असो की वेगळी बाब. त्यांचा लोकांशी व्यवहार, दया व करूणेवर आधारित असतो. पण जे सगळे त्यांचे ऐकत नाहीत, त्यांच्या गरजा न भागवता, देवबाप त्यांना नरकात पाठवू शकतात.

११:३६ **"त्यांच्यासाठी"** - देवपिता सृष्टीकर्ता आहेत.

**"त्यांच्या शक्तिद्वारे"** - देव जगाला कायम ठेवून शासन करतात.

**"त्यांच्यासाठी"** - या जगातील सर्व वस्तु त्यांच्याच साठी आहेत. त्यांचा सन्मान करणे आपण पौलाद्वारे शिकावे कारण तेच योग्य आहेत.

१२:१ या पत्राचा सैद्धांतिक भाग पौल संपवतो. त्यांने निदर्शनास आणले की सर्वच दोषी असून दंडास पात्र आहेत. देवबापाची दया व महानता त्याने दाखवली. येथून शेवटपर्यंत तो प्रतिदिनाच्या व्यवहारिक गोष्टींना स्पष्ट करतो. जी त्यांनी यासाठी करावी, कारण देव दयाळू आहेत. १-११ यात जे काही लिहिले आहे, त्यानुसार जीवन बदलले नाही तर काय लाभ ?

सर्वप्रथम "स्व" चे समर्पण करावे. जुण्या काळी इस्त्राएली याजक पशुबळी करत असत. आता येशूच्या बलिदानानंतर येशूचे लोकच याजक आहेत. (प्रकटी १:६; १पेत्र २:५,९; इब्री १३:१५,१६) स्वत:चे शरीर देवाच्या सेवेसाठी देणे गरजेचे आहे. (६:१३,१९; १ करिंथ ६:१३,१९,२०). केवळ शब्द नव्हे तर या प्रकारची उपासना देवासाठी दिलेले "पवित्र" व ग्रहण योग्य बलिदान आहे.

१२:२ **"जग/संसार"** मनुष्य व जग या बाबत बायबल पुष्कळ काही सांगते. जग देवाला ओळखत नाही (योहान १:१०) लोकांना आत्मिक अंधार प्रिय आहे (योहान ३:१९).

ख्रिस्त व त्यांच्या शिष्यांचा तिरस्कार (योहान ७:७; १५:१९). याचा शासक व ईश्वर सैतान आहे. (योहान १२:३१; २करिंथ ४:४) देवाचा आत्मा प्राप्त करू शकत नाही.(योहान १४:१७) याचे ज्ञान मूर्खपणाचे होय (१ करिंथ १:२०;३:१९) हे अस्थायी आहे (१ करिंथ ७:३१; २ करिंथ ४:१८) आशाहिन व देवहिन आहे(इफि २:१२) याशी मित्रता म्हणजे देवाशी शत्रुता आहे(याकोब४:४) हे भ्रष्ट आहे. (१ पेत्र १:४) जग गर्वाने व अभिलाषेने भरलेले आहे.(१योहान २:१५-१७). संसार दुष्टतेत आहे.(१ योहान ५:१९)

म्हणूनच या सारखे होऊ नका असे पौल म्हणतो यात आश्चर्य नाही. जगातील शक्त्या, दुष्टतेची प्रेरणा देऊन लोकांवर पूर्णपणे राज्य करतात. विश्वासूंनी ख्रिस्तासारखे बनावे. हे देवाच्या आत्म्याचे आंतरिक कार्य आहे. मनाचे नविनिकरण व्हावे, (इफि ४:२२,२३). आमचे विचार महत्वाचे आहेत, कारण ते आमच्या व्यवहाराचे संचालन करतात. परिवर्तित जीवन जगण्यासाठी आपले विचार अधीन होऊन अंत:करण देवाच्या सत्यतेने भरण्याची गरज आहे. (८:५,६; २करिंथ १०:५; कलस्सै ३:१६; स्तोत्र १:१-३; फिली २:५; ४:८; इब्री ८:१०). पूर्ण मनाने देवावर प्रीति करवी. (मत्तय २२:३७). याचे नवे होणे आपल्यासाठी आवश्यक आहे. जे लोक देवाप्रति समर्पित होत नाहीत किंवा देवाच्या आत्म्याला सहायोग देत नाहीत, ते त्यांच्यासाठी असलेली देवाची इच्छा कधीच जाणू शकत नाहीत. देवाची योजना जाणण्यासाठी, आपण तेच करावे जे देवबाप करावयास सांगतात.

३ तुम्ही देवाची उत्तम, ग्रहणयोग्य व परिपूर्ण इच्छा समजून घ्यावी. **मला** प्राप्त झालेल्या कृपादानावरून. मी तुम्हांपैकी
प्रत्येकाला बजावतो की आपल्या योग्यतेपेक्षा स्वत:ला अधिक समजू नका. स्वर्गिय पित्याने ज्या परिमाणानुसार
४ विश्वास दिला आहे, त्याच आधारावर स्वत:ला माना. **ज्याप्रमाणे** आपले एक शरीर असून त्यात पुष्कळ अवयव
५ आहेत व सर्व अवयवांचे कार्य एकच नाही, **त्याच प्रमाणे** आपण संख्येने पुष्कळ आहोत; पण ख्रिस्तामध्ये एक शरीर
६ आणि प्रत्येकजण एकमेकांचे सहभागी आहोत. **प्राप्त** झालेल्या असीम कृपेमुळे आपल्याला निरनिराळी कृपादाने प्राप्त
७ आहेत; जर भविष्यवाणी करण्याचे दान आहे तर विश्वासाच्या परिणामानुसार भविष्यवाणी करावी. **जर** सेवेचे दान
८ असेल तर सेवा करण्यात तत्पर असावे. जर शिकवण्याचे वरदान आहे तर, बोध करत जावे. **जो** प्रोत्साहन देतो
त्याने लोकांना धीर दयावा; जो दान देतो, त्याने उदारतेने दयावे. जो पुढारी आहे, त्याने गंभीरतेने पुढारीपण
९ करावे. जो करूणा दाखवतो, त्याने आनंदाने तसे करावे. **प्रीतित** ढोंग नसावे; वाईटाचा तिरस्कार करा.बऱ्याला
१० धरून ठेवा. **बंधुप्रेमाच्या** बाबतीत एकदुसऱ्याला स्नेहभाव दाखवून समर्पित रहा. जेथे आदराची बाब आहे प्रत्येकाने
११ दुसऱ्याला आदराने आपल्यापेक्षा थोर माना. **उत्याहाविषयी** मंद असू नका; परंतु आत्मिकतेने येशूची सेवा करा;
१२,१३ **आशेने** हर्षित व्हा; स्वभावाने धीर धरा, प्रार्थनेत तत्पर रहा. **पवित्र** लोकांच्या गरजा पुरवा, आणि आतिथ्य करण्यात
१४ पुढे असा, पवित्र लोकांच्या गरजा भागवा. **जे** तुमचा छळ करतात त्यांना आशीर्वाद दया. आशीर्वादच दया, शाप देऊ
१५,१६ नका, **जे** लोक आनंदित आहेत. **त्यांच्या** बरोबर आनंद करा, जे रडतात त्यांच्या सोबत शोक करा. **एकमेकाविषयी**
चांगले विचार ठेवा. स्वत:ला दुसऱ्यापेक्षा उत्तम समजू नका, पण लीन व कनिष्ठ वर्गातील लोकांसोबत सहवास
१७ करा. स्वत:ला शहाणे समजू नका. **कोणी** वाईट केल्यास त्याबद्दल वाईट फेड करू नका. सर्वांच्या दृष्टीने जे
१८,१९ उत्तम आहे, त्यास महत्व दया. **शक्य** तर सर्व माणसांबरोबर तुमच्याने होईल. तेवढे शांतीने रहा. **प्रिय** मित्रहो सूड

---

१२:३ २ करिंथ १०:१२; गल ६:३. येथे ख्रिस्ती लोकांनी परिवर्तित जीवन कसे जगावे या विषयी पौल सांगतो. प्रथम तो त्यांच्या बुद्धी (अंत:करण) विशेषत: विचार विषयी सांगतो. देवबाप एखादयाला दुसऱ्यापेक्षा जास्त विश्वास देऊ शकतात (१ करिंथ; १२:९).

१२:४-८ परमेश्वराचा आत्मा "एक देह' होण्यासाठी विश्वासूंना एक करतो. पहा योहान १७:२१-२३; १ करिंथ १२; १२,१३; इफि४:१५, १६;५:२३. या आत्मिक देहात प्रत्येक विश्वासू, दुसऱ्या विश्वासूचा एक भाग आहे. (वचन ५) शरीरात, दुसऱ्यांसाठी उपयोगी होण्याकरता देवबापाने प्रत्येक व्यक्तिला एक किंवा अधिक कृपादाने दिली आहेत. याचा उपयोग दुसऱ्यांचा लाभ व देवाचे गौरव याकरता व्हावा. १ करिंथ १२:७-११; २७-३१; इफि ४:११-१३.

१२:६ **"भविष्यवाणी''** गणना ११:२५; १ करिंथ १२:१०,२८.

१२:९-२१ येथे बदललेल्या जीवनाचे सुंदर चित्र आहे. याचा अर्थ विश्वासू बंधूप्रति प्रेम दाखवणे (वचन ९,१०,१३,१५,१६). येशूवर (वचन ११,१२) व शत्रुवर देखील प्रेम करणे (वचन १४,१९-२१).

१२:९ **"प्रकट करणे/दाखवणे''** लाभप्राप्ती साठी दुसऱ्याशी प्रेमाचे ढोंग करणे शक्य आहे; विश्वासूंनी असे करू नये.

**"तिरस्कार/द्वेष''** जर योग्य प्रीति करावयाची असेल तर त्या सर्व गोष्टींचा तिरस्कार करा ज्या देवाला आवडत नाही. स्त्रोत ९७:१० येशूसारखे प्रेम करा, वाईटाचा (जे त्यांच्यात आहे किंवा आपल्यात आहे) तिरस्कार करा.

१२:१० योहान १३:३४; १५:१२,१७.

१२:११ १ करिंथ १५:५८; तीताला २:१४. जसे हवे तसे प्रेम केल्यामुळे आपण उत्साही राहू. बोलण्याने नव्हे, तर त्यांच्यासाठी आपण जे काही करतो, त्यावरून आपली प्रीति प्रकट होईल. तुलना करा. योहान २:१७.

१२:१२ पहा ५:२-५; लूक १८:१; इफि ६:१८; १ थेस्सल ५:१७.

१२:१३ प्रेम दिसावे. कधी-कधी हे महाग असू शकेल. १ योहान ३:१६-१८; मत्तय २५:३४-४०.

**"गरजा भागवा''** दुसऱ्यांनी दिलेले वाटणे नव्हे तर, जे काही आपल्या जवळ आहे ते दुसऱ्यांना देणे. २ करिंथ ९:१५ यावरील नोट्स पहा.

**"आतिथ्य''** सध्या असे कमी केले जाते.

१२:१४ मत्तय ५:४३-४८; १ पेत्र २:२१-२३.

१२:१५ १ करिंथ १२:२५-२७; गल ६:२. विश्वासूंनी थंड व कठोर न होता दुसऱ्यांच्या सुख-दु:खात सहभागी व्हावे.

१२:१६ प्रेषित ४:३२; इफि ४:२,३. गर्व आणि स्वत:ला फुगवून दाखवण्याच्य व्यवहाराने एकता व शांती यांचा भंग होतो. वरिष्ठ-कनिष्ठ स्तरांवर कार्य करणारे सर्व लोक ख्रिस्तात एक आहेत. प्रेषित ६:१; १ करिंथ १२:१३; गलती ३:२८. जात व समाजातील उच्च स्थानांवर असलेल्या पदामुळे गर्व होऊन फूट पडते आणि हे देवबापाला आवडत नाही.

१२:१७ वचन २१ मत्तय ५:३८-४१ या पृथ्वीवर ख्रिस्ती लोक येशूचे दर्शन घडवतात. त्यांच्या उत्तम व्यवहाराने येशूस आदर आणि वाईट व्यवहाराने अनादर मिळतो. तुलना करा. २:२४, १ प्रेत्र २:९.

१२:१८ इब्री १२:१४.

घेऊ नका, परंतु हे कार्य देवावर सोपवा. कारण लिहिले आहे की ''सूड घेणे माझे कार्य आहे. मी फेड करीन'', असे
२० प्रभु म्हणतात. **म्हणून** ''जर तुझा वैरी भुकेला असेल तर त्याला खावयाला दे; तान्हेला असल्यास प्यावयाला दे;
२१ कारण असे केल्याने तू त्याच्या मस्तकावर निखाऱ्याची रास करशील.'' **वाईटाने** जिंकला जाऊ नको तर बऱ्याने
२२,**१३** वाईटाला. जिंक.'' **प्रत्येक** व्यक्तिने वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या अधीन असावे; **यासाठी** की सर्व प्रकारचे अधिकार
२ परमेश्वराकडून आहेत. जे अधिकारी आहेत ते देवाने नेमलेले आहेत. **याच** कारणाने जो कोणी अधिकाराच्या
अधीन होत नाही तो देवबापाच्या प्रबंधाचा जणू विरोधच करतो. जे लोक असे करतात त्यांवर दंड येईल.
३ **कारण** चांगले कार्य कारणाऱ्यांना अधिकारी दंड देत नाहीत पण फक्त वाईट कृत्य करणाऱ्यांनाच अधिकाऱ्याची
भीति नसावी असे जीवन जगावयाचे आहे काय? तर मग जे चांगले ते करा, म्हणजे त्याच्याकडून तुमची प्रशंसा
४ होईल. **कारण** चांगले करणाऱ्या लोकांसाठी तो देवबापाकडून तुमचा सेवक आहे वाईट करत असाल तर भीति
बाळगा; कारण वाईट करणाऱ्याचा सूड घेणारा असा तो देवबापाचा सेवक आहे; यासाठी की वाईट करणाऱ्यांना
५ त्याने दंड दयावा. **यास्तव** दंडाच्या भीतिमुळे नव्हे तर सद्सदाविवेक बुद्धीमुळे हि तुम्ही अधिकाऱ्यांच्य अधीन
६ राहिले पाहिजे. **हया** कारणास्तव तुम्ही टॅक्स देखील चुकते करता; कारण ते देवाच्या सेवकाच्या रूपात निरंतर
७ आपली जबाबदारी पूर्ण करतात; **म्हणून** ज्याचा जो हक्क आहे तो त्याला दया. ज्याला टॅक्स दयावयाचा आहे
त्याने टॅक्स दया; ज्याचा धाक धरावयाचा त्याचा धाक धरा व ज्याचा सन्मान करावयाचा त्याचा सन्मान करा.
८ **एकमेकावर** प्रीति करणे हयाशिवाय कोणाचे ऋणी राहू नका. जो दुसऱ्यावर प्रेम करतो त्याने नियमशास्त्र पूर्णपणे
९ पाळले आहे. **कारण** आज्ञा म्हणजे व्यभिचार करू नको, खून करू नको, चोरी करू नको, खोटी साक्ष देऊ नको,
लोभ धरू नको आणि दुसरी कोणतीहि आज्ञा असली तरी तिचाहि सारांश हाच आहे की, ''जशी आपणावर तशी
१० आपल्या शेजाऱ्यावर प्रीति कर.'' प्रेम कोणाचेहि वाईट करत नाही. **म्हणून** प्रीति करणाऱ्या व्यक्तिने स्वर्गिय
११ पित्याच्या सर्व नियमांचे पालन केले आहे. **याशिवाय** वर्तमान काळ किती समस्यांनी भरलेला आहे. हे तुम्ही

---

१२:१९ अनु ३२:३५ सूडाची भवना, लोकांत, कुटुंबात व राष्ट्रांत अनेक समस्या उत्पन्न करते. येशूवर विश्वास ठेवणाऱ्यां लोकांत या गोष्टीला स्थान नाही. मत्तय ५:४४; २ थेस्स १:६-९; स्तोत्र ९४:१; गणना ३१:१-३; नहूम १:२,७.

१२:२० नीति २५:२१,२२; लूक ६:२७,२८; १ पेत्र २:२१,२३. जे आपणास दु:ख देतात, त्यांना पीडा देणे म्हणजे वाईट कामाकरता परवानगी देणे. देवाच्या सरळ योजनेच्या विरूद्ध जाऊन वाईट मार्गाचा अवलंब करणे होय.

१३:१-७ विश्वासूंनी देवाच्या राज्यात प्रवेश केलेला आहे. म्हणून सर्वप्रथम ते येशू राजाच्या प्रति जबाबदार आहेत. ते जगात असतांना कोणत्या ना कोणत्या मनुष्याच्या राज्यात अधीनतेत असतात. या वचनातून आपण शिकतो की सरकारी अधिकाऱ्यांच्या प्रति आपला व्यवहार कसा असावा.

१३:१ सर्व अधिकारी व शासन चांगले असून देवाचे भय बाळगतात असा याचा अर्थ नव्हे. (हे पत्र लिहिले जाण्यापर्यंत रोमचा शासक नीरो त्या काळातील सर्वात वाईट राजा होता.)

सरकार च्या चुका, पाप, अपयश व भ्रष्टाचार असतानाहि ते देवाकडून आहेत हे स्पष्ट आहे( स्तोत्र ७५:२-७; दानि ४:३४-३५). दुष्टशासका द्वारे लोकांना दंड देण्याचा अधिकार त्यांना कधी-कधी देवबापाकडून प्राप्त झालेला असतो. एक वाईट सरकार असणे सरकार नसण्यापेक्षा केव्हाहि चांगलेच आहे. सरकार तुटण्याची स्थिति देशासाठी घातक आहे कारण तशा स्थितित वाईटाला थांबवण्याचे कोणतेहि साधन नसते.

देवबाप सरकारची स्थापना करतात या विश्वासाने ख्रिस्ती लोकांनी त्यांच्या गोष्टी मान्य कराव्या. (वचन२:५,७). एकच स्थिति अशी आहे की, जेव्हा एखादा कायदा बायबलच्या विरूद्ध असेल तेव्हाच त्यांनी त्याचे पालन करू नये. पहा प्रेषित ४:१८-२०; ५:२८,२९.

१३:४ **''तुमचा सेवाक''** शासक जाणून बुजून परमेश्वराची सेवा करतात असा अर्थ नाही.(काही लोक तसे करतातहि) या पृथ्वीवर शासन करण्यासाठी सरकार, देवबापाच्या हातातील एक शस्त्र आहे.

१३:६,७ मत्तय २२:२१; १ पेत्र २:१७ टॅक्स न देणारा एखादा विश्वासू देवाविरूद्ध अपराधी ठरतो.

१३:८ कर्ज टाळावे. निष्काळजी लोक यात फसतात, या पासून मोठी पीडा व कष्ट येऊ शकते. विश्वासूंनी विशेष संधि किंवा विवाहासाठी कर्ज घेणे बरे नाही. जे त्यांच्याजवळ आहे त्यात त्यांनी समाधानी असावे. फिली ४:१२; १तिमथ्य ६:६-८; इब्री १३:५. देविपिता त्यांच्या गरजा पुरवतील असा विश्वास असावा. (मत्तय ६:३३; फिल ४:१९). जे लोक कर्ज फेड करू शकतात पण करत नाही, ते चोर आहेत. विश्वासू एकाच गोष्टीचे कर्जदार आहेत व ती गोष्ट म्हणजे एकमेकावर प्रेम करण्याचे कर्तव्य (१२:९,१०; योहान१३:३४).

१३:९ निर्ग २०; लेवीय १९:१८.

१३:११-१४आत्मिक रूपाने पाहिल्यास हे जग अंधाराचे स्थान आहे. विश्वासू प्रकाशाची मुले आहेत (मत्तय ५:१४; योहान १२:३६; इफि ५:८). १३:११,१२ येशूच्या द्वितीय आगमनाविषयी पौलाला किंवा इतर प्रेषितांना ठाऊक नव्हते. ज्याप्रमाणे ते येशूच्या येण्याची

जाणता म्हणून वास्तविकता ओळखणे गरजेचे आहे. आपले शेवटचे तारण आपण विश्वास ठेवला तेव्हापेक्षा जास्त
१२ जवळ आले आहे. **रात्र** संपत आहे, दिवस उगवणार आहे; म्हणून आपण अंधारात केलेली.कामे टाकून दयावी आणि
१३ प्रकाशाची शस्त्रे धारण करावी. **या**, आपण दिवसातील प्रकाशासारखे, जीवन व्यतित करू या; चैनबाजी, मदयपान,
१४ विषय विलास, कामातुरपणा, भांडण-तंटे किंवा मत्सराने भरलेले जीवन नव्हे. **तर** तुम्ही येशू ख्रिस्ताला परिधान
**१४** करा आणि जुण्या स्वभावाच्या अभिलाषांना पूर्ण करण्याचा विचार करू नका. **जो** विश्वासाने दुर्बळ आहे त्याचा
२ स्वीकार करा, व रहस्यमय विषयांवर वादविवाद करू नका. **एखादयाचा** विश्वास असा असतो की, सर्व काही खालले
३ जाऊ शकते; दुसरा व्यक्ति याबाबतीत वेगळा विचार ठेवतो, व केवळ भाजीपालाच खातो. **म्हणूनच** जो सर्व काही
खातो त्याने न खाणाऱ्याला तुच्छ मानू नये आणि जो खात नाही त्याने खाणाऱ्याला दोष लावू नये; कारण देवाने
४ त्याचा स्वीकार केला आहे. **परमेश्वराच्या** सेवकाला दोष लावणारे तुम्ही कोण? असा व्यक्ति प्रभुप्रति जाबाबदार
आहे कारण त्याला स्थिर करण्यास देव समर्थ आहे.
५ **एखादया** व्यक्ति एखादा दिवस दुसऱ्या दिवसापेक्षा अधिक मानतो, दुसऱ्या व्यक्तिनुसार सर्व दिवस सारखेच आहेत.
तर प्रत्येकाने आपल्य मनाची पूर्ण खातरी, करून घ्यावी. जो एखादा दिवस विशेष समजतो, तो येशूसाठी असे
करतो; ६ किंवा जो कोणी दिन-विशेष मानत नाही तो प्रभुसाठी असे करतो. **जो** व्यक्ति सर्व काही खातो, तो
येशूसाठी खातो; ७ कारण तो देवाचे आभार मानतो; तसेच जो व्यक्ति सर्व काही खात नाही तो देखील आभार
मानतो. **कारण**
८ आपल्यातील कोणी स्वत:करता जगत नाही आणि मरत नाही. **कारण** जर आपण जगतो तर प्रभुकरता व मरतो तर
९ येशूसाठीच; म्हणून आपण जगलो किंवा मेलो तरी आपण प्रभुचेच आहोत. **कारण** ख्रिस्त अशासाठी मरण, पावले व

---

प्रतीक्षा करत होते तसेच विश्वासूंनी देखील करावे. अशी त्यांची मनीषा होती. येणाऱ्या सर्व पिढयांसाठी योग्य भाषेचा वापर करण्याची प्रेरणा त्याला पवित्र आत्म्याने दिली. तुलना करा मत्तय २४:३६,४२,४४.

"तारण" (वचन ११) म्हणजे ते तारण जे पूर्ण होईल व जे विश्वासूं जवळ आहे. तुलना करा ८:३३; १ पेत्र १:९.

"प्रकाशाची शस्त्रे" दुष्टता व सैतानापासून सुरक्षा प्राप्त करण्यासाठी विश्वासूंच्या जीवनात लागू होणारे एक सत्य आहे. तुलना करा. इफि. ६:११-१७. याला परिधान करणे म्हणजे येशू सारखे करणे जे त्यांनी मत्तय ४:१-११ यात केले.

१३:१३ १ करिंथ ६:९-११; इफि ५:३-६; कलस्सै ३:५-८.

१३:१४ येशू विश्वासू लोकात वास करतात (८:९; २ करिंथ १३:५)
"परिधान करणे" - बाहय जीवन दर्शविते. येशूत असणाऱ्या विश्वासूंचे जीवन त्यांच्या समानतेत असावे. तुलना करा ४:२२-२४. आपल्या जीवनात त्यांचे सत्य लागू करावे. पौल मान्य करतो की विश्वासूत वाईट स्वभाव असू शकतो. तुलना करा ७:१८; ८:१३; गल ५:१६,१७. या वाईट स्वभावावर विजय प्राप्त करण्याचे महत्व पहा ८:५; १२:२.

१४:१ येथे पौल सामान्य सिद्धांताबद्दल शिकवतो. वचन २-६ यात तो दोन उदाहरणे देतो, ज्यांच्या विषयी विश्वासू सहमत नाहीत. पौलाचा उद्देश असा की विश्वासूंनी एकमेकांचे साहय करावे, निंदा करू नये. (मत्तय ७:१-५). येशूसाठी जगणाऱ्यांनी दुसऱ्या विश्वासूंना स्वीकार केले पाहिजे (१ करिंथ ५:९-१३; २ थेस्स ३:६ पहा).
विश्वासूंनी वाईट व्यवहाराची पारख करावी. महत्व नसलेल्या गोष्टींना जे तुलनात्मक रीतिनुसार पाहतात व दुसरे विचार ठेवतात त्या लोकांना दोषी ठरवू नये.
अशा विषयांवर विश्वासूपासून वेगळे होणे चुकीचे आहे. (१२:१६; इफि ४:३).

१४:३,४ येथे एक महत्वपूर्ण सिद्धांत आहे. विश्वासूंनी प्रत्येकावर प्रेम करावे. ज्ञानी लोकांनी स्वत:ला दुसऱ्यांपेक्षा श्रेष्ठ समजू नये. व्यैयक्तिक सिद्धांत तोडणाऱ्यांवर दोष लावू नये. सर्वचे ख्रिस्ताचे सेवक आहेत. आरोप लावण्याचा अधिकार केवळ येशूला आहे. देवाने ज्यांचा स्वीकार केला त्यांना आपण तुच्छ मानू नये.

१४:५,६ काही यहूदी ख्रिस्तींच्या मते सत्यास मानणे व इतर विशेष दिवसांनाही मानणे आवश्यक होते. हे दिवस देवाने इस्त्राएलासाठी नियुक्त केले होते. इतर विश्वासूंनी जाणून घेतले की ख्रिस्ती लोकांवर या गोष्टी लागू होत नाहीत. वचन ३,४ चा सिद्धांत येथे लागू होतो.
"धन्यवाद/आभार" मत्तय १४:१९ पहा.

१४:७-१२ प्रत्येक विश्वासू देवाचा सेवक असून त्यांच्या प्रति जबाबदार आहे. तो प्रभुचा आहे (वचन ७,८; १ करिंथ ६:१९,२०). या पृथ्वीवरील ज्ञानानुसार त्याने करावे कारण स्वर्गात त्याला न्यायाधीशा समोर उभे राहावयाचे आहे. (वचन १०,१२; २ करिंथ ५:१०; प्रकटी २२:१२). विश्वासूचे जीवन ताब्यात घेण्याचा किंवा दोषारोपणाचा अधिकार कोणालाहि नाही.

१४:९ पहा १०:९; प्रेषित २:३२-३६; फिलि २:८-११; १०:९,१०,१३; मत्तय २२:४१-४५; लूक २:११ यात "प्रभु" वरील नोट्स पहा.

१४:११ यशया ४९:१८; ४५:२३.

१४:१३-२१ हा एक विशेष सिद्धांत आहे इतरांच्या कल्याणसाठी विश्वासूने जीवन जगावे, स्वत:च्या लाभासाठी/आनंदासाठी नव्हे. पहा

१० पुन्हा जिवंत झाले की, त्यांनी मेलेल्यांचा व जिवंताचाहि प्रभु असावे. **तुम्ही** आपल्या भावाला दोषी का ठरवता, किंवा
११ त्याला तुच्छ का मानता? कारण आपण सर्व देवाच्या न्यायासनासमोर उभे राहणार आहोत. **जसे** लिहिले आहे की,
"प्रभु म्हणतात की मी जिवंत आहे आणि माझ्यापुढे प्रत्येक गुडघा टेकला जाईल व प्रत्येक जीभ देवबापाचे स्तवन
१२,१३ करील," **कारण** आपल्यातील प्रत्येक जण आपआपला हिशेब देवाला देईल. **हयाकरता** आपण यापुढे एकमेकांना दोष
१४ लावू नये; व याकडे लक्ष दयावे की कोणी आपल्या भावास ठेच लागण्याचे कारण किंवा अडखळण बनू नये. **मला**
ठाऊक आहे आणि प्रभु येशूमध्ये माझी खातरी आहे की कोणताहि पदार्थ मूळचा अशुद्ध नाही, परंतु एखादा पदार्थ
१५ अशुद्ध समजणाऱ्याला तो अशुद्धच आहे. **जर** तुमच्या भावाला अन्नामुळे दु:ख झाले तर तुम्ही प्रेमपूर्ण जीवन जगत
१६ नाही.ज्याच्यासाठी ख्रिस्त मरण पावले त्याचा नाश तुम्ही आपल्या अन्नाने करू नका. **तुम्हाला** जे चांगले प्राप्त झाले
१७ आहे त्याला लोकांनी वाईट समजून त्यांची निंदा होऊ नये. **म्हणून** स्वर्गिय पित्याचे राज्य खाणे व पिणे नाही तर
१८ देवासमोर नीतिमान ठरवले जाणे, शांती व आनंद, **जो** पवित्र आत्म्याद्वारे प्राप्त होतो त्याचा स्वर्गिय पिता स्वीकार
१९ करतात; आणि त्याला माणसाद्वारे पसंत केले जाते. **म्हणून** त्या गोष्टींच्या मागे लागा, ज्यामुळे मित्रभाव उत्पन्न
२० होतो व ज्याद्वारे आपण एकमेकाला बळकट करत जातो. **अन्नाकरता** स्वर्गिय पित्याचे कार्य नष्ट होत नाही, कारण
सर्वप्रकारच्या वस्तु अगदी शुद्ध आहेत; परंतु जो कोणी दुसऱ्याला दु:खी करून खातो, त्याच्यासाठी ते वाईट आहे.
२१ **उत्तम** हेच आहे की, मांस, द्राक्षरस किंवा आणखी एखादी वस्तु जिच्या सेवनामुळे तुमचे भाऊ-बहिण ठेचाळतात
२२ किंवा अडखळतात, अथवा अशक्त होतात न करणे हे चांगले. **तुमचा** जो विश्वास आहे तो तुम्ही स्वर्गिय पित्यासमक्ष
२३ कायम ठेवा. आनंदी तो व्यक्ति आहे जो त्याला जे पसंत आहे त्याविषयी स्वत:ला दोष लावीत नाही. **जो** व्यक्ति शंका
धरतो व खातो तो दोषी ठरतो, कारण त्याचे वागणे विश्वासावर आधारलेले नाही. आणि जो व्यवहार विश्वासाने
**१५** नाही तो अपराध आहे. **आपण** जे सशक्त आहोत, आपल्याच सुखाकडे न पाहता जे अशक्त आहेत त्यांना आधार
२ देण्याची संधि शोधावी. **आपणापैकी** प्रत्येक जणाने आपल्या शेजाऱ्याची उन्नति होण्याकरता त्याला स्थिर करण्याचा
३ प्रयत्न करावा. **येशूनेहि** स्वत:च्या सुखाकडे पाहिले नाही, शास्त्रात लिहिल्याप्रमाणे "तुमची निंदा करणाऱ्याने केलेली
४ निंदा माझ्यावर आली" असे झाले. **ज्या** गोष्टी पूर्वी लिहिल्या गेल्या त्या आपल्या शिक्षणाकरता होत्या जेणेकरून
५ आम्ही धीर व वचनाद्वारे बळ प्राप्त करून आशा धरावी. **आता** धीर व उत्तेजन देणारा पिता असे करो की, ख्रिस्त

---

१५:१-३; १ करिंथ १०:२४,३३; ९:१९-२३; ८:९-१२. काही विशेषचखाणे किंवा नखाणे, साधारण बाब आहे. परंतु जर दुसऱ्याला यापासून ठेच लागत असेल तर मात्र ही लहान गोष्ट नाही.

इतरांवर वाईट प्रभाव पाडणाऱ्या गोष्टींचा आपण हे का धरू नये. त्यांना ठेच लागणाऱ्या बाबींना त्यागून देणे बरे नाही काय? परमेश्वराचे राज्य, खाणे-पिणे, व्यक्तिगत विवादास्पद गोष्टींची स्वतंत्रता प्राप्त होणे हे नाही (वचन १). मुख्य गोष्ट म्हणजे नीतिमत्व, मेळ व आनंद (वचन १७) आहे. आपल्या इच्छेनुसार केल्याने दुसऱ्याची उन्नति होत नाही. १ करिंथ ८:१३ यात पौलाचा व्यवहार पहा. ज्या नियमांचे पालन केले पाहिजे ते १ करिंथ १०:३१ यात पहा. याच एका ठिकाणी पौल "स्वर्गिय पित्याचे राज्य" असा शब्द वापरतो. मत्तय ४:१७ यात देवाच्या राज्यावरील टीप वाचा.

१४:२२,२३ आत्मग्लानि किंवा दोषी बोधापासून वाचून आपला विवेक शुद्ध ठेवणे आवश्यक आहे. विवेकाच्या विरोधातहि जर आपण वागलो तर आपण अपराधी ठरतो व अशुद्धही पूर्ण खातरी नसेल तर एखादी गोष्ट करू नये. तुलना करा. १ तिमथ्य १:१९ वरचे नोट्स, प्रेषित २३:१ अध्यायाचा सारांश : येशूसाठी आपण जिवंत राहावे, ते काय म्हणतात ते ऐकावे. (वचन ८,१०,१२). त्यांना प्रसन्न करण्याचा आपला प्रयत्न असावा. या पृथ्वीवर आपल्याला भाऊ-बहिणीसांबत राहावयाचे आहे; म्हणून त्यांना विश्वासात बळकट करण्याचा आपण प्रयत्न करावा. ज्यापासून त्यांना दु:ख होईल असे काहीहि आपल्या कडून घडू नये. (वचन १५,१९,२१). आपल्या दोषी विवेकापासून देखील आपण सावध असावे.

१५:१,२ १४:१;१९-२१; १करिंथ १२:२५; गल ६:१,२; लूक ९:३३ शी जुळवा. स्वत:ला प्रसन्न न करता आपण आपली इच्छा मारावी.

१५:३ स्तोत्र ६९:९; योहान ८:२९. म्हणूनच देवाचे प्रतिनिधित्व करण्यासाठी येशू या पृथ्वीवर आले. त्यांना प्रत्येक प्रकारची थट्टा उपहास व तिरस्कार सहन करावा लागला. स्वत:ला खुश करण्यासाठी, या सर्व गोष्टींचा ते त्याग करू शकले असते. परंतु जीवनात त्यांचा हाच उद्देश होता की कोणत्याहि स्थितित स्वर्गिय पित्याला प्रसन्न करावे.

१५:४ बायबल अशा उदाहरणांनी भरलेले आहे ज्यात लोकांनी स्वत:ला प्रसन्न केले नाही तर दुसऱ्यांच्यासाठी व देवासाठी जीवन जगले. त्यांच्याकडून आपणहि शिकावे. वचनात सर्वकाही आपल्या लाभाचे आहे. कोणत्याहि गोष्टीला हलके समजणे म्हणजे आवश्यक सत्यापासून स्वत:ला अजाण ठेवणे होय याचा परिणाम असा होईल की आपली हिंमत वाढवणाऱ्या गोष्टीपासून व विश्वात सर्वकाही सहन करण्याच्या प्रोत्साहनापासून आपण अज्ञानी राहू. २ तिमथ्य ३:१६,१७ चे नोट्स पहा.

१५:५,६ "एक मन" १२:१६; १४:१९; इफि ४:३.
"आदर सन्मान" हे प्रत्येक विश्वासूचे लक्ष्य असावे. (१करिंथ १०:३१).

६ येशूच्या आदर्शानुरूप तुम्हा सर्वांना एकमेकासाठी सहानुभूति देवो, **यासाठी** की तुम्ही एकमताने व एकमुखाने प्रभु
७ येशू ख्रिस्ताचे जे पिता व देव त्यांचे गौरव करावे. **म्हणून** स्वर्गिय पित्याच्या सन्मानार्थ, जसे येशू ने तुम्हाला
८ स्वीकारले तसे तुम्ही देखील एकमेकांचा स्वीकार करा. **आता** मी असे म्हणतो की येशू ख्रिस्त परमेश्वराच्या
९ सत्यासाठी यहूदयांचे सेवक झाले यासाठी की पूर्वजांना दिलेली अभिवचने निश्चित करावी, **आणि** परराष्ट्रीयांनी
सृष्टीकर्त्याच्या दयेमुळे देवाचे गौरव करावे. जसे की लिहिले आहे की या कारणास्तव 'परराष्ट्रीयांमध्ये''मी तुम्हाला
१०,११ मान्य करून तुमच्यासाठी गीत गाणार. **तो** पुन्हा म्हणतो की परराष्ट्रीयांनो यहूदयांसोबत आनंदित व्हा. **पुन्हा** सर्व
१२ परराष्ट्रीयांनो देवबापाची स्तुति करा; सर्व लोकांनी त्यांचे गौरव करावे. **पुन्हा** यशया भविष्यद्वक्ता म्हणतो, इशायाचा
(दाविदाचा) वंश सदाकाळ राहील. ते परराष्ट्रीयांवर शासन करतील, व परराष्ट्रीय त्यांच्यावर (येशूवर) भरंवसा
१३ ठेवतील. **विश्वास** केल्यामुळे शांतिचे देव तुम्हास आनंद व शांतिने परिपूर्ण करतील, यासाठी की पवित्रआत्म्याच्या
१४ सामर्थ्याने तुम्हाला विपुल आशा प्राप्त व्हावी. **माझ्या** बंधु-भगिनींनो मी स्वत: तुमच्या बाबतीत निश्चिंत आहे की
१५ तुम्ही देखील चांगुलपणाने व ज्ञानाने संपन्न आणि एकमेकांना बोध करावयाला समर्थ आहात. **तरी देखील** भाऊ
१६ बहिणींनो स्वर्गिय पित्याच्या कृपेमुळे मी धैर्याने तुम्हाला लिहिले आहे; **ते** असे की परराष्ट्रीयासाठी येशू ख्रिस्ताचा
सेवक होऊन देवाच्या सुवार्तेची सेवा करावी, यासाठी की पवित्र आत्म्याद्वारे शुद्ध केले गेल्याने परराष्ट्रीयांचे समर्पित
१७,१८ होणे ग्रहण योग्य व्हावे. **म्हणून** देवाच्या गोष्टीत ख्रिस्त येशू विषयी मला अभिमान वाटतो. **परराष्ट्रीयांनी**
आज्ञापालन करावे. म्हणून ज्या गोष्टी येशूने माझ्याद्वारे केल्या नाही, त्या सांगण्याचे मी धाडस करणार नाही

---

१५:७ पहा १४:१,३.

१५:८ ''सेवक'' पहा मत्तय १५:२४; २०:२८; लूक २२:२७; फिलि २:७; यश ४२:१. बायबलमधील यहूदयांची प्रतिज्ञा येशूने समाप्त केली नाही. उलट त्या सर्वांची पुष्टी केली. म्हणजेच आपल्या मृत्यु व उठण्याद्वारे ख्रिस्ताने त्यां प्रतिज्ञा पूर्ण करण्यासाठी एक पाया रचला.

१५:९ हे सर्व होत असतांना ख्रिस्तासमोर यहूदी व परराष्ट्रीय देखील होते. पौल स्त्रोत १८:४९ कडे संकेत करतो. येथे परराष्ट्रीयांच्या मध्ये येशूची स्तुति केली जाण्याचे चित्र रेखाटले गेले आहे.

१५:१० अनु ३२:४३ परराष्ट्रीय, यहूदयांशी आनंदाने सहभागिता करत होते.

१५:११ स्तोत्र ११७:१.

१५:१२ यश ११:१०

१५:१३ ''आशेचे दाता'' म्हणजे देव आशा उत्पन्न करून आपल्या लोकांची आशा पूर्ण करतात. (५:२-५; ८:२३-२५). ही आशा पवित्र आत्म्याद्वारे उत्पन्न केली जाते. शांती व आनंद देवाच्या आत्म्याद्वारे निर्माण केले जातात. (गल ५:२२) देवाच्या राज्याची ही स्वाभाविक तत्वे आहेत. (१४:१७) त्यांचया आज्ञाधारक शिष्यांसाठी ही प्रतिज्ञा केली गेली होती. (योहान १४:२६; १५:११).
शिष्यांनी या प्रतिज्ञांनी परिपूर्ण असावे ही देवबापाची इच्छा आहे. तेव्हाच त्यांच्याद्वारे अपेक्षित व्यवहार केला जाईल. तेव्हाच देवाच्या सन्मानार्थ, गौरवार्थ जीवन विश्वासू जगेल ज्या गोष्टी त्यांची आशा व आनंद नष्ट करून त्यांना थंडगार करतात, त्या गोष्टी त्यांनी अस्वीकार कराव्यात.

१५:१४ दुसऱ्यांचे कल्याण करणे हे आत्म्याचे एक फळ आहे. (गल ५:२२). शिकवण्याची क्षमता सर्व विश्वासूत असावी. इब्री ५:११-१४; १ थेस्स ५:१४.)

१५:१५ पहा १:८; २ पेत्र १:२; ३:१; यहूदा ५; २ तिमथ्य २:१४ शी तुलना करा. आत्मिक सत्य विसरणे खूप सोपे आहे म्हणून याची आठवण नेहमी ठेवावी.

१५:१६ प्रेषित २२:२१; गल २:७; इफि ३:८ शुभवर्तमान पोचवणे- पौलाचे सर्वात मोठे काम होते (१:१).
''समर्पित केले जाणे'' हे पुरोहितांचे कार्य होते. पौल इतर विश्वासूंच्या तुलनेत पुरोहित होता, तो असे म्हणत नाही (सर्वच विश्वासू पुरोहित आहेत - १ पेत्र २:५,९; प्रकटी १:६; ५:१०; २०:६; इब्री १०:१९-२२).
परराष्ट्रीयांसाठी पौलाने कोणतेहि बलिदान केले नव्हते. परराष्ट्रीय स्वंय स्वत:च ''चढवलेला पदार्थ'' होते.
शुभवर्तमानावर विश्वास करयाऱ्यांनी स्वत:लाच ''चढवले'' होते; कारण पवित्र आत्म्यांद्वारे धुतले गेले होते (१२:१ पहा).
म्हणजेच ते वेगळे केले गेले होते. पवित्रीकरण यावरील नोट्स पहा योहान १७:१७-१९.

१५:१७-१८ पौल स्वत:वर गर्व करत नाही. येशूच्या सेवेत तो आनंदित होता. स्वत:च्या योग्यतेच्या बळावर तो काही करू शकत आहे. असा विचार त्याने कधीहि केला नाही. स्वत:विषयी सांगतांना त्यांने दुसऱ्या प्रकारच्या भाषेचा वापर केला. ७:१८; इफि ३:८; १ तिमथ्य १:१५.

१५:१८ प्रेषित १४:८,९; १६:१८,२५,२६; १९:११,१२; २ करिंथ १२:११,१२. यरूशलेपासून इल्लूरिकमापर्यंत (ग्रीस व मासेदोनिया चा उत्तर-पश्चिम भाग) एक मोठे क्षेत्र होते. सीरिया, मध्य- पश्चिम तुर्कस्थान, ग्रीस व मासेदोनिया यांचा समावेश होता.

१९ **यासाठी** की शब्दांनी व कृतींनी चिन्हें व अद्‌भुतें हयांच्या सामर्थ्याने जे जे घडविले गेले, तेच मी सांगतो, ते ही की,
२० यरूशलेमे पासून इल्लूरिकमापर्यंत मी ख्रिस्ताची सुवार्ता पूर्णपणे सांगितली आहे. **माझे** लक्ष्य हेच आहे की जेथे-जेथे
ख्रिस्ताचे नांव पोचले नाही. तेथे -तेथे शुभवर्तमान घेऊन जावे; यासाठी की मी दुसऱ्याच्या पायावर इमारत बांधू
२१ नये. **पण** असे लिहिले आहे की ''ज्यांच्या बद्‌दल सांगितले गेले नाही, ते पाहतील; व ज्यांनी ऐकले नाही ते
२२,२३ समजतील.'' **हयामुळे** मला तुमच्याकडे येणे शक्य झाले नाही. **परंतु** या सर्व क्षेत्रात शुभवर्तमान पोचण्याच्या
उद्‌देशाने व पुष्कळ वर्षे तुम्हांकडे येण्याची उत्कंठा असल्यामुळे मी स्पेन देशाला जाईन आणि तुमची भेट घेईन.
२४,२५ **माझी** इच्छा आहे की तुमच्या सोबत काही वेळ व्यतित केल्यानंतर तुम्ही मला पुढे पाठवावे. **आता** मी पवित्र जनांची
२६ सेवा करण्यासाठी यरूशलेमेस जातो. **कारण** मासेदोनिया व अखया येथील लोकांना बरे वाटले की त्यांनी
२७ यरूशलेमेतील गोरगरिबांसाठी काही आर्थिक सहाय्य करावे. **खरे** पाहिले तर त्यांना हे बरे वाटले आणि ते
यरूशलेमेच्या लोकांचे ॠणी आहेत; कारण जर परराष्ट्रीयांना त्यांच्याद्वारे आत्मिक लाभ प्राप्त झाला तर ऐहिक
२८ गोष्टींत त्यांची आर्थिक मदत करणे हे. त्यांचे कर्तव्य आहे. **म्हणून** हे कार्य पूर्ण केल्यानंतर मी तुमच्या कडील
२९ वाटेने स्पेन जाईन; मला **खातरी** आहे की जेव्हा मी तुमच्याकडे येईन तेव्हा ख्रिस्ताच्या शुभवर्तमानाच्या
३० आशीर्वादाने भरलेला असा येईन. **आपल्या** प्रभु येशू ख्रिस्ताच्या नावाने व पवित्र आत्म्याच्या प्रेमामुळे तुम्हाला
३१ विनंती करतो की माझ्याकरता देवाजवळ प्रार्थना करण्यात. तत्पर असा. **यासाठी** की, यहूदियांत आज्ञाभंग करण्याऱ्या
३२ पासून माझी सुटका व्हावी; आणि यरूशलेमेसाठी माझी सेवा पवित्र लोकांनी स्वीकारावी. **स्वर्गिय** पित्याच्या इच्छेने
३३ मी आनंदाने तुम्हांकडे आल्यावर तुम्ही देखील उत्साहित व्हावे. **आता** शांतिचा देवबाप तुम्हां सर्वांबरोबर असो
**१६,**२ असेच होवो. **किंख्रियातील** मंडळीची फीबी नावाची एक बहिण आहे जी स्तुति योग्य आहे. **जसे** की पवित्र लोकांना

---

१५:२०,२१याच सिद्धांताने पौलाच्या सेवेचे मार्गदर्शन केले. हा भाग यश ५२:१५ यातून आहे. सामान्यत: पौल यात्राकरून आपल्या पीढी पर्यंत शुभवर्तमान गाजवू इच्छित होता. तो आपणासाठी आदर्श आहे. तुलना. करा मत्तय २८:१८-२०; मार्क १६:१५; लूक २४:४६,४७; प्रेषित १:८.

१५:२२,२३ १:१०-१३ पहा. नवीन क्षेत्रात जाण्यापूर्वी, तेथील कार्य पूर्ण करण्याची त्यांची इच्छा होती.

१५:२४ इटलीच्या पश्चिमेकडे समुद्रापलीकडे स्पेन देश आहे. येथे व वचन २८ यात ही दोन ठिकाणे आहेत. ज्यात या स्थानांचा उल्लेख केला गेला आहे. पौल यावेळी जवळ जवळ ६० वर्षांचा होता तरी सुद्धा नवीन संधि शोधत होता. येथे तो आर्थिक मदतीविषयी सांगत नाही स्वत:च्या कार्यासाठी, स्वत:साठी, धनाची मागणी करणे ही त्याची पद्धत नव्हती. काही भावांना, काही दूर पोचवण्याबाबत तो बोलत होता. पहा प्रेषित १५:३; २०:३८;२१:५; १करिंथ १६:६,११; २ करिंथ १:१६.

१५:२५-२७ २करिंथ ८:१-५ हा सिद्धांत आजहि लागू आहे. जे आत्मिक लाभाचा फायदा घेतात, त्यांनी शिकवणाऱ्यांची आर्थिक मदत करावी. पहा १ करिंथ ९:७-१४.

१५:२८ **''लाभ''** हा आर्थिक मदतीकडे संकेत आहे. बायबल किंवा इतिहास सांगत नाही की पौल कधी स्पेन देशी गेला.

१५:२९ रोमी सरकारच्या कैदयाच्या रूपात पौल रोम येथे आला नव्हता. (प्रेषित २८:१६). येथे त्याचा विश्वास पूर्ण झाला. आराम, विलासिता, वस्तुंची विपुलता किंवा भरलेली पैशाची पिशवी म्हणजे ख्रिस्ताच्या भरपूरीचे आशीर्वाद, असा पौलाचा अर्थ नव्हता. शांती व आनंद व ते सामर्थ्य ज्याद्वारे तो शुभवर्तमान पोचवत. होता, हा त्याचा अर्थ होता. बाहय परिस्थितिंची त्याला पर्वा नव्हती. पहा फिलि ४:१११३; २ करिंथ १२:९,१०. हा आपल्या सर्वासाठी एक उत्तम नमूना आहे.

१५:३० विश्वासूंच्या प्रार्थनेची आवश्यकता त्याला ठाऊक होती. २करिंथ १:११; इफि ६:१९,२०;फिलि १:१९; १ थेस्स ५:२५; २ थेस्स ३:१; फिल २२. ''पवित्रआत्म्याचे प्रेम'' कदाचित ते प्रेम जे विश्वासूंसाठी आहे; हा त्याच्या व्यक्तित्वाकडे केलेला इशारा आहे. (योहान १४:१६,१७ चे नोट्स पहा.)

**''प्रार्थना करावयास''** -१ करिंथ ९:२५,२६; इफि ६:१२; कलस्सै १:२९. जो कोणी ख्रिस्तासाठी शुद्ध जीवन जगतो व सेवा करू इच्छितो, त्याच्या जीवनात त्याला संघर्षांचा सामना करावा लागेल.

१५:३१,३२प्रेषित २१:२७ येथे शेवटपर्यंत आपण पाहतो की तो यहूदी लोकांत, अविश्वासू लोकांपासून कसा सोडवला जाऊन आनंदाने रोम येथे जाऊन पोचला. येथे रोमच्या विश्वासूंनी केलेल्या प्रार्थनेचे काही महत्व होते काय ? याकोब ५:१६ शी तुलना करा.

१५:३३ **''शांतीचे पिता''** - १६:२०; फिलि ४:९; १ थेस्स ५:२३. इब्री १३:२०; रोम १५:१३ शी जुळवा. देवबाप शांती चे कर्ता असून ती देणार आहेत.

१६:१-१६ बायबलचा प्रत्येक भाग पवित्र आत्म्याद्वारे दिलेला आहे. येथे पुष्कळ शिकण्या सारखे आहे. रोमच्या ख्रिस्तीलोकांसाठी पौलाचे प्रेम व चिंता (येशूचे प्रेम देखील) किती होते ते निदर्शनास येते. ज्या गोष्टी त्याने त्या लोकांत पाहिल्या, त्यांची प्रशंसा केली. आपल्या जीवनासाठी व सेवेसाठी हा एक नमूना आहे. आपल्या कामाची माहिति स्वर्गात ठेवली जाते हे स्मरण असू दया. (इब्री १२:२३; मलाखी ३:१६; प्रकटी २०:१२; दानि ७:१०; लूक १०:२०; फिलि ४:३.)

३ योग्य आहे त्याप्रमाणे या बहिणीचा स्वीकार करावा व तिला आवश्यकतेप्रमाणे साहाय्य करावे. **कारण** ती पुष्कळांना
४ व इतरांना साहाय्य करणारी झाली आहे. विश्वासू प्रिस्क व अक्विला माझे सहकारी आहेत **आणि** त्यांनी माझ्या
जीवाकरता आपला जीव धोक्यात घातला. केवळ त्यांच्याच प्रति मी आभारी नाही तर सर्व परराष्ट्रीय मंडळयांचा
५ देखील आभारी आहे. **याप्रकारे** जी मंडळी त्यांच्या घरी उपासनेसाठी जमत असते, त्यांना माझा सलाम सांगा,
६ माझा प्रिय अपैनत हयाला जो आशिया देशातून ख्रिस्तात येणारे प्रथम फळ आहे, **मरीयेला** सलाम सांगा; तिने
७ आमच्यासाठी फार परिश्रम केले आहेत. **अंद्रोनिक** व युनिया जे माझे नाते वाईक व सोबतीचे कैदी आहेत, जे
८, ९ प्रेषितांमध्ये व माझ्या दृष्टित प्रमुख आहेत त्यांना सलाम. **आंप्लियात** जो ख्रिस्तात माझा प्रिय याला सलाम. **उर्बान**
१० व स्ताखु जे ख्रिस्तात माझे प्रिय यांना सलाम सांगा. **अपिल्लेस** जो ख्रिस्तात माझा स्विकृत आणि अरिस्तबूलच्या
११ घरांतील माणसांना माझा सलाम. **माझा** नातेवाईक हेरोदियोन याला सलाम नार्किसाच्या घरांतील जी माणसे प्रभुमध्ये
१२ श्रम करतात त्यांना सलाम. **त्रुफैना**, त्रुफासा ज्या प्रभुमध्ये श्रम करतात त्यांना सलाम. पर्सिस जिने येशूसाठी
१३,१४ कठोर श्रम केले तिला सलाम सांगा. ख्रिस्तात निवडलेले **रूफ** मरिया व तिच्या आईस माझा सलाम. **असुंक्रित**,
१५ फलगोन, हर्मेस, पत्रवास, हर्मास आणि त्यांच्याबरोबर जे भाऊ आहेत त्यांना नमस्कार. **फिल्लग** व युलिया, निरीय
१६ व त्याची बहिण तसेच ओलुंपास यांना व त्यांच्या बरोबर जे पवित्रजन आहेत त्या सर्वांना सलाम व **एकमेकांना**
१७ पवित्रतेच्या चुंबनाने सलाम. ख्रिस्ताच्या सर्व मंडळया तुम्हाला सलाम सांगतात. अहो **बंधु-भगिनींनो** मी तुम्हाला
विनंती करतो की, तुम्हाला मिळालेल्या शिक्षणाविरूद्ध जे फुटी व अडथळे घडवून आणतात, त्यांना ओळखा व
१८ त्यांच्यापासून दूर व्हा. **कारण** तसले लोक आपल्या प्रभु येशू ख्रिस्ताची सेवा करीत नाहीत, तर स्वत:च्या पोटाची
१९ सेवा करतात, **कारण** तुमच्या आज्ञा पालनाविषयी सर्वजण जाणतात. म्हणून मी तुम्हाविषयी आनंद मानतो, तरीपण
२० तुम्ही जे चांगले आहे, त्यासंबंधाने शहाणे असावे व वाईटाबद्दल साधेभोळे असावे, **आणि** शांतिचा देव यहोवा
~~लवकरच सैतानाला तुमच्या पायाखाली तुडवील. आपला स्वामी प्रभु येशू ख्रिस्ताची कृपा तुम्हाबरोबर असो. आमेन.~~

१६:१,२ **"बहिण"** शारीरिक नात्याकडे नसून हा आत्मिक संबंधाकडे केलेला संकेत आहे.
**"साहाय्य करणारा"** -मंडळीत फीबीची काही जबाबदारी होती, करिंथ पासून सात मैल दूर किंख्रिया नावाचे एक बंदर होते. शक्यतोवर ती पौलाचे पत्र घेऊन रोम येथे गेली होती.

१६:३ प्रेषित १८:२; १८,२६; १करिंथ १६:१९; २ तिमथ्य ४:१९.

१६:४ ५:७; १ योहान ३:१६ पहा. केवळ वचन शिकवलेच नाही तर तसे करून दाखवले. त्या काळी सहभागिता/संगति व शिकवण्याचे कार्य सामान्यत:घरीच होत असे.

१६:६ जसे आज ही आहे तसेच त्या वेळी मरिया हे सामान्य नांव होते. या मरियेबद्दल आपल्याला काहि माहित नाही.

१६:७ पौलाला अनेकदा तुरूंगात जावे लागले (२ करिंथ ११:२३). तो नेमका कोणत्या वेळेची गोष्ट करत आहे ते माहित नाही.
**"प्रेषित"** - सेवेसाठी पाठविलेला व्यक्ति. देवाचे हे दोन सेवक मुख्य बारा प्रेषितांमधील नव्हते, पण ते मुख्य प्रेषित होते.

१६:१० **"स्वीकृत"** कोणत्याहि विश्वासू किंवा सेवकाला आवडणारा हा शब्द होय. तुलना करा १ करिंथ ९:२७; २ तिमथ्य २:१५.

१६:१२ काही विश्वासूंनी प्रयत्न केले तर काहींनी खूप जास्त केले (वचन ६)
पौलाने वास्तविक स्थिति प्रमाणेच सांगितले होते. आणि जेव्हा आम्ही देवासमोर उभे राहू तेव्हाही हेच सत्य राहील. आमच्यात नसलेल्या सत्याविषयी ते कही बोलणर नाहीत किंवा त्याचा मोबदलाहि देणार नाहीत. २:६; १ करिंथ ३:१२-१५; लूक १९:१२-२६ पहा.

१:१३ **"आई"** -मार्क १०:२९,३०.

१६:१६ त्यासमयी गालावर चुंबन देणे ही अभिवादनाची पद्धत होती. पवित्र **"चुंबन"** म्हणजे ज्यात काहीहि अपवित्रता/अशुद्धपण नाही, म्हणजेच विश्वासूंना ख्रिस्तावर स्वीकार करणे अनेक पत्रात खोटया शिक्षकासंबंधी सावधगिरी बाळगण्याविषयी पौलाने सांगितले होते (२ करिंथ ११:१३-१५; गल १:६-८; कलस्सै २:८,१८; १ तिमथ्य ४:१-३; २ तिमथ्य ३:१-८; ४:२-४). पहा मत्तय ७:१५,१६; २४:४,५,२४; प्रेषित २०:२९-३१. २ पेत्र २:१,२; १ योहान २:१८,१९; यहूदा ४. देवाचे सत्यहिच लोकांना वाचविण्याची व बळकट करण्याची पद्धत होय खोटया शिक्षकांद्वारे मंडळीत चुकीचे सिद्धांत आणण्याचे कार्य सैतान करतो. त्यांच्या परिणामावरून त्यांना ओळखले जाऊ शकते (मत्तय ७:२०). त्यातील एक परिणाम आहे. "फूट" दुसरा सत्य स्वीकार करण्याच्या मार्गातील अडथळे. व हे अडथळे देवाने प्रकट केलेल्या सत्याच्या विरूद्ध असतात.

जेव्हा कोणीहि मंडळीत खोटी शिक्षा आणू इच्छितो, तेव्हा विश्वासूंनी "त्यांच्यापासून दूर रहावे." त्याचा स्वीकार करू नये. त्याच्याशी सहभागिता नकरता, त्याला शिकवण्याची परवानगी हि देऊ नये.

१६:१८ वचनाच्या विरूद्ध शिकवणारे कधीहि ख्रिस्ताचे खरे सेवक होऊ शकत नाही हे निश्चित आहे. ते सैतानाकडून आहेत- २ करिंथ ११:१४,१५; फिल ३:१८,१९; यहूदा १३:१४. गोड बोलतात पण आतून दुष्टात्यासारखे आहेत.

१६:१९ १:८; ६:१७; १५:१४ पहा.

२१,२२ **माझा** सहकारी तिमथ्य व माझे नाते वाईक लूक्य यासोन व सोसिपतेर तुम्हाला सलाम सांगतात. **मी** पत्र लिहून
२३ देणारा तर्तिय तुम्हाला सलाम सांगतो. **माझे** व पूर्ण मंडळीचे आतिथ्य करणारा गायस यांचा तुम्हाला सलाम. नगराचा
२४ प्रबंधक एरास्त व भाऊ क्वर्त यांचा तुम्हाला सलाम. **आपला** स्वामी ख्रिस्त येशूची असिमित कृपा तुम्हा बरोबर असो.
माझ्या सुवार्तेप्रमाणे, तुम्हाला स्थिर करणारा ख्रिस्ताचा संदेश, त्या रहस्याच्या प्रकटीकरणाला अनुसरूनच होता जे
२५ जुण्या युगात गुप्त ठेवले होते; **परंतु** आता सनातन देवाच्या आज्ञेने, संदेष्टयांच्या लेखांच्याद्वारे विश्वासाच्या अधीन
२६ होण्यासाठी पूर्णपणे प्रगट झाले आहे. **केवळ** सर्वशक्तिमान सृष्टिकर्ता जो ज्ञानी आहे त्यास येशू ख्रिस्ताच्याद्वारे
युगानुयुग गौरव असो. आमेन.

---

१६:२० ''शांतिचे कर्ता यहोवा'' -१५:३३; १ इति २१:१; मत्तय ४:१-१०; योहान ८:४४. सैतान त्यांना प्रेरणा देतो म्हणून येथे त्याचा उल्लेख केला गेला आहे. (वचन १७,१८).

१६:२२ जे काही पौल सांगत गेला ते तर्तियाने लिहिले.

१६:२३ ''गायस'' - १करिं १:१४.

१६:२५ ''माझा संदेश'' पौल हे शब्द यासाठी वापरत नाही की त्याने त्याचा प्रारंभ केला पण शुभवर्तमान, जे त्याने दिले शिकवले आणि जो या पत्राचा मोठा विषय आहे; असा पौलाचा अर्थ होता. ''गुप्त असलेला देवाचे ते सत्य जे ते त्यांच्यावर प्रकट करतात, जे त्याला जाणण्याची इच्छा ठेवतात. दुसऱ्या इतर माध्यमातून ते कधीहि जाणले जाऊ शकत नाही करण येशूच्या पूर्वी शुभवर्तमानाच्या सत्याचे पैलू पूर्ण प्रकारे सांगितले गेले नव्हते. (इफि ३:५).

१६:२६ ''भविष्यद्वकत्यांचे लेख''-कद्‌चित ती पुस्तके जी प्रेषितांनी लिहिली होती. ते जुण्या कराराच्या संदेष्टयांसारखे होते पण त्यांच्या जवळ विपुल सत्य होते. तुलना करा १ करिंथ २:६-१३; किंवा पौलाचा संकेत जुण्या कराराकडे होता (ज्यांत भविष्यवाण्या व शुभवर्तमानाचे चित्र होते). ज्यांचे स्पष्टीकरण प्रेषितांनी केले. तुलना करा ३:२१; लूक २४:२५-२७,४५-४६) १पेत्र १:१०-१२. या दोन्ही वचनात देवाचा एकच उद्‌देश होता, तो म्हणजे सर्व राष्ट्रांनी विश्वास करून आज्ञा पाळावी -१:५; ११:३२; १५:९-१२.

१६:२७ एक सत्य देवबापच पूर्ण प्रकारे बुद्धिमान आहेत; केवळ तेच जाणतात की मनुष्याला काय सांगावे किंवा सांगू नये; तेच सन्मान योग्य आहेत. (११:३३-३६; प्रकटी ४:१; यश ४८:११). येशू ख्रिस्ताद्वारे सर्व आदर व सन्मान त्यांनाच प्राप्त झाला पाहिजे. - १पेत्र ४:११; यहूदा २५.

एक टीप : आपल्याविषयी देवाला पूर्वज्ञान असणे

''पूर्वीपासून जाणले'' या विषयावर लोकांच्या विचारात मतभेद आहेत. काही म्हणतात - उत्पत्तीच्या पूर्वीपासून त्यांना ठाऊक होते की तारणासाठी ते कोणाची निवड करतील, आणि हे निर्धारित केले की ते त्यांच्या पुत्रासारखे होतील. ख्रिस्तावर विश्वास ठेवल्यामुळे किंवा आपले समर्पण ख्रिस्ताला केल्यामुळे त्यांनी त्यांची निवड केली नाही. ही निवड त्यांच्या असीम कृपेवर व ज्ञानावर अवलंबून होती. त्यांनी इतर दुसऱ्या लोकांचा अस्वीकार केला; इच्छा असती तर त्यांनी सर्वांना निवडून त्यांचे तारण केले असते परंतु तसे केले नाही. ही निवड त्यांच्या असीम कृपेवर व ज्ञानावर अवलंबून होती. त्यांनी इतर दुसऱ्या लोकांचा अस्वीकार केला; लोकांच्यात काहिहि चांगुलपणा नव्हताच, म्हणून चांगुलपणामुळे निवड करण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. निवडलेल्या लोकांपेक्षा ही जास्त वाईट असल्यामुळे देवाने त्यांना सोडून दिले असेहि नाही.

या शिकवणुकीचा विरोध कशाप्रकारे केला जातो. देवाने घोषणा केली होती की त्यांच्या इच्छेप्रमाणे सर्वांचे तारण व्हावे. (११:३२; १तिमथ्य २:३-६;४:१०. २ पेत्र ३:९; यहे १८:३०-३२; ३३:११) देव प्रीति आहेत (१ योहान ४:८,१६) देव म्हणतात की त्यांचे सर्व जगावर प्रेम आहे. सर्वांवर त्यांची कृपा आहे (स्त्रोत १४५:८,९).

त्यांच्या हृदयाविषयी बायबल सांगते (यिर्म ४८:३१-३९; मत्तय २३:३७; लूक १९:४१; प्रकटी २२:१७). जर असे होते तर प्रश्न हा आहे की देवाने सर्वांची निवड का केली नाही? काहींचा स्वीकार करणे काहींना अस्वीकार करण यावरून देवाची सर्वाभौमिकता दिसत असली तरी सर्वांच्या बद्‌दलचे त्यांचे प्रेम व सर्वांना तारण देण्याची इच्छा कोठे गेली?

म्हणून या विषयावर कठीण प्रश्न उद्‌भवतात; विद्वान याचा स्वीकार करत नाही. विद्वान ''पूर्वी पासून जाणले'' याची व्याख्या अशाप्रकारे करतात. प्रथम व्यक्ति जाण्यापूर्वी देवबाप मानवजातिच्या त्या लोकांबद्‌दल जाणत होते जे पवित्र कार्यासाठी आपले हृदय उघडणार होते व विश्वास करण्याचे ठरवणर होते. देवाने ही गोष्ट ठरवली होती की या लोकांचे तारण व्हावे व त्यांनी ख्रिस्ताच्या स्वरूपात बदलत जावे; काही लोक इतरांपेक्षा चांगले असल्यामुळे त्यांची निवड झाली असे मुळीच नव्हते; किंवा चांगली कृत्य केल्यामुळे ते तारण प्राप्त करण्याच्या योग्यतेचे होतील; असे अजिबात नव्हते ३:९-२०,२४; इफि २:१-१०; तीताला ३:३-७ पहा. पवित्र आत्म्याच्या योग्यतेशिवाय मनुष्य ख्रिस्तावर विश्वास करू शकत नाही. (योहान ६:२९,४४; प्रेषित १३:४८; फिलि १:२९). देवाचा आत्मा लोकांच्या अंत:करणात कार्य करून त्यांना विश्वास घेण्याच्या प्रक्रियेत योग्यतेपर्यंत नेतो. या प्रक्रियेत देवबापाच्या इच्छाशक्तिचा सामना होतो; लोकांना स्वतंत्रता देखील असते की त्यांनी देवाला ''हो'' किंवा ''नाही'' म्हणावे; त्यांची निवड करावी किंवा करू नये. अशी योग्यता प्राप्त झाल्यावर काही जण होय म्हणतात किंवा काही नाही.

कोणीही पवित्रात्म्याच्या मदतीशिवाय देवाला ''होय'' म्हणून विश्वास करण्याची निवड करू शकत नाही म्हणून आपल्याला प्राप्त झालेले तारण आपल्या स्वत:च्या बळावर मिळालेले बक्षिस नाही.